मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

र्भ साहित्य संघाचे मुखपत्र
राष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

संतश्रेष्ठ श्रीनामदेवमहाराज




पंढरपूर येथील श्रीनामदेवमंदिराचे हे छायाचित्र आहे.

:२५ अंक ७-८

नोव्हेंबर–डिसेंबर
१९७०

अनुक्रमणिका

पंडित द्वारकाप्रसाद मिश्र



यांच्या सार्वजनिक जीवनाच्या अर्धशतीसम्पूर्तीचा महोत्सव दिल्ली येथे नोव्हेंबरमध्ये व्हावयाचा आहे. या मंगल समयी विदर्भ साहित्य संघ कृतज्ञताबुद्धीने प्रणामपूर्वक त्यांचे अभीष्टचिंतन आणि अभिनंदन करीत आहे.

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
वि द र्भ सा हि त्य सं घा चे मु ख प त्र

यु ग वा णी

वर्ष २५] नोव्हेंबर–डिसेंबर १९७० [अंक ७–८

संपादक
शं. बा. शास्त्री

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर–१

या अंकाची किंमत : एक रुपया

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अं त रं ग

अनुक्रमणिका

नाचू कीर्तनाचे रंगी

—डॉ. वि. भि. कोलते

माझ्या लहानपणची आठवण. मोठ्या पहाटे सर्वांच्या आधी उठून आई कामाला लागायची. जात्यावर बसून दळण दळायची—दळण दळताना ओव्या म्हणायची. जोंधळ्याचे दाणे वैरताना मंद झालेली गती वैरून संपले की एकदम वाढायची. जात्याच्या घरघराटाचा तो आवाज ऐकताऐकताच आम्ही उठत असू. बाबाही उठायचे. आणि अंथरुणात बसूनच भूपाळ्या म्हणायचे. 'उठा उठा साधूसंत। साधा आपुले हित। गेला गेला हा नरदेह। मग कैचा भगवंत' ही संत नामदेवांची भूपाळी ते गायचे. 'सिंहनाद शंख भेरी। गजर होतो महाद्वारी। केशवराज विटेवरी। नामा चरण वंदितो' हे शेवटचे कडवे त्यांनी म्हटले की आम्ही हात जोडून मान वाकवून नामदेवांना नमस्कार करीत असू. पुढे पुढे बाबा एकेक कडवे म्हणायचे आणि आम्हाला शिकवायचे. लौकरच आम्ही सर्व जण मिळून भूपाळ्या म्हणायला शिकलो. 'उठा पांडुरंगा आता दर्शन द्या सकळा। झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा' नामदेवांची ही भूपाळीही आमच्या पाठात असायची. अशा रीतीने नाम'स्मरणाने आमचा दिवस सुरू व्हायचा. दिवसभराचा कामधंदा आटोपल्यावर सायंकाळी 'आधी पोटोबा आणि मग विठोबा' या न्यायाने जेवण जेवल्यावर मी विठोबाच्या देवळात जात असे. तिथे दररोज भजन होत असे. हातात टाळ घेऊन त्यात मीही भाग घेत असे. कधी ज्ञानदेवांचा, कधी नामदेवांचा, कधी तुकारामांचा, पण दररोज एक एक नवा अभंग पाठ करून मी तो भजनात म्हणत असे. भजनाच्या शेवटी 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा। वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा। पुंडलिकाभेटी परब्रह्म आले गा। चरणी वाहे भीमा उद्धरी जगा।।' ही आरती म्हणून झाली की 'घालीन लोटांगण वंदीन चरण। डोळयांनी पाहीन रूप तुझे।। प्रेमे आलिंगन आवडी पूजीन। भावे ओवाळीन म्हणे नामा' असे म्हणत म्हणत स्वतःभोवती प्रदक्षिणा घालून हातातील टाळ खाली ठेवायचे आणि विठोबाच्या मूर्तीला साष्टांग दंडवत घालायचा. माझी सकाळ जशी नामस्मरणाने सुरू व्हायची तशी सायंकाळही नामस्मरणाने संपायची.

या दररोजच्या भजनांप्रमाणे एकादशीच्या कीर्तनातही मी भाग घेत असे. अर्थात त्यात माझा भाग केवळ श्रवणभक्तीचा. पण पंढरपूरला पालखी जाताना वारकऱ्यांची मांदी जेव्हा नरवेलमध्ये उतरायची त्यावेळी कीर्तनात आणि दिंडीत नाचण्याचा जो आनंद अनुभवायला मिळत असे तो विशेष. हरीचे डिंगर असलेल्या त्या पंढरीच्या वारीकर वीरांची दिंडी 'रामकृष्ण हरी' 'ज्ञानदेव—तुकाराम' 'निवृत्तिज्ञानदेव सोपान मुक्ताबाई, एकनाथ नामदेव तुकाराम' यातील एकेका चरणाचा निरनिराळ्या वेळा घोष करीत एखाद्या चौकात उभी झाली म्हणजे दोन्ही बाजूंनी वारकरी उभे राहायचे. टाळ—मृदंगाच्या तालावर शतपावली व्हायची. मध्येच एखाद्या वारकऱ्याने अंगणात येऊन भारुड म्हणायचे. त्यातील पालुपद सर्वांनी आळवायचे. नंतर एखादा अभंग गाऊन झाल्यावर दिंडी पुढे जाऊन दुसऱ्या चौकाकडे वाटचाल करू लागायची. अशा रीतीने गावाची प्रदक्षिणा संपवून दिंडी विठोबाच्या देवळासमोर आली म्हणजे तेथे वारकरीप्रमुखाचे कीर्तन उभे राहायचे. वारकऱ्यांच्या कीर्तनाची पद्धत हरिदासी कीर्तनाहून वेगळी. वारकऱ्यांच्या कीर्तनाच्या वेळी अनेक टाळकरी हातात टाळ घेऊन सभोवती उभे राहतात. बुवांनी अभंगाला सुरवात केली की त्या चरणाचा पदर मुख्य टाळकऱ्याने धरून तो म्हणायचा. मागोमाग टाळकऱ्यांनी तो उचलून पुन्हा म्हणायचा. अभंगातील मुख्य चरण, बहुधा

शेवटचा—घोळून घोळून म्हणायचा, निरनिराळ्या रागात आळवायचा. त्यात सर्वांनी भाग घ्यायचा. हा वारकरी कीर्तनातील महत्त्वाचा भाग होय. तेथे पूर्वरंग उत्तररंग नाही. सर्व कीर्तन मूळ अभंगाचे. त्याचा भावार्थ विशद करीत असताना संतांची वचने उद्धृत करायची. आणि पुन्हा मूळ अभंगावर यायचे. या कीर्तनाचा रंग काही आगळाच. टाळमृदंगाच्या घोषात सर्व वारकरी आणि श्रोते श्रवण आणि कीर्तनभक्तीचा आनंद एकाच वेळी लुटतात. देहभान विसरून त्यात रंगून जातात.

'भक्ति प्रेमभाव भरले ज्यांच्या अंगी।
नाचती हरिरंगी नेणती लाजु ॥
हर्षे निर्भर चित्ती आनंदे डोलती।
हृदयी कृष्णमूर्ती भेटी आली ॥
कोंदले हरिरूप देखती विश्वाकार।
सुटले पाझर नयनकमळी ॥
गुढिया रोमांकुरी सात्विके दाटले।
गर्जती विठ्ठले नामघोष ॥'

कीर्तनात वारकरी —

'कृष्ण विष्णु गोविंद। एयां नामांचे निखिल प्रबंध।
माजि आत्मचर्चा विशद। उदंड गाति'

हे दिंडीतील आणि कीर्तनातील वारकरी दृश्य पाहताना होणाऱ्या आनंदाला सीमा नाही. हा अमाप आनंद उपभोगण्याचे भाग्य मला अनेकवार लाभले आहे.

आज या आनंदाचे अत्यंत उत्कटतेने मला स्मरण होते. कारण, या वारकरी कीर्तनपद्धतीचा मांड ज्यांनी प्रथम मांडला त्या संत नामदेवांचा सातवा जन्म-शताब्दी महोत्सव आज सर्वत्र साजरा होत आहे. नामदेवांचे, नव्हे सर्व संतांचे आपणावर फार उपकार आहेत. 'काय सांगू मी या संतांचे उपकार। मज निरंतर जागवीती' हा अनुभव कोणाला आला नाही? 'ब्रह्ममूर्ती संत जगी अवतरले। उद्धरावया आले दीन जना' हे संत नामदेवांचे उद्गार यथार्थ आहेत. संतांनीच या भारताच्या भूमीत भक्तीचा मळा पिक-वला. त्यात सौजन्याच्या, सदाचाराच्या, सर्वभूती समभावाच्या वेली लावल्या आणि त्यावर प्रेमजलाचे वारंवार सिंचन करून त्या बहराला आणल्या. महा-राष्ट्रात ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादी संतांनी हेच कार्य केले. या वारकरी संप्रदायाचा पाया खऱ्या अर्थाने नामदेवांनी घातला. 'ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया॥ नामा तयाचा किंकर। तेणे केलासे विस्तार' हे लौकिकार्थाने म्हटले असले तरी ते यथार्थ नाही. ज्ञानेश्वरी—अमृतानुभवादी ग्रंथ लिहिल्यानंतर नाथ संप्रदायातील ज्ञानदेवांची व नामदेवांची भेट झाली. त्यांनी बरोबर तीर्थयात्रा केल्या आणि त्यानंतर ज्ञानदेव वारकरी संप्रदायात प्रविष्ट झाले असे दिसून येते. त्यावरून वारकरी संप्रदायाच्या पायाभरणीचे कार्य नामदेवांनी केले असे म्हणणे ऐति-हासिक दृष्टीला धरून होईल. महाराष्ट्रातील या सर्व संतांच्या कार्याची बैठक एकच असली तरी त्यातही प्रत्येकाचे काही आगळेपण होते संत नामदेवांच्या कार्यातही असे आगळेपण असल्याचे दिसून येईल.

करा हितगुज नामयाशी

भावभाळेपण। सामान्या साधेल
जिव्हाळ्याची कळ। असामान्य ॥ १ ॥
भक्तीचा उमाळा। दुर्लभ जीवनी
विठ्ठल पाषाणी। दडलासे ॥ २ ॥
नामदेवासंगे। नैवेद्य—सेवन
झाले आज स्वप्न। प्रगताला ॥ ३ ॥
तरी कच्चा होता। पुढे पक्का झाला
विसोबाने दिला। आत्मबोध ॥ ४ ॥
नाम्याची 'पायरी'। चढता उद्धरी
ओळखा पायरी। आपापली ॥ ५ ॥
मानवाने केली। अमाप प्रगती
सद्भाव—संगती। लागेच ना ॥ ६ ॥
अहंकार—वारा। लागे प्रागतिका
ध्येय—साध्य नौका। झोके घेत ॥ ७ ॥
कल्पनेची बाधा। ठाके अन्तरात
मंत्र प्राणिजात। गवसेना ॥ ८ ॥
धर्म भागवत। मानव्याचे मूळ
विश्व उद्धरील। हेळामात्रे ॥ ९ ॥
सद्भावाची वाण। भासतसे आज
करा हितगुज। 'नामया'शी ॥ १० ॥

—ज्ञानेश्वर साधु

वारकरी संप्रदायातील कीर्तनपद्धतीची त्यांनी केलेली उभारणी हे त्यांचे असे एक आगळेपण होय.

नामदेव जसे भक्तसम्राट होते तसेच भक्ति-सम्राटही होते. 'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पाद-सेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम्' ही नवविधा भक्तीची लक्षणे जशी त्यांच्या जीवनात सर्व-स्वाने व्यापून होती तशी त्या जीवनातून प्रस्फूर्त झालेल्या अभंगवाणीतूनही उत्कटतेने उतरलेली आहेत. या नवविध भक्तीचा एकसमयावच्छेदेकरून साक्षात्कार जसा कीर्तनभक्तीतून होतो तसा अन्य प्रकारातून होत नाही. पादसेवन, अर्चन, दास्य हे सगुण मूर्तीच्या ठायी विशेषत्वाने घडते हे खरे, पण विठ्ठलस्वरूप भक्तांच्या ठिकाणी ते कीर्तनप्रसंगीही अप्रत्यक्षपणाने घडतच असते. श्रवण, कीर्तन, स्मरण, सख्य, आत्म-निवेदन इत्यादी प्रकारांची भक्ती ही कीर्तनात अवश्य-मेव घडतेच. त्यामुळेच कीर्तनभक्तीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. तेथे हरिदासांना आणि श्रोत्यांना सारखेच भक्तिभाग्य लाभते. जनाबाईने म्हटल्या-प्रमाणे 'कीर्तनाचा रस आवडे नरासी' – एकांतातील स्मरणादिकापेक्षा समाजातील कीर्तनाची गोडी सर्व-सामान्यांना अधिक असते. ईश्वरप्राप्तीचे साधन म्हणून कीर्तनाची श्रेष्ठता वर्णन करताना नामदेव म्हणतात : 'व्रत तप नलगे करणे सर्वथा । नलगे तया तीर्था जाणे आम्हा ।। आपुलेचि ठाया असा सावधान । करा हरिकीर्तन सर्व काळ.' शिवाय ज्ञानदेवांनीही 'तरि कीर्त्तनाचेनि नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे । जे नाव नाही पापाचे । ऐसे केले ।। ऐसेनि माझेनि नामघोषे । नाही करीत विश्वाची दुःखे । आघवे जगचि महासुखे । दुमदुमीत भरले ।।' असा कीर्तनाचा महिमा गाइला आहे.

या कीर्तनपद्धतीला सामाजिक आशयही मोठा आहे. कीर्तनाच्या सोहोळचात सर्व वर्णाचे लोक एकत्रित येतात. 'काळवेळ नसे नामसंकीर्तनी । उंच नीच योनी हेही नसे' हे जसे नामसंकीर्तनाच्या बाबतीत खरे आहे तसे कीर्तनाच्याही बाबतीत खरे आहे. नामदेव सांगतात :—

कीर्तनाच्या सुखे सुखी होतो देव ।
कोणते वैभव वाणी आता ।।
अंत्यज आणि जातिवंता ।
मुखी नाम घेता उडी घाली ।।
बैसोनी आसनी आळविता नाम
उभा सर्वोत्तम तया पुढे ।।
प्रेमाचिये भरे उम्याने गर्जता ।
नाचे हा अनंत तयासवे ।।
नामा म्हणे तया कीर्तनाची गोडी ।
घालीतसे उडी नेटे पाटे ।।

कीर्तनपद्धतीचा हाच आशय ज्ञानदेवांनीही वर्णन केला आहे.

परि राया रंका पाडु धरू ।
नेणति सानेया थोरा कडसणी करू ।
एकसरे आनंदाचे आवारू । होत जगा ।।
कहीं येकाधेत वैकुंठा जावे ।
ते तिही वैकुंठचि केले हे आघवे ।
ऐसे नामघोष गौरवे । धवळले विश्व ।।

कीर्तन हे प्रचाराचेही एक महत्त्वाचे साधन आहे. कारण त्यात गायन आणि वादन या दोन्ही कलांचा समावेश होतो. तुकाराम महाराज म्हणतात, 'गायनाचे रंगी । शक्ति अद्भुत हे अंगी' 'गाये नाचे वाये टाळी । साधन कळी उत्तम हे' आणि म्हणून 'कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरूप ।। प्रेमासवे नाचे डोले । हारपला देहभाव.' ह्या गायनवादनांच्या कलांनी कीर्तनात रंग भरत असल्यामुळे साधेभोळे सर्व लोक त्याकडे आकृष्ट होतात. मग त्यांच्याबरोबर भक्ति-संवाद करून त्यांच्या अंतःकरणात ज्ञानदीप उजळता येतो. नामदेवांनी हे ओळखले. आणि बहुधा याच दृष्टीने कीर्तनाचा प्रचारसाधन म्हणून त्यांनी स्वीकार केला. त्यांचे कीर्तन स्वान्तःसुखाय, स्वतःच्या उद्धारासाठी तर होतेच पण दीनजनांच्या उद्धारासाठीही होते.

याच हेतूने संत नामदेवांनी 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी' हे व्रत स्वीकारले. आणि कीर्तनपद्धतीची नवीन मांडणी केली. नामदेवांशी ज्ञानदेवांची भेट झाल्यावर ते या संप्रदायात प्रविष्ट झाले आणि नामदेवाबरोबर कीर्तन रंगात रंगू लागले. नामदेवाने कीर्तन करावे त्यावेळी ज्ञानदेवांनी त्यांचे ध्रुपद धरून अभंग म्हणावा.

नामदेवांच्या या कीर्तन रंगाचे मोठे भावनोत्कट वर्णन जनाबाईने केले आहे.

(पुढील मजकूर पान ४१६)

संत नामदेव आणि गुरू नानक

—माधव गोपाळ देशमुख

भारताच्या सांस्कृतिक उत्थानात संत नामदेव आणि गुरू नानक या दोन विभूतींचे फार महत्त्वपूर्ण स्थान आहे. भारताच्या सामाजिक आणि धार्मिक इतिहासात वारकरी संप्रदाय आणि शीख संप्रदाय यांची थोरवी सर्वज्ञात आहे. या दोन संप्रदायांचे उद्गाते म्हणून संत नामदेव आणि गुरू नानक हे सुविख्यात असून त्या दोहोंचा एकत्र विचार करणे अतिशय कुतूहलजनक आहे.

१९६९ हे वर्ष भारताच्या इतिहासात महात्मा गाधींची जन्मशताब्दी या नात्याने गाजले असले, तरी याच वर्षाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे या वर्षी गुरू नानक यांची पाचवी जन्मशताब्दी आणि त्या नंतरच्या वर्षभरातच संत नामदेव यांची सातवी जन्मशताब्दी साजरी करण्याचा सुयोग भारताला लाभला आहे.

भारतीय धर्मसप्रदायांचे अनन्यसाधारण वैशिष्टय

'अनेकतेत एकता' हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्टय आहे. अनादिकालापासून या देशातील द्रष्टे आणि संत यांनी सर्व जगाला सदाचरणाचे आदर्श पाठ घालून दिलेले आहेत. भारतात नाना भाषा, नाना धर्मपंथ आहेत, ही गोष्ट खरी; पण त्या सर्वांमधून ज्या सत्याचे प्रतिपादन केलेले आहे, ते मात्र एकच एक आहे.

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवाः ॥

या देशात जन्मलेल्या विद्वान लोकांपासून पृथ्वीवरील सर्व प्रकारच्या माणसांनी आपआपले आचरण कसे ठेवावे, या विषयाचे धडे शिकता आलेले आहेत. प्राचीन भारतीय द्रष्टे आणि संत यांना ही प्रतिष्ठा लाभू शकली, याचे मुख्य कारण म्हणजे त्यांची आध्यात्मिक स्वातंत्र्यावर गाढ श्रद्धा होती. सर्व मानव समान आहेत व अखिल मानवजातीचे मिळून एकच कुटुंब आहे या गोष्टींवर त्यांचा विश्वास आहे.

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानाम् तु वसुधैव कुटुम्बकम् ॥

हा आपला, हा परका, अशी वृत्ती संकुचित बुद्धीचे निदर्शक आहे; पण ज्यांचे आचरण उदारतेने भरलेले आहे, त्यांना ही पृथ्वी म्हणजे एका कुटुंबासारखी वाटते. अशा उदारचरित श्रेष्ठांनी इतरांची धर्ममते व इतरांची अपरोक्षानुभूती या संबंधी सहिष्णुवृत्ती बाळगावी, हे क्रमप्राप्तच आहे.

भारतातील सर्वसामान्य लोकांच्या ठिकाणी आज अशी उदार व सहिष्णु वृत्ती नाही, हे उघड आहे. सुप्रसिद्ध इतिहासज्ञ अर्नोल्ड टॉयन्बी यांनी तर असे परखड उद्गार काढले आहेत की, "भारतातील हिंदू आणि मुसलमान यांचे संबंध अगदी प्रथम भेटीपासूनच दुराव्याचे आहेत. त्यांची वागणूक म्हणजे तेल आणि व्हिनिगर यांचे मिश्रण! इस्लाम धर्माचे हिंदू धर्मावरील आक्रमण हे हिंसाचारी होते. जगातील या दोन श्रेष्ठ धर्मांचे परस्पर संबंध म्हणजे परस्पर हेव्यादाव्यांची आणि शत्रुत्वाची दुःखद कहाणी आहे."[१]

पण या थोर इतिहासज्ञाला देखील या गोष्टीची कबुली द्यावी लागली की, सर्वसामान्य लोकांमध्ये परस्पर गैरसमज असले, तरी याच दोन धर्मातील,

१. *The sacred writings of the sikhs :* Unesco Publication, 1967, Foreword by Arnold Toynbee, P. 10.

थोडया का होईना, पण विचारवंतांनी एक गोष्ट ओळखली होती. हिंदू आणि मुसलमान या दोन्ही धर्मांच्या मुळाशी असलेले धार्मिक सत्य हे एकच आहे; त्याच तत्त्वाच्या वेगळया मांडणीमुळे परस्पर गैर-समाजाला जागा मिळाली आहे.

'एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति' या न्यायाने या दोन धर्मांच्या मांडणीमध्ये जी तफावत निर्माण झाली होती; ती दूर करून त्यांना समान भूमिकेवर आणण्याचे कार्य पहिल्याप्रथम अतिशय प्रभावीपणे आणि यशस्वीपणे गुरू नानकांनी केले. हिंदू धर्मात जन्म घेतला असूनही त्यांनी इस्लाम धर्मातील एकेश्वर वादावर भर दिला आहे आणि हिंदू धर्मातील तथा-कथित जातिवादाचे त्यांनी उच्चाटन केले. ते ज्या शीख संप्रदायाचे गुरुस्थान मानले जातात, त्याचे भारतीय धर्मांच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे त्या संप्रदायाने हिंदू आणि मुसलमान यांच्या धर्मातील मूलभूत आणि वादातीत अशा तत्त्वां-वर जोर देऊन त्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. आणि त्यांच्यातील सुसंवाद कोठे आहे, तो उकलून दाखविला. गुरू नानक आणि त्यांचा शीखसंप्रदाय यांचे हे धार्मिक आणि आध्यात्मिक कार्य सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे आहे.

'नामदेव' आणि 'नानक' या नावांची अन्वर्थकता

गुरू नानकांच्या या कार्यात त्यांच्या आधी बरोबर दोनशे वर्षापूर्वी जन्मलेल्या संत नामदेवांचा काय वाटा आहे, हे पाहण्यासारखे आहे. वारकरी संप्रदायाचे आद्य प्रवर्तक म्हणून संत नामदेवांची ओळख प्रत्येक मराठी भाषिकाला आहे. ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ सहकारी, तसेच जनाबाईला आणि शिवकाळा-तील तुकारामांना अभंगस्फूर्ती देणारे म्हणूनही ते सुविख्यात आहेत. महाराष्ट्र–सारस्वतातील मुकुटमणी समजल्या जाणाऱ्या ज्ञानेश्वरीचे पहिले समीक्षक आणि मूल्यमापक संत नामदेवच.

नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी ।
एक तरी ओवी अनुभवावी ॥

या नामदेव चरणांचा परिचय कोणाला नाही ?

महाराष्ट्रातील अनेक साधुसंतांना स्फूर्तिदाते ठरलेले संत नामदेव हे पंजाबातील शीखधर्म संस्थापक गुरू नानक यांचेही स्फूर्तिस्थान होते. ही अभिमानास्पद गोष्ट आहे.

नामदेव आणि नानक यांचा असा परात्पर गुरू–शिष्य–संबंध असून त्यांच्या नावातूनच या संबंधावर विशेष प्रकाश पडतो. नामदेव या शब्दाचा अर्थ 'नाव हाच देव' असा असून नामस्मरणाने ईश्वराची प्राप्ती होते, हे तत्त्व नामदेवांनी आपल्या 'नाम माहात्म्या'वरील अभंगांत परोपरीने पटवून दिले आहे. नाम माहात्म्यावरील नामदेवांचे अभंग पाहिले म्हणजे जणू काही आपल्या नावाची सार्थकता सिद्ध करण्यासाठीच 'नामा म्हणे'चा एवढा मोठा प्रपंच त्यांनी केला आहे, असा भास होतो.

'नानक' हा पंजाबी भाषेतील शब्द असून तो संस्कृतातील 'नान्यक' (त्या सारखा दुसरा नसलेला, अद्वितीय) या शब्दापासून सिद्ध झालेला आहे, हिंदू–मुसलमानांच्या तीव्र संघर्षाच्या काळात जन्म झाला असूनही—

गुरु नानक शाह फकीर ।
हिंदूका गुरु मुसलमानका पीर ॥

अशी ख्याती केवळ नानकांचीच झाली व त्यांचे नानक (नान्यक) हे नाव सार्थ ठरले.

संत नामदेव हे गुरु नानकांचे स्फूर्तिस्थान

गुरू नानक हे शीख संप्रदायाचे प्रवर्तक समजले जात असले, तरी त्यांनी 'शीख' नावाचा काही वेगळा संप्रदाय स्थापन केला किंवा तसा त्यांचा काही उद्देश होता, असे दिसत नाही. 'सिक्ख्' हा पंजाबी शब्द संस्कृतातील 'शिष्य' या शब्दापासून आलेला असून नानकांना 'गुरू'ही पदवी मिळाल्यामुळे त्यांचे अनुयायी हे स्वाभाविकपणेच त्यांचे 'शिष्य' किंवा 'सिक्ख्' बनले व त्यांच्या वागणुकीच्या नियमांना 'शीखधर्म' किंवा 'शीखसंप्रदाय' असे नाव रूढ झाले.

शीख संप्रदायाचा मूलाधार म्हणजे 'आदिग्रंथ' किंवा 'ग्रंथसाहेब' होय. 'आदिग्रंथा'त गुरू नानक ते गुरू गोविंदसिंह अशा एकूण दहा शीख गुरूंची पदे समाविष्ट केलेली असून, त्यांशिवाय गुरू नानकांच्या समकालीन आणि पूर्वकालीन अशाही अनेक भारतीय हिंदू आणि मुसलमान साधुसंतांची पदे त्यात समाविष्ट केलेली आहेत.

'आदिग्रंथा 'त समाविष्ट झालेले दहा गुरू व इतर साधुसंत यांचे कार्यकाल असे आहेत—

(१) गुरू नानक (१४६९–१५३९), (२) गुरू अंगद (१५०४–१५५२), (३) गुरू अमरदास (१४७९–१५७४), (४) गुरू रामदास (१५३४–१५८१),(५) गुरू अर्जुन(१५६३–१६०६), (६) गुरू हरगोविंद (१५९५–१६४४), (७) गुरू हरराय (१६३०–१६६१), (८) गुरू हरकिशन (१६५६–१६६४), (९) गुरू तेगबहादूर (१६२१–१६७४), (१०) गुरू गोविंदसिंग (१६६६–१७०८). या दहा गुरूंखेरीज आणखी ज्यांची पदे, आदिग्रंथात समाविष्ट आहेत. त्यांपैकी काही नावे अशी— फरीद, बेणी, जयदेव (बारावे शतक), सधना, त्रिलोचन व नामदेव (तेरावे शतक), रामानंद, सेन, पीपा, कबीर, रविदास (चौदावे शतक व पंधरावे शतक), धन्ना, भिक्कन, सूरदास, परमानंद (सोळावे शतक).

यांपैकी गुरू नानकांच्या पूर्वी होऊन गेलेले सर्व साधुसंत हे त्यांचे स्फूर्तिदाते होत, हे सांगावयास नकोच. पण त्यातल्यात्यात गुरू नानकांनी पूर्व सूरींपैकी नामदेवांपासून जास्तीत जास्त ऋषि–ऋण घेतले आहे. हे 'आदिग्रंथा 'च्या आधारे सहजच लक्षात येते. 'आदिग्रंथा 'चा परिचय करून घेण्यापूर्वी, गुरुनानक–कालीन सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला, तर गुरू नानकांनी संत नामदेवांपासून आपल्या विचारविज्ञानाची स्फूर्ती का घ्यावी, या प्रश्नाचाही उलगडा होईल.

नानक कालीन धार्मिक आणि राजकीय परिस्थिती

गुरू नानकांचा उदयास्त ज्या काळात झाला (१४६९–१५३९) तो काळ केवळ भारतातच नव्हे, तर युरोपमध्येही एका विचारक्रांतीच्या वातावरणाने भारलेला होता. इंग्लडमध्ये त्या काळाला धार्मिक आणि राजकीय विचार क्रांतीच्या पुनरुज्जीवनाचा काळ (रेनासांस) असे नाव सुप्रसिद्ध आहे. या काळात भारतातही सार्वत्रिक अशी धार्मिक विचारक्रांती घडत होती. कारण याच सुमारास उत्तर प्रदेशात रामानंद आणि कबीर, त्याचप्रमाणे दक्षिणेकडे नामदेव आणि एकनाथ यांनी समाजमनात रुजविलेल्या भागवत धर्माची दृश्य फळे दिसू लागली होती. गुरू नानकांचे गुजरात–राजस्थान कडील समकालीन वल्लभाचार्य आणि बंगालकडील चैतन्यमहाप्रभू, राजपुतान्यातील संत मीराबाई आणि उत्तरेकडील विख्यात संत तुलसीदास यांनी भारतातील भक्तिमार्गाला किती उत्कर्षावस्थेप्रत पोचवले होते, याची इतिहासज्ञांना स्पष्ट कल्पना आहे.

गुरू नानकांच्या[2] काळात हिंदू आणि मुसलमान हे दोन्ही धर्म अगदी खालच्या पातळीवर आणि भ्रष्ट स्थितीस येऊन पोचले होते. शहाणेसुरते लोक तंत्र-विद्येत गुंग झाले होते. आणि सर्वत्र जाती आणि उप-जाती यांचे आत्यंतिक स्तोम माजले होते. हिंदू लोक व्रतवैकल्यांना बळी पडून धर्माचे मूलतत्त्व विसरले होते. मुसलमानांचीही परीस्थिती अशीच अधोगतीची होती. तत्कालीन हिंदू–मुसलमानांच्या धार्मिक भ्रष्टतेचे वर्णन 'रामकली–दि–वर' या आपल्या पदात गुरू नानकांनी अतिशय परखडपणे केले आहे.

हिंदूच्या पोटी जन्मला को झाला हिंदू
तो गळयात जानवे अटकवतो, पण
दुष्कृत्ये मात्र सोडीत नाही.

"त्याची आत्मशुद्धी कशी होणार ? "

"आपण मुसलमान आहोत या गोष्टीचा मुसलमानाला केवढा अभिमान ! पण त्याला योग्य मार्गदर्शक मिळू शकत नाही, म्हणून त्याला सन्मार्ग दिसत नाही. आणि सत्कृत्य केल्याशिवाय त्याच्यासाठी स्वर्गाचे दार कसे उघडणार ? "

" वास्तविक ईश्वर सर्वत्र भरून राहिलेला आहे, त्यानेच आपण सर्वांना निर्माण केले आहे, हे ज्याने ओळखले, तोच खरा हिंदू व तोच खरा मुसलमान !"

—पण दुर्दैवाने त्यांच्या काळात व खरे हिंदू खरे मुसलमान फारच कमी होते.

तत्कालीन धार्मिक परिस्थिती अशी हलाखीची होती. राजकीय परिस्थिती तर त्याहूनही विकट होती. 'राग–मझ–की–वर' या पदात गुरू नानकांनी म्हटले आहे.

"हे युग म्हणजे म्यानातून काढलेल्या तरवारी-सारखे आहे.

---

2. Guru Nanak : His life, Time and Teachings (Guru Nanak Foundation, Quin. Centenary Volume) P 30 et seq.

राजे लोक खाटिक बनलेले आहेत.

असत्याच्या अंधाऱ्या रात्री चांगुलपणाला पंख फुटून तो उडून गेला आहे.

सत्याचा चंद्रप्रकाश कोठेही दिसत नाही मी सत्याच्या पाठीमागे धावतो आहे पण जात आहे मात्र भलतीकडेच !"

"या अंधारात मला मार्ग दिसत नाही. मानव हट्टाला पेटला आहे; तो क्षुद्र स्वार्थाला चिकटला आहे. त्यामुळे माझ्या मनाला वेदना होतात. नानक विचारतो; मुक्तीचा मार्ग कोठे आहे ?"

१५२१ च्या सुमारास मोगलांनी पंजाबावर हल्ले करून जे अनन्वित अत्याचार केले, ते गुरू नानकांनी आपल्या डोळ्यांनी पाहिले होते.

भक्तिमार्गाचा उदय

अशा विषम परिस्थितीत हिंदू आणि मुसलमान या दोन्ही धर्मातील विचारवंत साधुसंतांनी आपापल्या अनुयायांतील परस्पर द्वेषाची कटुता नाहीशी करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. हिंदू लोक मूर्तिपूजक आहेत, ते जातिभेद पाळतात, म्हणून मुसलमान राज्यकर्ते त्यांचा छळ करू लागले. पण भक्तिमार्गीय संतांना या दोन्ही गोष्टी मंजूर नव्हत्या. त्यांनी ईश्वराच्या भक्तीवर आणि मानवामानवामधील बंधुत्वावर जोर दिला. अल्ला म्हणा वा खुदा, परमेश्वर म्हणा वा राम, ईश्वर तोच आणि एकच आहे. मानवाची श्रद्धा कशावर आहे किंवा कुणावर आहे, हेही महत्त्वाचे नसून त्याचे आचरण हीच मानवतेची खरी कसोटी आहे. कुराण आणि पुराण या दोघांनीही मानवी प्रेम आणि मानवी समता हीच प्रतिपादिली आहेत. ईश्वरापुढे सर्व समान आहेत, हीच शिकवण सूफी संतांनी व भक्तिमार्गी संतांनीही सर्वांना दिली आहे. हाच ईश्वर भक्तीचा आणि मानवी प्रेमाचा संदेश त्यांनी गावोगाव हिंडून जत्रा, उत्सव, संस्कार इ. प्रसंगी विविध मार्गांनी पसरविला.

याच भक्तितत्त्वाचा साक्षात्कार गुरू नानकांनाही झाला. भोवतालच्या परिस्थितीवर आणि पूर्वसूरींच्या शिकवणीवर चिंतन करण्यात मग्न असता असाच एकदा त्यांच्या तोंडून अचानक उद्‌गार निघाला :

"या जगात कोणी हिंदू नाही. या जगात कोणी मुसलमान नाही. येथे फक्त मानव आहे."

अशा रीतीने त्यांनी मानवामानवामधील बंधुतेचा जगाला संदेश दिला.

गुरू नानकांनी कोणत्या परिस्थितीत हा संदेश दिला हे लक्षात घेतले व त्यांच्या संदेशातील प्रमुख तत्त्वे कोणती हे पाहिले, तर त्यांचे स्फूर्तिस्थान प्रामुख्याने 'नामदेव'च ठरतात, याचा उलगडा होईल.

'आदिग्रंथा'च्या संदर्भात नामदेव आणि नानक

शीख संप्रदायाचा आध्यात्मिक मूलाधार म्हणजे 'आदिग्रंथ' किंवा 'गुरुग्रंथसाहेब' हा होय. शिखांचा आद्य गुरू म्हणजे गुरू नानक असले, तरी आणि 'आदिग्रंथा'त त्यांना महत्त्वपूर्ण स्थान असले तरी 'आदिग्रंथा'ची रचना आणि संकलन मात्र गुरू नानकांच्या पश्चात् शिखांचे सहावे गुरू अर्जुन यांनी केली. आदिग्रंथात नानकपूर्व आणि नानकोत्तर अशा साधुसंतांची रचना आहे. त्याच प्रमाणे त्यांचे संकलन गुरू अर्जुन यांच्या नंतरच्या गुरूंचीही रचना एकत्रित केली आहे. शिखांचे शेवटचे व दहावे गुरू गोविंदसिंग यांनी मात्र आपल्या आधिकारात 'आदिग्रंथा'चा समारोप केला. आणि शिखांना असा आदेश दिला की, यापुढे शिखांना कोणीही मानवी गुरू राहणार नाही. आपला आदेश कृतीत आणण्यासाठी गुरू गोविंदसिंग स्वत: 'शिख' बनले; आणि 'आदिग्रंथ' हाच आता शिखांचा एकमेव गुरू किंवा 'गुरुग्रंथसाहेब' होय, असे त्यांनी जाहीर केले. गुरू गोविंदसिंगांच्या सुप्रसिद्ध घोषणेचाच जणू काही तीनशे वर्षांनंतर लोकमान्य टिळकांनी पुनरुच्चार केला. त्यांचेही म्हणणे असेच होते :

"मानवी गुरू हे काही जन्मभर पुरत नाहीत, ग्रंथ हेच आमचे गुरू होत."

'आदिग्रंथा'चे स्वरूप सर्वधर्मसमावेशक व सर्वव्यापक आहे. त्यातील विचारात बाह्यत: क्वचित भिन्नता आढळत असली, तरी त्या भिन्नतेतही मूलभूत तत्त्वाबद्दल एकवाक्यता आहे. आदिग्रंथाच्या अशा व्यापक आणि सर्वस्पर्शी भूमिकेमुळे तो ग्रंथ म्हणजे केवळ शिखांचे आणि भारतीयांचेच नव्हे, तर अखिल

मानवजातीचे एक जागृत आणि चालते-बोलते गुरु-स्थान होऊन राहिला आहे.

संत नामदेवांच्या विचाराचा नानकवाणीवर प्रभाव

'आदिग्रंथा'त गुरू नानकांची ९७४ व संत नामदेवांची ६१ पदे घेतलेली असून त्यांच्यामधील विविध प्रकारच्या साम्यदर्शनावरून गुरू नानकांवर संत नामदेवांचा किती प्रभाव आहे, याची कल्पना सहज येऊ शकेल.

ज्या एका विशिष्ट राजकीय व धार्मिक परिस्थितीत गुरू नानकांना आपल्या शिष्यांना व तद्वारा अखिल मानवजातीला एका नव्या व्यापक व सर्व समावेशक तत्त्वाचा संदेश द्यावयाचा होता, त्या संदेशाचे स्वरूप प्रथम समजावून घेतले, तर त्यात संत नामदेवांच्या शिकवणीचा किती अंश उतरला आहे, हे सहज लक्षात येईल.

'आदिग्रंथा'चा प्रारंभ गुरू नानकांच्या 'जपजी' म्हणजे 'प्रातःस्मरण' या 'मूलमंत्रा'पासून झाला आहे. गुरू नानकांच्या अर्थात शीख संप्रदायाच्या शिखवाणीचे सारसर्वस्व म्हणजे 'मूल मंतर' होय. त्यात गुरू नानकांनी जे ईश्वराचे ध्यान किंवा गुणगायन केले आहे, ते त्यांच्याच अमर वाणीतून ऐकले पाहिजे. गुरू नानक म्हणतात—

इक ओंकार, सत्नाम, कर्ता पुरख्
निर्भउ, निर्वैर, अकाल मुरत्
अजूनि-से-भंग गुरप्रशाद

हा मूलमंत्र तत्कालीन रूढ भाषेत असून त्याचे धावते रूपांतर असे—

(१) ईश्वर हा ओंकार-स्वरूप असून तो एक आहे.
(२) सत् अर्थात चिरंतन सत्य हे त्याचे नाव आहे.
(३) सर्व चराचराचा कर्ता तो आहे.
(४) तो निर्भय आहे.
(५) तो अजातशत्रू आहे.
(६) त्याचे अस्तित्व हे कालातीत आहे.
(७) तो अजन्मा आहे.
(८) तो स्वयंभू आहे व त्याची प्राप्ती गुरु-प्रसादामुळे होऊ शकते.

ईश्वराचे स्वरूप असे पुराण व सनातन असल्यामुळे मी जगाला काही ईश्वरविषयक नवा संदेश देत आहे, असा गुरू नानकांचा दावा नव्हता. गुरू नानकांनी आपल्या मूलमंत्रासाठी वेद आणि कुराण यांचा सर्वस्वी आधार घेतला नाही. म्हणूनच त्यांना आपले तत्त्व हे सर्व-समावेशक व व्यापक करता आले.

गुरू नानकांचा हा 'मूलमंतर' म्हणजे अथपासून इतिपर्यंत, केवळ नामदेवांनाच काय, पण सर्वच भक्तिमार्गी वेदान्तवाद्यांना मान्य असलेला आहे. गुरू नानकांनी त्यात वेदान्त आणि भक्ती यांचा उत्कृष्टपणे समन्वय केलेला आहे. गुरू नानकांपूर्वीच्या भक्तिपंथीयांनी जे जे मांडून ठेवले, त्याचाच त्यांनी यथोचित अनुवाद करून ठेवला आहे. वास्तविक गुरू नानकांनी मानवजातीला काही अभिनव संदेश दिला की काय, हा प्रश्नच अप्रस्तुत आहे. कारण त्यांच्यासारख्या थोर विभूती इतिहास निर्माण करतात हे जितके खरे आहे, तितकेच अशा थोर विभूतींनाही इतिहास निर्माण करीत असतो, हेही खरे आहे. अर्थात् गुरू नानकांनी 'जपजी'च्या सुरवातीला म्हणून ठेवल्याप्रमाणे—

"अगदी प्रारंभी सत्य होते,
युगायुगात सत्य राहात आले आहे.
नानक म्हणतो : ते सनातन सत्य आजही आहे
आणि तेच यापुढेही सतत राहणार आहे"

मी काही तरी सर्वस्वी नवीन अशा सत्याचा साक्षात्कार दाखविणार आहे, असे आजवरच्या कोणत्याही नव्या धर्मसंस्थापकाने सांगितलेले नाही. कालातीत असलेल्या एका चिरंतन तत्त्वाचाच सर्वांनी पुरस्कार केला. फक्त भाषा आणि परिभाषा मात्र वेगळी वापरली. गुरू नानकांनी आपल्या तत्त्वप्रतिपादनात भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्रस्थानत्रयींचा म्हणजे ब्रह्मसूत्र, उपनिषदे आणि भगवद्‌गीता यांचा यथोचित उपयोग केला, यात काहीच नवल नाही. पण याचा अर्थ त्यांनी प्रस्थानत्रयीत जे जे काही आहे, त्याचा सर्वस्वी पाठपुरावा केला, असा नाही.

त्यांनी आपल्या जीवनात जे पाहिले व जे अनुभवले, त्याचा त्यांच्या तत्त्वप्रणालीवर विशेष प्रभाव पडला, हे सांगणे नको. आपल्या शिकवणुकीत त्यांनी

कोणकोणत्या तत्त्वांवर विशेष भर दिला, ते मात्र पाहिले पाहिजे. परंपरागत हिंदुधर्मातील अतिरेकी विषमतेचा आणि जातीय भेदभावांचा त्यांनी प्रसंग येईल तेव्हा तेव्हा धिक्कार आणि निषेध केला आहे. हिंदुधर्माच्या मूलभूत व स्वयंप्रकाशी तत्त्वप्रणालीवर कुविचारांची, दुराचराची, गतानुगतिकत्वाची आणि रूढिपिसाटपणाची जी जळमटे आणि पुटे चढली होती ती झटकून टाकून, कोरड्या कर्मकांडाचा आणि व्रतवैकल्याचा भार दूर फेकून त्यांनी खऱ्याखुऱ्या ईश्वराची मध्यवर्ती जागेवर पुन:स्थापना केली आणि मानवी जीवन आध्यात्मिकदृष्टचा अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

हे सर्व करण्यासाठी आपल्या आचरणात आणावयाच्या ज्या प्रमुख गोष्टींवर गुरू नानकांनी विशेष भर दिला, त्या पाच गोष्टी अशा :

(१) 'नाम'–पूजा अर्थात् ईश्वराचे स्तवन करण्यासाठी नावाचे 'गान',
(२) दान–सर्वांच्या ठिकाणी उदारता,
(३) अस्नान–शरीरशुद्धीसाठी प्रात:स्नान,
(४) सेवा–मानवजातीची व ईश्वराची सेवा, आणि—
(५) सिमरण–ईश्वराचे अखंड नामस्मरण (आत्मज्ञान, कृपाप्रसाद आणि बंधविमोचन व्हावे म्हणून).

गुरू नानकांच्या तत्त्वज्ञानात आणि त्यांच्या शिकवणीत ईश्वराचे नाम आणि त्याचे स्मरण यांना जे अग्रगण्य स्थान आहे, त्याचे मूलस्थान कोणते ? ज्यांची ६१ पदे 'आदिग्रंथा'त स्थानापन्न झाली आहेत व ज्यांच्या अनेक भक्तांचीही पदे त्यात आलेली आहेत, ते 'नाममहिमा' गाणारे आणि गुरू नानकांना 'नाम' आणि 'नामस्मरण' यांची प्रेरणा देणारे संत नामदेव होत, यात काही शंका उरत नाही. संत नामदेवांइतकी नामाची महती इतर कोणीही गायिली नाही.

नामापरता मंत्र नाही त्रिभुवनीं ।
ऐसी बोले वाणी वेदशास्त्रीं ।।
(गाथापंचक ना. गा. अ. ६७०)

नामदेवांप्रमाणेच गुरू नानकांचाही मूलमंत्र 'नाम' हाच होता.

नामदेव म्हण सद्गुरू पासोनी ।
नाम या शोधूनी भावमुक्त ।। (अ. ६७०)

नामी नारायण । होय भक्तांचे आधीन ।
न मागतां भक्ती । नामापासी चारी मुक्ती ।।
भुलों नये जाण । नाम वैकुंठीं निशाण ।।
नामा म्हणे ऐसे प्राणी । सम होती नारायणीं ।।
(अ. ६७२)

शास्त्रांचें हें सार वेदांचें गव्हार ।
तें नाम परिकर विठोबाचें ।।
नामा म्हणे नलगे साधन आणिक ।
दिधली मज भाक पांडुरंगें ।। (अ. १९१८)

'नाम संकीर्तन मज वाटे गोड ।
येर तें काबाड वाचाविण ।।'

असा नामदेवांचा अनुभव असून 'नामयाने नाम जोडिलें निधान' असे नामदेव–पुत्र विठा म्हणतो. 'न पढावे वेद नको शास्त्रबोध । नामाचे प्रबंध पाठ करा ।।' असा नामदेवांचा संदेश आहे. म्हणूनच 'याणें प्रसिद्ध केलें विठ्ठल हें नांव भव्य देवाचें ।' असे कविवर्य मोरोपंतांनी त्यांना दिलेले प्रशस्तिपत्र योग्य वाटते.[४]

नामदेव आणि ईश्वरनाममाहात्म्य यांचे मराठी वाङ्मयात जसे समीकरण झालेले आहे, तसेच ते नामदेवांची जी हिंदी पदे आहेत व विशेषेकरून जी पदे 'आदिग्रंथा'त समाविष्ट झाली आहेत, त्यातही आहे. 'आदिग्रंथा'त संत नामदेव म्हणतात.

कहा करउ जाती कहा करउ पाती ।
रामको नामु जपउ दिनराती रहाउ ।।१।।
रांगनि रांगऊ सोवनि सावउ ।
राम नाम बिनु जपउ दिन न जीवउ ।।२।।[५]

हा एक नमुना म्हणून दिला. संत नामदेवांनी किती तरी हिंदी रागदारीच्या पदांत नामाची महती गायली असून, तिचाच प्रत्यक्षाप्रत्यक्ष अनुवाद गुरुनानकांनीही आपल्या पदांत केला आहे.

---

४. **संत नामदेव** : डॉ. हे. वि. इनामदार, १९७०, पृ. २८१.

५. **संत नामदेव और हिंदी पदसाहित्य** : डॉ. रामचंद्र मिश्र, १९६९, पृ. १३०.

हिंदू–मुसलमानांसंबंधी दोघांचे विचारसाम्य

केवळ नामसंकीर्तन किंवा 'जपजी' यांच्याच बाबतीत संत नामदेवांसंबंधी गुरुनानकांचे साम्य नसून ज्या हिंदू–मुसलमान ऐक्यासंबंधी गुरूनानकांना जगातील विचारवंतांनी श्रेय देऊन त्यांची मुक्तकंठाने स्तुती गायिली आहे, त्याबाबतही गुरू नानक हे आपले विचार जणू काही नामदेवांच्या विचारांचे प्रतिध्वनी म्हणूनच जगासमोर मांडताना दिसतात.

'आदिग्रंथा'तील राग–किलवर–गोंड या पदात[६] नामदेव म्हणतात–

> **हिंदू अन्हा तुरकू काणा। दुहां ते गिआनी सिआणा ॥**
> **हिंदू पूजै देहुरा मुसलमाणु मसीत।**
> **नामे सोई सेविआ गह देहुरा न मसीत ॥४॥**

हिंदू हा आंधळा आहे, मुसलमान काणा आहे. (दोघांनाही सत्याचे दर्शन घेण्याची क्षमता राहिलेली नाही.) पण या दोघांपेक्षा ज्ञानी हा खरा शहाणा आहे. हिंदू हा देवळात जाऊन ईश्वराची पूजा करतो आणि मुसलमान मशिदीत जातो. नामदेव म्हणतात, पण मी तर अशा ईश्वराची आराधना करतो की, जो देवळातही नाही आणि मशिदीतही नाही.

हिंदू आणि मुसलमान यांच्यातील तथाकथित धार्मिक विरोधाविषयी आणि त्यांच्यामधील वरवरच्या कर्मकांडाविषयी गुरू नानकांनी नामदेवांसारखेच कठोर विचार अनेक ठिकाणी व्यक्त केले आहेत. जयदेव, नामदेव, रामानंद आणि कबीर यांचे विस्मरण झालेल्या व अज्ञानांधकारात चाचपडत असलेल्या सामान्य जनतेला गुरूनानकांनी आपल्या पूर्वसूरींच्या उपदेशाचे पुन:स्मरण करून दिले.

संत नामदेवांच्या वरील विचारांशी गुरूनानकांचे पुढील विचार ताडून पाहण्यासारखे आहेत––एकदा पंडिताने गुरू नानकांना यज्ञोपवीत धारण करण्यासाठी आग्रह धरला असता, गुरू नानकांनी त्याला उत्तर दिले ते असे.

> **"मी यज्ञोपवीत धारण करण्यास तयार आहे;**
> **पण मला खरेखुरे पवित्र असे यज्ञोपवीत तुम्ही देऊ शकाल काय ?**
> **दयारूपी कापसाचे बनविलेले,**
> **समाधान हाच धागा असलेले,**
> **ब्रह्मचर्य ही त्याची गाठ आणि सत्य हा त्याचा पीळ,**
> **असे आत्मज्ञानाचे एखादे पवित्र जानवे आहे का तुमच्याजवळ ?**
> **पंडितजी, असेल तर मला द्या; मी ते जरूर धारण करीन".**

असाच कळकळीचा उपदेश गुरू नानकांनी एकदा एका कर्मठ अशा मुसलमानाला देखील केला होता.

> **"तुम्हांला खरा मुसलमान व्हायचे आहे काय ?**
> **दया ही तुमची मशीद,**
> **श्रद्धा ही तुमची प्रार्थनेची चटई,**
> **आणि प्रामाणिक उपजीविका हे तुमचे पवित्र कुराण,**
> **नम्रता ही तुमची सुंता**
> **आणि सदाचरण हे तुमचे रोझे होऊ द्या.**
> **असे, झाले तरच तुम्ही खरे मुसलमान होऊ शकाल !"**

अशा रूपकात्मक आणि निर्भीड शब्दांनी त्यांनी समाजातील तथाकथित धर्मनिष्ठांच्या संकुचित बुद्धीवर प्रहार केले.

संत नामदेव आणि गुरू नानक यांच्यामधील भाषासाम्य

या दोन विभूतींच्या विचारांमध्ये जसे साम्य आहे, तसे ते त्यांच्या भाषेतही आहे. किंबहुना नामदेव आणि नानक हे आपआपले समान विचार एकाच भाषेतून व्यक्त करतात, असे म्हणावयास हरकत नाही.

ज्या 'आदिग्रंथा'त संत नामदेवांची आणि गुरू नानकांची पदे आहेत, तो ग्रंथ म्हणजे पंजाबी भाषेतील सर्वश्रेष्ठ ग्रंथ समजला असला, तरी 'आदिग्रंथा'ची भाषा ही आज आपण जिला पंजाबी म्हणतो ती नाही. 'पंजाब' किंवा 'पंजाबी' या शब्दांचा उल्लेख 'आदिग्रंथा'त कोठेही नाही. या ग्रंथाची भाषा भारतातल्या विविध प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या भाषांतील शब्दांनी मिळून बनलेली अशी एक सर्वसमावेशक भाषा आहे. तिला 'सधुक्कडी' किंवा 'साधुभाषा' असे यथार्थ नाव मिळालेले आहे.

---

६. तत्रैव, पृ. १५४.

साधुभाषेचे वेगवेगळे पैलू असून ती गोरखनाथांसारख्या नाथयोग्यांनी वापरली आहे, दामोदरपंडितांसारख्या महानुभाव कवींचा तिच्याशी परिचय आहे. महाराष्ट्रातील नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास यांनीही साधुभाषेत काही रचना केली असून बंगालमधील जयदेव आणि उत्तरप्रदेशचा कबीर यांनीही ती वापरलेली आहे.

भारतातील विभिन्न प्रदेशांतील साधुसंतांनी आपल्या आध्यात्मिक आणि भक्तिमार्गी काव्यरचनेसाठी तिचा वापर अनेक शतकांपासून केलेला असून, भारतीयांची एक शृंखला-भाषा निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न सर्वस्वी यशस्वी ठरलेला आहे. भारतातील विविध संतकवींना या साधुभाषेत आपली रचना करण्याचा अभिमान वाटत होता. किंबहुना ती गोष्ट त्यांना अत्यंत स्वाभाविक आणि अनिवार्य अशी वाटत होती. त्या भाषेत रचना करणे जसे स्वभावसुलभ होते. तसा तिचा अर्थ समजून घेणे हे देखील सर्वसामान्य माणसाला सहज सुलभ होते.

साधुभाषेत भारतातील निरनिराळ्या प्रदेशांतील संतांनी रचना केलेली असल्यामुळे, तिच्यात स्वाभाविकपणे खडी बोली, व्रज, अवधी, बंगाली, उरिया, राजस्थानी, गुजराती, मराठी व दखनी अशा निरनिराळ्या प्रादेशिक भाषांतील निवडक व अर्थवाहक शब्दसंपत्ती जमा झालेली आहे. साधुभाषेच्या अशा सर्वसंग्राहक आणि संमिश्र भाषावैशिष्टचांमुळे 'आदिग्रंथ' हा अखिल भारतीय स्वरूपाच्या पातळीवरील सर्वश्रेष्ठ असा भाषेचा आणि साहित्याचा एक ग्रंथ म्हणून ख्याती पावला आहे. ही त्याची ख्याती त्याच्या निर्मितीपासून सतराव्या शतकापर्यंत जशी चालत आलेली आहे, त्याचप्रमाणे आजही तो ग्रंथ त्यातील नवविचारप्रवर्तनामुळे व त्यातील भाषेच्या साहित्याच्या नव्हाळीमुळे टवटवीत राहिला आणि आहे, त्याला जुनेपणा येऊ शकला नाही.

मराठी वाचकांच्या सोयीसाठी संत नामदेवांचे 'आदिग्रंथा'त समाविष्ट झालेले साधुभाषेतील एकच पद येथे उद्धृत केले आहे, त्यावरून नामदेव ज्ञानदेवांच्या अमृताहूनही मधुर असलेल्या मराठी-भाषेतील रसवत्ता साधुभाषेत कशी सवाईने चमकदार दिसते, याचा प्रत्यय येईल.

रामकली रागातील आपल्या प्रसिद्ध पदात[8] नामदेव म्हणतात—

आनीले कागद काटीले गूडी ।
आकासमधे भरमोअले ।।
पंचजना सिउ बात बतऊआ ।
चितु सु डोरी राखीअले ।।
मनु रामनाम वेधीयले ।
जैसे कनककला चितु मांडिअले ।। १ ।।
आनीले कुंभ भराइले उदक ।
राज कुआरी पुरंदरीए ।।
हसत विनोद बीचार करती हैं ।
चीतु सु गागरि राखीअले ।। २ ।।
मंदरु एकु दुआर दस जाके ।
गऊ चरावन छाडीअले ।।
पांच कोसपर गऊ चरावत ।
चीतु सु बछरा राखीअले ।।
अंतरि बाहरी काज बिरूधी ।
चीतु सु बारीक राखीअले ।। ४ ।।

साधुभाषेतील नामदेवांची ही रचना त्यांच्याच पुढील मराठी रचनेशी[9] तोलून पाहावी आणि मग ठरवावे की, कोणता ध्वनी आणि कोणता प्रतिध्वनी —

वावडी दुरोच्या दुरी उडतसे अंबरीं ।
हाती असे दोरी परी लक्ष तेथें ।।
दुडीवरी दुडी पाण्या निघाली गुजरी ।
चाले मोकळचा करीं परी लक्ष तेथें ।।

ही दोन्ही पदे समोरासमोर ठेवली म्हणजे ज्ञानेश्वरांच्या प्रसिद्ध उक्तीचे[9] स्मरण होते :

मूळ ग्रंथिचेया संस्कृता — ।
सवें नीट मऱ्हाटी पढतां ।।
अभिप्रायें मानलेया उचिता ।
कवणि भूमिका ते नेणवे ।।
जैसें आंगिचेनि सौंदर्यपणें ।
लेणे यासि आंगचि होये लेणें ।।
तेथ अळंकरलें कवण कवणें ।
हें निर्वचेना ।।

---

७. **तत्रैव**, पृष्ठ १५५.

८. **नामदेव गाथा**, चित्रशाळा प्रत १९५७, अ. १९७५.

९. **ज्ञानेश्वरी** (सरकारी प्रत), ११. ४२–४३.

ज्ञानेश्वरीत ज्याप्रमाणे संस्कृत आणि मराठी, त्याप्रमाणे 'आदिग्रंथा 'त इतर भारतीय भाषांबरोबर आजची पंजाबी आणि मराठी यांचा मधुर मेळ जमून गेला आहे.

नामदेव आणि नानक यांच्यातील काव्यसंगीताचे साम्य

विचार आणि भाषा यांप्रमाणेच नामदेवांचे काव्यसौंदर्य आणि त्यांच्या शैलीतील नादमाधुर्य यांचेही मनोहर प्रतिबिंब गुरू नानकांच्या वाणीत उमटले आहे. 'आदिग्रंथा 'तील 'जपजी' हा प्रास्ताविक भाग सोडला, तर इतर संपूर्ण पदेही रागदारीत गायिली जाऊ शकतात. नामदेवांची भक्तिगीते कशी गायनानुकूल असतात, हे मराठी रसिकांना सांगावयास नकोच.

संत नामदेवांनी ज्याप्रमाणे आपल्या प्रसिद्ध अभंगात—

प्रेमाचिया भरें उभ्यानें गर्जतां ।
नाचे हा अनंत तयासवें ॥
नामा म्हणे तया कीर्तनाची गोडी ।
घालीतसे उडी नेटेंपाटें ॥

असे उद्गार काढले आहेत. त्याप्रमाणे गुरू नानकांनीही 'राग आसा 'मधील आपल्या 'आदिग्रंथा 'तील पदात असे म्हटले आहे—

राग–नाद नेही दूजा भावो ।
इत रंग नाचे रखरख पावो ॥
भउ फेरी होवाइ मन–चीत ।
बेन्हविअन डढ्ढोआन नीतानीत ॥[१०]

(एका ईश्वराशिवाय जर मनात काही आले तर त्याला 'राग' म्हणू नये व 'नाद 'ही म्हणू नये. पण ईश्वरावर मन केंद्रित करून व पायाचा ठेका धरून ईश्वर गुणगायनात दंग होऊन नाचत राहावे. नृत्यातला खरा ठेका म्हणजे ईश्वराविषयीचे भय आणि हीच ईश्वरार्पणवृद्धी उठता बसता सदैव मनात बाळगावी.)

वास्तविक, तुलना कधी करू नये; 'तुलना या द्वेषमूलक असतात.' (comparisons are odious), अशी म्हण आहे; पण नामदेव आणि नानक या संतश्रेष्ठांची ही तुलना सर्वस्वी प्रेममूलक असून, ती केवळ भुक्तीच नव्हे, तर मुक्तीही देणारी आहे. भक्त आणि मुमुक्षू यांच्या कुतूहलपूर्तीसाठीच तिचा हा विस्तार येथे यथामती सादर केला आहे.

---

१०. *Guru Nanak : His Life, Time & Teachings* (Quih-Centenary Volume), p. 250.

'ज्ञान'दीप लावू जगी

—प्रा. श्री. मा. कुळकर्णी

जैसा दीपे दीपु लाविजे ।
तेथचि आदिलु कोणु हें नेणिजे ।
— ज्ञा. अ. ९

भागवत धर्म हा वैदिक असून त्याचे तत्त्वज्ञान 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः' या सूत्रात प्रगट झालेले अद्वैत तत्त्वज्ञान आहे. हा भक्ति-संप्रदाय असला तरी ज्ञानोत्तर व कर्मप्रधान भक्ती त्याला मान्य व प्रिय आहे. काळाच्या ओघात क्षीण झालेल्या व विकृत होऊ पाहाणाऱ्या या भागवत धर्माचे मूळचे स्वरूप व तेज त्याला प्राप्त करून देण्याचे कार्य ज्ञानियांचे राजे ज्ञानदेव यांनी गीतार्थ मराठीत आणून प्रभावीपणे केले आणि अशा रीतीने महाराष्ट्रात— मराठी जगात — भागवत धर्ममंदिराचा पाया घातला व त्याला भक्कम आधारावर उभे केले.

याच भागवत धर्माच्या प्रसाराचे व प्रचाराचे कार्य भक्तशिरोमणी संत नामदेव यांनी अखंडपणे केले आणि आबालवृद्ध स्त्री–पुरुष सर्वांना इहलोकी समाधान व परलोकी शांतीचा सुलभ पण श्रेष्ठ मार्ग दाखवून दिला.

नामदेव हे भागवतधर्मी संत असल्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान, आचारधर्म व मुख्य शिकवण ज्ञानदेव व अन्य भागवतधर्मी संतांहून भिन्न असणे शक्य नाही. पण ही गोष्ट आजच्या काळात आम्हाला कळेनाशी झाली आहे. कारण ओठी एक, पोटी दुसरे आणि आचरण तिसरेच; तेही आज एक, तर उद्या दुसरे अशा स्वार्थपरायणतेच्या काळात आम्ही वावरत आहोत. तेव्हा स्वतः नामदेवांच्याच शब्दात काही मुख्य बाबींच्यासंबंधी त्यांचे म्हणणे समजून घेणे हिताचे होईल.

अद्वैतवेदान्त हेच नामदेवांचे तत्त्वज्ञान

नामदेवांना 'तत्त्व'ज्ञान झालेले होते आणि ते त्यांचे 'तत्त्वज्ञान' अद्वैतवेदान्ताचेच होते. विसोबा खेचर हे नामदेवांचे गुरू, त्यांनी अगोदर अद्वैताचा नामदेवांना उपदेश केला व मग तसा अनुभव आणून दिला —

नाम आणि रूप दोन्ही जया नाही ।
तोचि देव पाही येर मिथ्या ।।
जळस्थळ आणि काष्ठ हे पाषाणु ।
पिंडब्रह्मांड व्यापुनी अणुरेणु ।।
सर्वत्र साक्षभूत हे जाणोनि पाहो ।
खेचर म्हणे नाम्याते अवघा देवो ।। १३७२ ।।
स. सं. गा.

नामरूपातीत असे एकच तत्त्व पिंडब्रह्मांडाला व्यापून आहे असे सांगूनच 'खेचर' स्वस्थ बसले नाहीत तर त्यांनी नामदेवाच्या मस्तकावर हात ठेवला आणि 'पिंडे पिंडाचा ग्रासु' या पद्धतीने 'शक्तिपात' करून 'तत्त्वमसि' या महावाक्याचा उपदेश व अनुभव दिला—

श्रवणी सांगितली मात मस्तकी ठेविलाये हात
पदपिंडविवर्जित केला नामा ।। १३८० ।।

असा आत्मानुभव नामदेवांना प्राप्त झाल्यामुळे एकच तत्त्व सर्वत्र भरले आहे, जडस्वरूपात दिसणारे नानात्व मिथ्या आहे, जीव ब्रह्माहून निराळा नाही असे अद्वैत तत्त्वज्ञानच त्यांनी सर्वत्र प्रदिपादिले आहे.

एक तत्त्व एकाकार सर्व देशीं
एक तो नेमेसी सकल जगी ।। १ ।।
ऐसें ब्रह्म पहा आहे सर्व एक ।
न लगे विवेक करणें कांही ।। २ ।।

मिथ्या हें डंबर माया मयितार्थ ।
हरि हाचि स्वार्थ वेगीं करो ॥ ३ ॥
नामा म्हणे समर्थ बोलिला तो वेद ।
नाही भेदाभेद ब्रह्मपणीं ॥ ४ ॥ ३३२ ॥

अज्ञानी जीवाला जडस्वरूपात भासणारे जग सत्य वाटते. पण वस्तुतः ती मायोपाधि आहे. सूर्य-किरणांवर मृगजळ तसे ब्रह्मावर विश्व भासते—

ब्रह्मी ब्रह्म एक मुळीं नाहीं जग ।
सर्व मायायोग कल्प जाणा ॥
स्थावर जंगम सर्व मायोपाधि ।
जाण पां त्रिशुद्धि आत्मज्ञानें ॥
रवीच्या किरणें जैसें मृगनीर ।
तैसें ब्रह्मीं कोर विश्व झालें ।
नामा म्हणे वाचा ऐका निज खूण ।
स्वरूपीं तल्लिन होऊनि राहे ॥ ३३४ ॥

या व इतर अभंगांतून आलेले नामदेवांचे हे तत्त्वज्ञान ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाहून मुळीच भिन्न नाहीं. ज्ञानेश्वरांच्या पुढील ओव्या पहा —

रश्मिचेनि आधारें जैसें । नाहिं तेंचि मृगजल असे ।
माझां ठाइं भूतजात तैसें । आणि मातें भावी ॥ ८४ ॥
मी इये परीचा भूतभावनु । परि सर्व भूतेंसीं अभिन्नु ।
जैसें प्रभा आणि भानु । एकचि तें ॥ ८५ ॥ ज्ञा. अ. ९

नामदेवांनी सलग ग्रंथ लिहिला नाही, ते शास्त्री व पंडित नव्हते म्हणून सलगपणाने, सुसंगत व संपूर्ण असे तत्त्वज्ञान त्यांनी मांडलेले दिसत नाही. परंतु त्या ज्ञानाचे ते अनुभवी असल्यामुळे सर्वत्र त्याच्या खुणा प्रगट झाल्या आहेत. त्या एकत्र विचारात घेतल्या तर मायावादासहित संपूर्ण अद्वैत तत्वज्ञान त्यांना मान्य होते व तेच त्यांनी मांडले आहे असे दिसेल.

ज्ञानोत्तर भक्तीचाच पुरस्कार

अद्वैत वेदान्ताप्रमाणेच अद्वैत भक्ती, ज्ञानोत्तर भक्ती अथवा परा भक्तीचाच नामदेवांनी पुरस्कार केलेला आहे. कारण ते स्वतःच ज्ञानी भक्त होते.

बाहेरी भीतरी तुजचि मी देखे ।
चित्त तेणें सुखे वेडावलें ॥
मीपण रहित आनंदीं बुडालें ।
न निघे कांही केलें चित्त माझें ॥

असा अद्वैतानुभव आला तरी —

नामा म्हणे एक उरलीसे वासना ।
स्वामीसेवकपणा देई देवा ॥ १६९८ ॥

हीच अद्वैतभक्तीची इच्छा होय. भक्त आणि देव यांच्यात भिन्नत्व राहात नाही. तरी पण भक्ताला भक्तीची गोडी सोडावीशी वाटत नाही. ज्ञानदेव सांगतात —

अर्जुना हा ठावो वेन्हीं । सोहंभावसरोवरी ।
द्वैताचां पइली तीरी । उतरों सरला ॥ १८५ ॥
किं भक्तिसुखा लागि । आपणचि जाला दों मार्गी ।
वांटूनियां आंगीं । सेवकें बाणी ॥ १८६ ॥
येरां नांव मीं ठेवीं । मज भजतेया वोज बरवी ।
न भजतेयां दावी । योगिया जो ॥ १८७ ॥

— ज्ञा. अ. १२

दुसऱ्या एका अभंगात नामदेव हेच सांगतात —

नामा तो केशव केशव तो नामा ।
अभिन्नत्व आम्हां केशवासी ॥
नामा म्हणे केशवा दुजेपण नाही ।
परि प्रेम तुझ्या ठायीं ठेवियेलें ॥१२५६॥

'मीचि होउनि, करित माझी सेवा' असे या भक्तांचे वर्णन ज्ञानदेवांनी ९ व्या अध्यायातही केले आहे.

निर्गुण–सगुणाचे ऐक्य

निर्गुण आणि सगुण यांत ज्ञानदेवांप्रमाणेच नामदेवही भेद मानीत नाहीत. 'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे' (४०); 'निर्गुणाची वार्ता सगुणीं मांडिली । सगुण निर्गुण दोन्ही एकरूपा आली' (५९४); 'निर्गुणाची छाया सगुणीं विवली' (६५२) अशा किती तरी अभंगांतून ज्ञानदेवांचा हा अनुभवविचार व्यक्त झाला आहे. ज्ञानेश्वरीत श्रीकृष्णाला सर्वत्र दोन्ही प्रकारची विशेषणे सरमिसळीने लाविलेली आहेत. नामदेवांचा अनुभव याहून निराळा असणे कसे शक्य आहे? ते सांगतात —

निर्गुण सगुण नाही ज्या आकार
होऊनि साकार तोचि ठेला ।
सुवर्ण की धन धन कीं सुवर्ण ।
निर्गुण सगुण तया परी ॥ ३३० ॥

विठ्ठल हाच बौद्ध

नामदेवांचे हे सगुण ब्रह्म विटेवर उभे आहे. महाराष्ट्रातील हा भागवत संप्रदाय पंढरपूरच्या विठ्ठलाचा अनन्य भक्त आहे. भागवत धर्माची प्रधान देवता विष्णु आहे. हा विष्णूच कृष्ण झाला आणि तोच पुंडलिकासाठी विटेवर उभा राहून विठ्ठलही झाला. नामदेवादिकांचा विष्णूचा नववा अवतार बौद्ध तो हाच.

परब्रह्ममूर्ति सांवळे सगुण ।
पंढरी निधान वाळुवंटीं ॥ ३५० ॥

बौद्ध अवतार चक्रपाणी ।
सत्रावी कळा माय रूक्मिणी ॥ १०३७ ॥

नववा बागुल बोलती ।
नांव बौद्ध म्हणती ।
कोणा न कळे त्याची गती ।
बौद्ध रूपें राहिला ॥ २८९ ॥

इत्यादी अभंगांतून या गोष्टींची साक्ष सहज पटण्यासारखी आहे. असा हा नामरूपातीत, योग्यांनाही दुर्लभ केवळ बोधस्वरूप केशव भक्तांना दर्शन व भेटी देत विटेवर उभा आहे. नामदेव भक्तिभावाने सांगतात —

शांति भीमातीरीं भक्ति पंढरपुरीं ।
प्रेम विटेवरी देखियलें ॥
देखिलागे माय देखिलागे माय ।
देखिला गे माय पंढरिये ॥
नामा रूपातीत नित्य सदोदित ।
जेथे विरे चित्त योगियांचे ॥
दुरी ना जवळी त्रिपुटी वेगळा ।
केशव भेटला नामा म्हणे ॥ ३५४ ॥

हरिहरैक्य

विटेवरील या सावळ्या परब्रह्माचे या संतांना कितीही वेड, व्यसन असले, ते त्याचे अनन्य भक्त असले तरी इतर कोणत्याही रूपाने त्याच परब्रह्माची भक्ती होते याचे ज्ञान व भान त्यांनी सदैव बाळगले आहे. विष्णु व शिव यांत भेद मानणे त्यांना मान्य नाही. या गोष्टीचा त्यांनी निषेध केला आहे. किंबहुना हरिहरैक्य हे महाराष्ट्रातील या भक्तिसंप्रदायाचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. ज्ञानेश्वरांची गुरूपरंपरा 'अनादि शंकरापासौनि' असली तरी त्याच परंपरेतून विठ्ठलभक्तीही त्यांना प्राप्त झाली होती. 'निवृत्तीचे गूज विठ्ठल सहज । गयनीराजें मज सांगितलें ॥ १५ ॥ असे निवृत्तिनाथच सांगतात. नामदेवांचे गुरू विसोबा खेचर हेही नाथसंप्रदायी होते. त्यांनी नामदेवांना 'न विसरावे पाय विठोबाचे' हीच निकी सोय दाविली. असे असल्यामुळे या संप्रदायात हरिहरैक्य हा अनुभवाचा भाग व उपदेशाचा विषय झालेला आहे. पुढील अभंगात नामदेवांनी हे हरिहरांचे ऐक्य उत्कटपणे व उत्कृष्टपणे वर्णिले आहे—

भजन करारे हरिहरा । नारायण शिवशंकरा ।
माझें बोलणें अवधारा । भेद न करा दोघांचा ॥
तुम्हांसीं सांगेन सत्यवृत्तान्त । पाहें पां तेथीचा दृष्टांत ।
नारायणें सेविलें अमृत । झाला श्वेत महादेव ॥
शंभूनें गिळिलें हलाहला । म्हणोनि विष्णु झाला निळा ।
देखत देखत आंधळा । म्हणी होसी गव्हरा ॥ ७०१ ॥

इतर अनेक अभंगांतून 'शिवविष्णु एकरूप । जाणोनियां जप करा त्यांचा' असाच उपदेश नामदेवांनी केला आहे. ज्ञानेश्वरीत नामाचा उपदेश करताना 'तेंचि शैव का वैष्णव' असे पदोपदी सांगितले असून १२ व्या अध्यायात तर शंकराची स्तुती श्रीकृष्णाच्या मुखाने करवून 'तरि हें असो आता । महेशातें वानितां । आत्मस्तुति करितां । संचारू असे' असे म्हणून हेच ऐक्य प्रस्थापित केले आहे.

एकं सत्

हरिहरच केवळ नव्हे तर इतर देवता म्हणजे देखील एकाच परब्रह्माची रूपे आहेत. ही जाणीव ठेवून आपणाला प्रिय अशा कोणत्याही रूपात त्या परमेश्वराची उपासना करण्यास प्रत्यवाय नाही. मात्र ती देवता स्वतंत्र आहे, इतर देवतांहून भिन्न आहे अशा अज्ञानमूलक उपासनेचा संतांनी निषेध केला आहे.

एकच ईश्वरी सत्ता भिन्न भिन्न रूपाने कार्य करते हे उपनिषदांतील व गीतेतीलच तत्त्व ज्ञानेश्वरीत वर्णिलेले आहे. जवळ जवळ त्याच शब्दांत नामदेवही तेच सांगतात—

तुझिया सत्तेनें वेदासी बोलणें ।
सूर्यासी चालणें तुझिया बळें ॥

मेघांनी वर्षावें पर्वतीं बैसावें ।
वापूनें विचरावें सत्ते तुझें ॥
नामा म्हणे कांहीं न हाले साचार ।
प्रभु तूं निर्धार पांडुरंगा ॥४६६॥

अज्ञानमूलक व सकाम अशा अनेक देवतोपासनेचा मात्र या संतांनी निषेध केला आहे. 'जाखाई जोखाई उदंड दैवतें । वाउगेंचि व्यर्थ श्रमतोसी' (१८८५) 'नानापरिचीं दैवतें बहुत असतीं असंख्यातें ॥ सेंदुर शेरणी जीं इच्छितीं । तीं काय आर्त पुरवितीं' (१८८६) अशा अभंगांतून नामदेवांचा हाच दृष्टिकोण प्रगट झाला आहे. अज्ञानमूलक प्रतिमापूजेचाही असाच निषेध नामदेवासकट सर्व संतांनी केला आहे. मात्र सर्वत्र भरलेल्या परब्रह्माचं एक प्रतीक या जाणीवेने प्रतिमापूजा त्यांना मान्य होती.

'पंथराज'

सगुण–निर्गुण अशा एकरूपाने असणाऱ्या ईश्वराची भक्ती करण्याला या संतांनी सर्वांना सांगितले आहे. कलियुगात भक्तीसारखे दुसरे सुलभ आणि सोपे साधन नाही. नरजन्म हा दुर्लभ आहे. तो प्राप्त झाला असता ईश्वराची प्राप्ती करून घेणे हे जीवाचे इतिकर्तव्य आहे. आणि त्यासाठी भक्तिमार्ग हाच 'पंथराज' आहे. मृत्युलोक हा अनित्य आणि असुखकर आहे. म्हणून 'येथ जन्हे अवचटें जन्मलासि' 'तऱ्हे झडझडौनि वहिला निग । इये भक्तीचिये वाटे लाग । जीया पावसी अव्यंग । निजद्धाम माझें ॥' असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. नामदेवही हेच म्हणतात—

आलेनी संसारा उठा वेगे चला ।
जिवलग विठ्ठला भेटीलागीं ॥
दुर्लभ मनुष्य जन्म न लभेरे मागुता ।
लाहो घ्या सर्वथा पंढरीचा ॥१९५४॥

विठ्ठलाचे नाम हाच संसारातील दुःखाचा परिहार आहे. संसारातील सुख हे सुख नसून दुःखच आहे. या दुःखरूप सुखाच्या मागे लागून जन्म व्यर्थ न घालविता ईश्वरभजनाचा मार्ग पत्करा. या भजनाचा प्रताप असा आहे, की 'दुःख दुरी जाय । जैसें अभ्र होय देशधडी' (१९५८).

नामाचा महिमा सर्व संतांप्रमाणेच नामदेवांनीही भरपूर गायिला आहे. 'नाम तेंचि रूप रूप तेंचि नाम । नामरूपा भिन्न नाही नाही ॥ आकारला देव नामरूपा आला । म्हणोनि स्थापिला नाम वेदीं ॥ नामा म्हणे नाम केशव केवळ । जाणती प्रेमळ भक्त भले ॥६९०॥ यात नामाचे महत्त्व तर वर्णिले आहेच पण वेदाने नाम स्थापिल्याचा उल्लेख लक्षणीय आहे. दुसऱ्या एका अभंगात (६८८) गीतेचा उल्लेख असून गीतेने नामाचा उपाय सांगितल्याचे ध्वनित केले आहे. उपनिषदांचे सार असणाऱ्या गीतेत भक्तीचा महिमा तर वर्णिलेलाच आहे. म्हणून भक्ती ही अवैदिक म्हणणे युक्त नाही हे सहज ध्यानात यावे. असो.

नामसंकीर्तनाचा उपदेश नामदेवांनी विशेषत्वाने केला कारण ते सुलभ आहे. शिवाय जाती, कुळ, वर्ण इत्यादींचे त्याला काही बंधन नाही. 'नाहीं याती वर्ण नाही या वेदोक्त । नामेचि संतृप्ति होती जीवा । नामा म्हणे नाम हेंचि बीजसार। तुटेल येरझार भवबंधासी' ॥६४८॥ नामसंकीर्तन केले म्हणजे निराळे व्रत, तप, दान इ० काही करण्याचीही आवश्यकता राहात नाही. 'व्रततपदान हवन पूजन । न लगे साधन नाम म्हणतां' ॥७२२॥ असे हे सर्व दृष्टींनी सुलभ साधन आहे. म्हणूनच संतांनी त्याचा पुरस्कार केला आहे.

भक्तीच्या क्षेत्रात 'भक्ति गा येथ सरे । जाति अप्रमाण' हे ज्ञानदेवांनी उद्घोपिलेले तत्त्व नामदेवांनीही प्रतिपादिले आहे. ब्रह्माच्या ठिकाणी कसलाच भेदाभेद नाही हेही ते सांगतात. परंतु वर्ण व त्यानुसार आचरण हे त्यांना मान्य आहे. कलीच्या प्रभावाने हे आचरण सुटत चालले व सुटणार याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला आहे.

देवा पापछळें कांपते मेदिनी ।
षट्कर्मे सांडियेलीं ब्राह्मणीं ॥
लटिक्याचा साच जिंकियेला कली ।
पाखांडी वेदांतें न मानिती बळी ॥
अधर्म प्रवर्तला मही तळीं ।
ऐसीं पापें कळीं घोर झालीं ॥ १८३० ॥

अशा प्रकारचे कलीचा प्रभाव वर्णन करणारे वरेच अभंग आहेत. 'ब्राह्मण सांडितील वेदमंत्र । आचार सांडूनि होती शूद्र' 'वेदांवेगळें कर्म करी । मनीं पाखंड धरी । तो पचिजे अघोरीं । चिरकाळवरी ॥

संध्या स्नान नेणें दान । नेणें हरिकथा श्रवण । तोही पतीत जाण । महापातकी चांडाळ ।। सांडूनि ब्राह्मण-पण । शूद्ररीतीं आचरण । तो दृष्टीं पडलिया जाण । महादोष घडेल ।। १८३१ ।।' यावरून 'अविधी आचरण परमदूषण' हे नामदेवांनाही मान्य होते हे उघड आहे.

वर्णव्यवस्था म्हटली की तिच्यात गुण—कर्मानुसार श्रेष्ठ—कनिष्ठ क्रम येतोच. नामदेवांनाही तो मान्य होता. ते म्हणतात —

ब्रह्म ते ब्राह्मण श्रुतीचें वचन ।
सर्व नारायण सर्वांभूतीं ।।
चहूं शिक्षा जनीं गुरु चालू वर्ण ।
प्रत्यक्ष पुराणें साक्ष देतीं ।।
कुळक्षयो व्हावें ऐसें वाटे जीवा ।
ब्राह्मणासी दावा नको बापा ।।
नामा म्हणे ऐसे धन्य ते ब्राह्मण ।
धरिले चरण माथां त्यांचे ।। २०२१ ।।

तेव्हा 'किं पुनर्ब्राह्मणाः पुण्याः —' या श्लोकावरील व्याख्यानात पुण्यवान ब्राह्मणांचे गौरवाने वर्णन केल्यामुळे काही टीकाकार ज्ञानेश्वरांवर जे भलतेच रुष्ट झाले आहेत त्याचे काही प्रयोजन नाही असे म्हणावे लागेल. वेदांबद्दलही नामदेवांनी ठिकठिकाणी आदराचे व गौरवाचे उद्‌गार काढले आहेत हेही ध्यानात घ्यावे.

"माझा मऱ्हाठाची बोल कवतिके ।
परि अमृतातेही पैंजासि जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके मेळविना ।।'

ही ज्ञानदेवांची घोषणा सर्व संतांना प्रेरक ठरली. भावार्थ दिपिकेनंतर एकनाथी भागवत लिहिण्याचा एकनाथांनी हीच घोषणा निराळ्या भाषेत केली— नामदेवांनी व तुकारामांनी याच मार्गावर निश्चितपणे आणि प्रभावितपणे वाटचाल केली. वेदांचा तो अर्थ आम्हासचि ठावा—

'येई वाहवा मार माया ।

अशी तुकारामांची अभंगवाणी जनसामान्यामध्ये घुमू लागली. आणि भक्तिशिरोमणी नामदेव यांनी तर जनतेच्या भवनेशी एकरूप होवून जनतेमध्ये भक्तिचा आर्त टाहो फोडला. एवढेच नव्हे तर तत्कालीन महाराष्ट्राच्या सीमा ओलांडल्या व उत्तर भारतात प्रवेश करून हिन्दी भाषेचा अडसर बाजूला सारून पंजाब आणि राजस्थान अशा विभागामध्ये खुद्द 'ग्रंथसाहेबा'पर्यंत आपली पवित्र वाणी पोहोचविली. भागवतधर्माच्या प्रसाराच्या दृष्टीने नामदेवांनी केलेली ही कामगिरी अपूर्वच म्हटली पाहिजे.

भीमा नदीच्या तीरावर असलेल्या पंढरपूरक्षेत्री विठ्ठलभक्ती ज्ञानदेव — नामदेवांच्याही पूर्वीपासून चालत आलेली होती. 'कानडा विठ्ठलु कर्नाटकू' — कर्नाटकापासून आलेल्या कानडी विठ्ठलाची स्थापना पंढरपूर येथे पूर्वीच झालेली होती. परंतु सूक्ष्मस्वरूपात सीमित असलेली ही विठ्ठलभक्ती व ह्या विठ्ठलभक्तीला आधारभूत असलेली तात्त्विक विचारसरणी भागवत धर्मातील ज्ञानदेव, एकनाथ आणि तुकाराम इत्यादी संतांनी महाराष्ट्रात व बाहेर प्रस्थापित केली. स्थूलमानाने असे म्हणता येईल की, भागवत धर्माचा पाया ज्ञानदेवांनी घातला, "संतकृपा झाली, इमारत फळा आली, ज्ञानदेवे रचिला पाया ।" असे विधान तुकाराम महाराजांची शिष्या बहीणाबाई हिने एका अभंगात केले आहे. बहीणाबाईचे हे विधान स्थूलमानाने बरोबरच आहे. किंकर्तव्यमूढ झालेल्या अज्ञानी समाजाला परकीय आक्रमकांनी त्राहिभगवान् झालेल्या दीन—दुबळ्यांना, स्वधर्म व स्वकर्तव्य विसरलेल्या मूढ जनतेला ज्ञानेश्वर महाराजांनी गीतेवर भाष्य करून ज्ञान, कर्म व भक्ती यांचा समन्वयात्मक संदेश दिला. त्याच भागवत धर्म परंपरेत संत नामदेवांनी भक्तियोगाचा उद्‌घोष केला व ज्ञानोत्तरही भक्तीच जनतेला त्यांनी शिकविली. ज्ञानेश्वर व नामदेव ह्या दोन प्रचंड उंचीच्या पुरुषांच्या, कर्तृत्वाच्या शैलशिखरांच्या मधून भागवत धर्माची गंगा वाहते आहे अशी कल्पना केली तर ती चूक होणार नाही. आकाशाला भिडणारी समोरासमोर असलेली अशी दोन शिखरे असावी — ज्या दोन शिखरांच्या मधून गंगा वाहत असावी म्हणजे जे भव्योदात्त व रमणीय दृश्य दिसेल तसे भागवत धर्माच्या जीवन प्रवाहाचे दृश्य भासते. 'ज्ञानियांचे राजे' ज्ञानेश्वर एका शिखरावर बसलेले आहे व ज्ञानाचा, कर्माचा व भक्तीचा संदेश देत आहेत. दुसऱ्या शिखरावर भक्तीचा टाहो नामदेव फोडित आहेत. ज्ञानपूर्व भक्ती व ज्ञानोत्तरही भक्ती या त्यांच्या शब्दांनी सारा अवकाश

भरून उरला आहे असे हे दृश्य आहे. दोघांचेही कर्तृत्व व दोघांचेही व्यक्तित्व श्रेष्ठ आहे. सामान्य माणसाला त्यांची तुलना अशक्य आहे. प्रारंभापासूनच नामदेव हे आर्त भक्त होते. पंढरपूरला एकाकी असे नामदेव पंढरपूरच्या सावळया सगुणमूर्तिला परोपरीने आळवित होते "देवा ! त्रिविध पापांनी मी त्रस्त झालो आहे. चौऱ्यांशी लक्षयोनी फिरत फिरत मी तुझ्या चरणाशी आलो आहे, माझा उद्धार तूच आता करणार आहे अशी माझी निष्ठा आहे. श्रेष्ठांचे ज्ञान मजजवळ नाही. कर्मठांचे कर्मकांड मला मान्य नाही व योग्यांचे ध्यान मला जमत नाही. मी आर्त वाणीने तुलाच साद देतो आहे. तू माझी माऊली आहेस व मी तुझे लेकरू आहे. "तू माझी माऊली । मी तुझे लेकरू । नको पान्हा चोरू । पांडुरंगे ।। तू माझी पक्षीण ।' मी तुझे अंडज । नको चार चोरू । पांडुरंगे ।। तू माझी गावूली । मी तुझे वासरू । नको पान्हा चोरू । पांडुरंगे ।।" अशा अती शब्दात नामदेव पांडुरंगाला आळवू लागले. त्यांच्या अती शब्दांनी पंढरीचा सर्व परिसर निनादीत झाला. त्यांच्या वाणीत हृदयाची तळमळ, भावनेची उत्कटता व विरही भक्ताची आतुरता प्रगट होऊ लागली. पंढरपूर–विठ्ठल चंद्रभागा ह्याशिवाय नामदेवाला सर्व जगाचा विसर पडला. भगवद्गीतेत भगवान् श्रीकृष्णांनी भक्तांचे चार प्रकार वर्णिले आहेत, अतिजिज्ञासु अर्थार्थी व ज्ञानी ! ह्या चार प्रकारांपैकी नामदेव हे पहिल्या प्रकारांमध्ये जीवनाच्या प्रारंभी मोडत होते. ते अतिभक्त होते पण इथेच जर त्यांचा विकास थांबला असता तर जनकल्याणाचे जे फार मोठे कार्य नियतीने त्यांच्यातील संतमंडळामध्ये नामदेवांचे स्थान या घटकेला उच्च प्रतीचे होते. पण पूर्णपणे संतमान्य झालेले नव्हते. परंपरेने चालत आलेली आख्यायिका अशी आहे की, गोरा कुंभारांनी आपले थापटणे प्रत्येक संतांच्या डोईवर हाणले. गोरा कुंभारांना नामदेवांचे मडके आणि अतिभक्तीची अनुभवजन्य ज्ञानात परिणती झाल्याशिवाय हे जीवनाचे मडके पक्व होणार नाही असा संतमंडळींचा अभिप्राय पडला. नामदेव हे विसोबा खेचरांना शरण गेले, हा विसोबा खेचरांच्या कृपेने त्यांना, या विश्वाच्या मूळाशी असलेल्या 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति वदन्ति', 'सर्व खल्विदं भस्म' या सिद्धांताचा अनुभव दिला. आर्तभक्त नामदेव आता जिज्ञासू भक्तांच्या अवस्थेत आले व समाज व समाजजीवन यांचे निरीक्षण करू लागले. ज्ञानाच्या शोधासाठी समाजातील सर्व थरात ते फिरू लागले. त्यांना

'ज्ञानराज माउली'

महाराष्ट्रातील भागवतधर्म मंदिराचा पाया 'ज्ञानदेवे रचिला' आहे. नामदेवाने या ज्ञानाधिष्ठित, कर्मप्रधान भक्तिसंप्रदायाचा सर्वदूर प्रसार व प्रचार केला. ज्ञानदेवांच्या बद्दल त्यांच्या मनात नितांत आदर व अपार श्रद्धा होती.

ज्ञानराज माझी योग्यांची माउली ।
जेणें निगमवल्ली प्रगट केली ।।
गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी ।
ब्रह्मानंदलहरी प्रगट केली ।।
अध्यात्मविद्येचे दाविलेसें रूप ।
चैतन्याचा दीप उजळिला ।।
नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी ।
एक तरी ओवी अनुभवावी ।।९१२।।

या व इतरही अभंगांतून ती प्रगट झाली आहे. आणि स्वाभाविकच ज्ञानेश्वरांच्याच विचारांचे पडसाद नामदेवांच्या वाङ्मयात सर्वत्र उमटले आहेत. अद्वैत तत्त्वज्ञान, सगुण–निर्गुणाचा अभेद, अद्वैतभक्ती, हरिहरैक्य, वेदप्रामाण्य, जीवोद्धाराचे सुलभसाधन म्हणून भक्तीचा पुरस्कार इत्यादी वारकरी संप्रदायाच्या प्रमुख अंगांच्या बाबतीतील ज्ञानदेव–नामदेवांचे सिद्धान्त व विचार एकरूप कसे आहेत ते आतापर्यंत दाखविलेच आहे. याशिवाय कल्पनांचे, दृष्टांतादिकांचे व शब्दांचे देखील साम्य ठिकठिकाणी प्रगट झालेले आहे ते अभ्यासकांच्या ध्यानी येईलच. हे सर्व ध्यानी घेतले म्हणजे नामदेव हे ज्ञानदेवांना जवळचे का दूरचे हे ठरवायला कोणा आधुनिक टीकाकाराकडे जावयाला नको.

संतांच्या वाङ्मयाचा अभ्यास करताना 'विवेक' जागृत ठेवण्याची आवश्यकता आहे. उच्च आध्यात्मिक विवेक हा तर संतांच्या ठिकाणी सदैव असतोच. 'चंद्र तेथ चंद्रिका । शुभ तेथ अंबिका । संत तेथ विवेका । असणेचि ।।' असे ज्ञानदेव म्हणतात. तेव्हा त्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करणारा सामान्य विवेकी तरी असलाच पाहिजे. नसता त्याला संतांच्या शिकव-

णीत सर्वत्र विरोध व विसंगतीच दिसण्याचा संभव असतो. फार काय संतांतही त्याला भेद दिसायला लावण्याचा धोका असतो.

' ज्ञान 'दीप लाव जगी

संतांचे कार्य स्थूल दृष्टीला दिसणारे नसते. कारण ते भौतिक स्वरूपाचे नसते. त्यांच्या चरित्राने, चारित्र्याने, आचरणाने, उपदेशाने शेकडो नव्हे हजारो लोकांची अंतःकरणे उजळून निघतात, प्रकाशाच्या मार्गाने जाण्याला उन्मुख होतात. त्यांच्या वाङ्मया-तही हाच प्रभाव असल्यामुळे शेकडो वर्षे हे कार्य चाललेले असते. नामदेव स्वतःच सांगतात—

बोलूं ऐसे बोले । जेणें बोलें विठ्ठल डोले ।।
प्रेम सर्वांगाचे ठायीं । धाचे विठ्ठल रखुमाई ।।

नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगी ।।
।।१५२२।।

ज्ञानदीप उजळण्याचे हे कार्य भक्तशिरोमणी, संतश्रेष्ठ नामदेवांनी सातशे वर्षे अखंडपणे चालविले आहे. ते 'आकल्प' चालावे अशी प्रार्थना त्यांच्याच समर्थ शब्दात करून हे 'नाम 'संकीर्तन संपवितो—

आकल्प आयुष्य व्हावें तयां कुळा ।
माझिया सकळां हरिच्या दासां ।।
नामा म्हण तयां असावें कल्याण ।
जया मुखीं निधान पांडुरंग ।।८८३।।

टीप—या लेखात उद्‌धृत केलेले सर्व अभंग १९६७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'श्रीसकलसंतगाथ्या 'तून घेतले आहेत.

अनुक्रमणिका

महाराष्ट्रातील भागवत धर्म आणि भक्तशिरोमणी संत नामदेव

प्राचार्य वि. प्र. मोहगावकर

महाराष्ट्रातील भागवत धर्म हा प्राचीन परंपरेने चालत आलेल्या भारतातील भागवत धर्माचे परिस्थितीसापेक्ष युगसम्मत असे मनोहर रूप आहे. विनोबांच्या शब्दांत बोलावयाचे तर असे म्हणता येईल की, महाराष्ट्रातील भागवतधर्म ही प्राचीन भागवतधर्माची मराठी सुलभ आवृत्ती आहे. वेद, उपनिदे, भगवद्गीता व श्रीमद्भागवत यामध्ये प्रारंभी बीजरूपाने व पुढे विस्तृतपणे विशद केलेला भागवतधर्मच महाराष्ट्रातील संतांनी मराठी भाषेच्याद्वारे जनतेपर्यंत पोहचविले. वेदांमध्ये बीजारूपाने असलेला, उपनिषदामध्ये तत्वमसि म्हणून आलेला, गीतेमध्ये विशिष्ट रूप घेतलेला, भागवतात विविध रंगांनी वर्णिलेला व नारदभक्तिसूत्रात सूत्ररूपाने बद्ध झालेला हा भागवतधर्म, वैदिक परंपरेपासून निराळा नाही, हे आता इतिहाससिद्ध मत जनमान्य होत आहे. तेराव्या शतकामध्ये सबंध भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रामध्ये परंपरेने चालत आलेली संस्कृत विद्या व त्या संस्कृत विद्येच्या द्वारे व्यक्त होणारे तत्त्वविचार व जीवनप्रणाली जवळजवळ लुप्त झाली होती. वेद, उपनिषदे व गीता यातील ज्ञान काही ठराविक लोकांच्या म्हणजेच उच्चवर्णीय लोकांच्या हातात राहिले होते. व सामान्य जनता त्या ज्ञानाला पूर्णपणे वंचित झालेली होती. वैदिक कालापासून या देशामध्ये वाहत असलेली ज्ञानगंगा मध्येच एकदम लुप्त झाल्यासारखी वाटत होती. सगर पुत्रांच्या उद्धारासाठी भगीरथाने अत्यंत कष्टाने आणलेली गंगा भगवान शंकरांच्या जटाजुटांमध्ये एकदम लुप्त झाली. विचाऱ्या भगीरथाने शंकराची पुन्हा प्रार्थना केली व ह्या पावन गंगेची शंकराच्या जटेतून पुन्हा सुटका करवून घेतली व ती पावनगंगा उत्तर भारतात वाहू लागली. व सहस्त्रमुखांनी अखेरीला सागराला मिळाली. त्याचप्रमाणे समाजातील उच्चवर्णीय विद्याभ्यास जड लोकपराङ्मुख लोकांच्या घरी बंदिस्त झालेली संस्कृतातील ज्ञानगंगा महाराष्ट्रात भागवतधर्मीय संतांनी मातृभाषेच्या पाटातून वाहती केली आणि ती जनसामान्यांपर्यंत नेवून पोचविली. ज्ञानेश्वरमहाराजांपासून तर नामदेव, एकनाथ, तुकाराम यांच्यापर्यंत मातृभाषेची थोरवी परोपरींनी गायिली व ह्या जनतेच्या भाषेतून संस्कृतातील तत्त्वविचार मुक्तपणे उधळले अशी इतिहासाची साक्ष आहे.

> **"माझा मऱ्हाठाची बोल कवतिके।**
> **परि अमृतातेही पैजासि जिंके।**
> **ऐसी अक्षरे रसिके मेळविना॥'**

ही ज्ञानदेवांची घोषणा सर्व संतांना प्रेरक ठरली. भावार्थ दिपिकेनंतर एकनाथी भागवत लिहिण्याचा एकनाथांनी हीच घोषणा निराळ्या भाषेत केली— नामदेवांनी व तुकारामांनी याच मार्गावर निश्चितपणे आणि प्रभावितपणे वाटचाल केली. वेदांचा तो अर्थ आम्हासचि ठावा—

> **'येई वाहवा भार माथा।'**

अशी तुकारामांची अभंगवाणी जनसामान्यामध्ये दुमदुमू लागली. आणि भक्तिशिरोमणी नामदेव यांनी तर जनतेच्या भवनेशी एकरूप होवून जनभाषेमध्ये भक्तीचा आर्त टाहो फोडला. एवढेच नव्हे तर तत्कालीन महाराष्ट्राच्या सीमा ओलांडल्या व उत्तर भारतात प्रवेश करून हिन्दी भाषेचा अडसर बाजूला

सारून पंजाब आणि राजस्थान अशा विभागामध्ये खुद्द 'ग्रंथसाहेबा'पर्यंत आपली पवित्र वाणी पोहोचविली. भागवतधर्माच्या प्रसाराच्या दृष्टीने नामदेवांनी केलेली ही कामगिरी अपूर्वच म्हटली पाहिजे.

भीमा नदीच्या तीरावर असलेल्या पंढरपूरक्षेत्री विठ्ठलभक्ती ज्ञानदेव – नामदेवांच्याही पूर्वीपासून चालत आलेली होती. 'कानडा विठ्ठलु कर्नाटकू' — कर्नाटकापासून आलेल्या कानडी विठ्ठलाची स्थापना पंढरपूर येथे पूर्वीच झालेली होती. परंतु सूक्ष्मस्वरूपात सीमित असलेली ही विठ्ठलभक्ती व ह्या विठ्ठलभक्तीला आधारभूत असलेली तात्त्विक विचारसरणी भागवत धर्मातील ज्ञानदेव, एकनाथ आणि तुकाराम इत्यादी संतांनी महाराष्ट्रात व बाहेर प्रस्थापित केली. स्थूलमानाने असे म्हणता येईल की, भागवत धर्माचा पाया ज्ञानदेवांनी घातला, "संतकृपा झाली, इमारत फळा आली, ज्ञानदेवे रचिला पाया।" असे विधान तुकाराम महाराजांची शिष्या बहीणाबाई हिने एका अभंगात केले आहे. बहिणाबाईंचे हे विधान स्थूलमानाने बरोबरच आहे. किंकर्तव्यमूढ झालेल्या अज्ञानी समाजाला परकीय आक्रमकांनी त्राहिभगवान् झालेल्या दीन–दुबळ्यांना, स्वधर्म व स्वकर्तव्य विसरलेल्या मूढ जनतेला ज्ञानेश्वर महाराजांनी गीतेवर भाष्य करून ज्ञान, कर्म व भक्ती यांचा समन्वयात्मक संदेश दिला. त्याच भागवत–धर्म परंपरेत संत नामदेवांनी भक्तियोगाचा उद्घोष केला व ज्ञानोत्तर भक्तीच जनतेला त्यांनी शिकविली. ज्ञानेश्वर व नामदेव ह्या दोन प्रचंड उंचीच्या पुरुषांच्या, कर्तृत्वाच्या शैलशिखरांच्या मधून भागवत धर्माची गंगा वाहते आहे अशी कल्पना केली तर ती चूक होणार नाही. आकाशाला भिडणारी समोरासमोर असलेली अशी दोन शिखरे असावी – ज्या दोन शिखरांच्या मधून गंगा वाहत असावी म्हणजे जे भव्योदात्त व रमणीय दृश्य दिसेल तसे भागवत धर्माच्या जीवन प्रवाहाचे दृश्य भासते. 'ज्ञानियांचे राजे' ज्ञानेश्वर एका शिखरावर बसलेले आहे व ज्ञानाचा, कर्माचा व भक्तीचा संदेश देत आहेत. दुसऱ्या शिखरावर भक्तीचा टाहो नामदेव फोडित आहेत. ज्ञानपूर्व भक्ती व ज्ञानोत्तरही भक्ती या त्यांच्या शब्दांनी सारा अवकाश भरून उरला आहे असे हे दृश्य आहे. दोघांचेही कर्तृत्व व दोघांचेही व्यक्तित्व श्रेष्ठ आहे. सामान्य माणसाला त्यांची तुलना अशक्य आहे. प्रारंभापासूनच नामदेव हे आर्त भक्त होते. पंढरपूरला एकाकी असे नामदेव पंढरपूरच्या सावळ्या सगुणमूर्तीला परोपरीने आळवीत होते "देवा! त्रिविध पापांनी मी त्रस्त झालो आहे. चौऱ्यांशी लक्षयोनी फिरत फिरत मी तुझ्या चरणाशी आलो आहे, माझा उद्धार तूच आता करणार आहे अशी माझी निष्ठा आहे. श्रेष्ठांचे ज्ञान मजजवळ नाही. कर्मठांचे कर्मकांड मला मान्य नाही व योग्यांचे ध्यान मला जमत नाही. मी आर्त वाणीने तुलाच साद देतो आहे. तू माझी माऊली आहेस व मी तुझे लेकरू आहे. "तू माझी माऊली। मी तुझे लेकरू। नको पान्हा चोरू। पांडुरंगे।। तू माझी पक्षीण। मी तुझे अंडज। नको चार चोरू। पांडुरंगे।। तू माझी गावूली। मी तुझे वासरू। नको पान्हा चोरू। पांडुरंगे।।" अशा अती शब्दात नामदेव पांडुरंगाला आळवू लागले. त्यांच्या अती शब्दांनी पंढरीचा सर्व परिसर निनादीत झाला. त्यांच्या वाणीत हृदयाची तळमळ, भावनेची उत्कटता व विरही भक्ताची आतुरता प्रगट होऊ लागली. पंढरपूर–विठ्ठल चंद्रभागा ह्याशिवाय नामदेवाला सर्व जगाचा विसर पडला. भगवद्गीतेत भगवान् श्रीकृष्णांनी भक्तांचे चार प्रकार वर्णिले आहेत, अतिजिज्ञासु अर्थार्थी व ज्ञानी! ह्या चार प्रकारांपैकी नामदेव हे पहिल्या प्रकारांमध्ये जीवनाच्या प्रारंभी मोडत होते. ते अतिभक्त होते पण इथेच जर त्यांचा विकास थांबला असता तर जनकल्याणाचे जे फार मोठे कार्य नियतीने त्यांच्यातील संतमंडळामध्ये नामदेवांचे स्थान या घटकेला उच्च प्रतीचे होते. पण पूर्णपणे संतमान्य झालेले नव्हते. परंपरेने चालत आलेली आख्यायिका अशी आहे की, गोरा कुंभारांनी आपले थापटणे प्रत्येक संतांच्या डोईवर हाणले. गोरा कुंभारांना नामदेवांचे मडके आणि अतिभक्तीची अनुभवजन्य ज्ञानात परिणती झाल्याशिवाय हे जीवनाचे मडके पक्व होणार नाही असा संतमंडळींचा अभिप्राय पडला. नामदेव हे विसोबा खेचरांना शरण गेले, हा विसोबा खेचरांच्या कृपेने त्यांना, या विश्वाच्या मुळाशी असलेल्या 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति', 'सर्वं खल्विदं ब्रह्म' या सिद्धांताचा अनुभव दिला. आर्तभक्त नामदेव आता जिज्ञासू भक्तांच्या अवस्थेत आले व समाज व समाजजीवन यांचे निरीक्षण करू लागले. ज्ञानाच्या शोधा-

साठी समाजातील सर्व थरात ते फिरू लागले. त्यांना जो विचित्र अनुभव आला तो अनुभव आपल्या अभंग-वाणीतून सांगू लागले. वेदांती लोकांच्या जवळ वेद शिकण्यासाठी ते गेले. त्यांना सर्वत्र अहंकाराचा प्रत्यय आला. ते पंडितांच्या जवळ जाऊन पोचले. पंडित हे पूर्वपक्ष उत्तरपक्ष यातच गुंतलेले त्यांना आढळले. पुराणिकांच्या जवळ काही आढळेल म्हणून ते त्यांची विचारपूस करू लागले, त्यांना दंभ व असमाधान याशिवाय काहीही आढळले नाही.

तत्व पुसावया गेलो वेदज्ञासि ।
तव भेटले त्यापाशी विधिनिषेध ।।
तया समाधान नुपजे कोणेकाळी ।
अहंकार बळी झाला तेथ ।
स्वरूप पुसावया गेलो शास्त्रज्ञासि ।।
तव भेटले त्यापाशी भेदाभेद ।
एक एका न मिळती मनासी ।
भ्रांत गर्वराशी भुलले सदा ।
पुराणिकांशी पुसू स्वरूपाची स्थिती ।
तव त्याची विश्रांती नाही कोठे ।
विषयी ठेवूनी मन सांगती ब्रह्मज्ञान ।
तेणे समाधान नुपजे कदा ।
हरिदासांसी पुसू भक्तीचा उपाय ।
तव तयापाशी नाही भाव कोठे ।
वाचेने सांगती नामाचा वडिवार ।
विषयी पडीभर सदाकाळी ।
ऐसे विचारीता बहुत भागलो ।
म्हणोनि शरण आलो पांडुरंगा ।
भयभित झालो संसार करिता ।
नामा म्हणे आता । तारि मज ।।

समाजाचे बौद्धिक नेतृत्व ज्यांच्याकडे आहे त्या वर्गाची ही स्थिती पाहिल्यानंतर नामदेवांना उद्वेग आला. ते अंतर्मुख झाले व स्वतःच ज्ञानाचा शोध घेवू लागले. 'आर्त' नामदेव, 'जिज्ञासू' नामदेव झाले — जिज्ञासू नामदेव 'अर्थार्थी' बनले व अखेरीस 'ज्ञानरूप' झाले. पंढरीच्या पांडुरंगाच्या सगुण भक्तीत केंद्रित झालेली त्यांची दृष्टी विशाल झाली व ह्या सगुण परमेश्वराच्या मागे सर्व विश्वात एक तत्व भरले आहे अशी त्यांना प्रचीती आली. सर्व ठिकाणी जळी, स्थळी काष्ठी आणि पाषाणी एकच विठ्ठल भरून उरला आहे अशी त्यांची खात्री पटली. निर्गुण निराकार, निरुपाधिक, सर्वव्यापी, सर्वगत सत्य त्यांना गवसले आणि ते सगुण निर्गुणातून अभेद पाहू लागले. नामदेवांचा पारमार्थिक जीवनप्रवाह असा आहे. 'तुका झालासे कळस' असे ज्यांचे वर्णन केले जाते ते तुकाराम महाराज जीवनारंभी सगुणोपासक होते. त्यांच्याही जीवनामध्ये एक क्षण असा आला तेव्हा ते स्वतःशीच म्हणाले, "कासयाने देवा करू तुझी पूजा ।" आजपर्यंत मी तुझी पूजा करीत आलो परंतु आता तुझी पूजा तुझ्याच पूजाद्रव्याने आता मी कशी करावी ? पाणी, गंध, फुले, धूपदीप ही तुझीच रूपे आहेत आणि पूजा करणारा मी — तो तरी कोण आहे ? येथे तुकारामाच्या सगुण भक्तीचे निर्गुण ज्ञानात, रूपांतर झाले. भक्त हाच भगवन्त झाला. प्रीतीचे अद्वैत प्रस्थापित झाले आणि तुकाराम उरले ते फक्त उपकारासाठी ! हीच स्थिती नामदेवांची झाली. विश्वात्मक परमेश्वराची त्यांना प्रचीती आली. "जनी जनार्दन विश्वी विश्वंभर" त्यांना दिसू लागला व या विश्वात्मक विश्वंभराची पूजा हाच ईश्वरपणा असा नामदेवांना साक्षात्कार झाला. आणि नामदेव ज्ञानोत्तरही कर्मप्रधान भक्तीचा उपदेश करू लागले.

भागवत धर्माचा प्रमाणभूत तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ म्हणजे श्रीमद्भगवद्गीता ही होय. वेदांनी फक्त वेदांचा अधिकार त्रैवर्णिकांनाच दिला असल्यामुळे वेद हे वेदविद्येच्या बाबतीत कृपण आहेत, असा ठपका खुद्द ज्ञानेश्वर महाराजांनी भावार्थदीपिकेत दिला आहे आणि जी व्यापकता वेदांनी दाखविली नाही ती भगवद्गीतेने दाखविली आहे. असा ज्ञानेश्वरांचा अभिप्राय. ज्ञानेश्वरसमकालीन संतांचाही हाच अभिप्राय आहे. गीतेने स्त्रीशूद्रांना ज्ञानाची मंदिरे खुली केली व मोक्षाचा अधिकार इतर वर्णांबरोबर त्यांनाही दिला. वेदांच्या कृपणपणामुळे निर्माण झालेली आध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रातील विषमता नष्ट करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांनी केलेल्या या प्रयत्नांना आध्यात्मिक क्षेत्रात बरेच यश आले नाही ही वस्तुस्थिती आहे. संतशिरोमणी नामदेव यांना या विषमतेचा दाह सोडावा लागला. जेथे नामदेवांची ही स्थिती तेथे चोखामेळा, गोरा कुंभार, सेना न्हावी इत्यादी बहुजन-समाजातील संतांबद्दल बोलणेच नलगे. पंढरपूरच्या

परिसरात चंद्रभागेच्या वाळवंटात आषाढी एकादशीला आणि कार्तिकी एकादशीला सगळे संत एकमेकांना आलिंगन देवून चरणस्पर्श करीत असले तरी 'सहदर्शन, सहभोजन व सहासन' यांच्या बाबतीतील विषमता व उच्चनीच भाव नष्ट झाला नव्हता. जातिभेदाचे संपूर्ण उच्चाटन व उच्चनीच भेदांचा संपूर्ण नाश संतांनाही करता आला नाही ही आचार्य भागवतांची तक्रार या दृष्टीने योग्यच वाटते. सामाजिक व धार्मिक विषमतेच्या विरुद्ध नामदेवांनी झेंडा उभविला व स्वत: संतांना त्यांनी पंक्तीपावन करून घेतले, अनेकांवर अनुग्रह केले आणि अनेकांना या बाबतीत दिलासा दिला. सामाजिक समता ही आध्यात्मिक समतेवर अधिष्ठित असली तर ती समाजाला उपकारक ठरते पण येथे आध्यात्मिक समता निर्माण होवूनही सामाजिक समता निर्माण होऊ शकली नाही. जणू काय ते कार्य संतांनी विसाव्या शतकातील संतांच्याकडे व आधुनिक युगपुरुषाकडे सोपविले की काय, असे वाटते. नामदेवांचा भक्तियोग हा प्रेमयोग होता आणि प्रत्यक्ष व्यवहारात तो प्रेममार्ग होता. भक्तियोगाचे सशास्त्र विवेचन सूत्ररूपाने नारदभक्ति–सूत्रात भक्तीची व्याख्या केली आहे. आम्ही आता भक्तीची व्याख्या करीत आहोत असे म्हणून भक्तीची व्याख्या करिताना पुढील सूत्र आले आहे. "सा तु त्वस्मिन् परमप्रेमरूपा।" भक्ती म्हणजे त्या परमपुरुषाबद्दल परमप्रीती ! भक्त आणि भगवंत यांच्यामध्ये अव्यभिचारी, निष्काम व शुद्ध प्रीती जेव्हा निर्माण होते तेव्हा भक्तीचा पाया घातला जातो. शुद्ध प्रीती जेव्हा निष्ठेचे रूप धारण करते तेव्हा त्या निष्ठेलाच भक्ती असे म्हणतात आणि या भक्तीचा जेव्हा जीवननिष्ठा म्हणून स्वीकार केला जातो तेव्हा भक्तियोग निर्माण होतो. असा भक्तियोग शुद्ध स्वरूपात आणि जीवनव्यापी स्वरूपात फक्त नामदेवांच्या जीवनात आढळतो. साधन म्हणून आणि साध्य प्राप्त झाल्यानंतरही भक्तीची त्यांची निष्ठा कधी ठरली नाही. भक्तीने ते स्वत: तरले व इतरांचाही त्यांनी उद्धार केला. "यल्लब्ध्वा पुमान् सिद्धो भवति तृप्तो भवति आत्मवान् भवति स्तब्धो भवति स तरति इतरां तारयति।" या सूत्रात वर्णन केल्याप्रमाणे भक्तियोगाने नामदेव तृप्त झाले, स्तब्ध झाले, आत्मवान झाले, सिद्ध झाले. ते स्वत: संसारसागरातून तरून गेले व इतरानांही त्यांनी तारून नेले.

तेराव्या शतकामध्ये झालेल्या नामदेवांच्या चरित्राचा व त्यांच्या शिकवणुकीचा या विसाव्या शतकात या देशात आणि या देशात निर्माण झालेल्या लोकजीवनाला, लोकसत्तेला व लोकशाहीला फार उपयोग आहे. ऐहिक लोकशाहीला, पारमार्थिक लोकशाहीची आवश्यकता असते. पारमार्थिक लोकशाहीच्या अधिष्ठाणावर जेव्हा ऐहिक लोकशाही उभी असवे तेव्हाच ती लोककल्याणकारी ठरते. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या अखेरीला पसायदान मागताना 'ईश्वर निष्ठाची मांदेयाळी' या जगात निर्माण व्हावी अशी विश्वात्मक देवाला प्रार्थना केली. या प्रार्थनेप्रमाणे ईश्वरनिष्ठ समतावादी व मानवतावादी समाज निर्माण करण्यासाठी नामदेवांनी आयुष्यभर परिश्रम केले. हे परिश्रम करीत असताना महाराष्ट्राच्या सीमा त्यांनी ओलांडल्या व उत्तर भारतातील भिन्नभाषी संतांशी व जनतेशी त्यांनी संपर्क साधला. लोकशाही यशस्वी होण्यासाठी भावनात्मक ऐक्याची आवश्यकता असते. हे भावनात्मक ऐक्य पारतंत्र्याच्या काळात तेराव्या शतकात भागवत धर्मातील संतांनी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ही त्यांची कामगिरी आधुनिकांनी, लक्षात घेण्यासारखी आहे. या अलौकिक कार्याचे महाराष्ट्रातील भागवत धर्माचे दोन प्रचंड स्तंभ म्हणजेच भागवत धर्माचे संस्थापक ज्ञानेश्वर महाराज व भागवत धर्माचे प्रचारक संतशिरोमणी नामदेवमहाराज हे दोन पुरुष होत !!

नामदेवांचे शतकोटी अभंग : एक शोध-निबंध

—डॉ. द. भि. कुळकर्णी

: १ :

नामदेवाची शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा प्रसिद्ध आहे. एका ठिकाणी नामदेव म्हणतात :

शतकोटी अभंग करील प्रतिज्ञा ।
नाम मंत्र खुणा वांचुनी पाहे ॥५॥[१]

बाबाजी नामक ब्राह्मणाने आपली जन्मपत्रिका केली, आणि 'हा नामदेव प्रतिज्ञापूर्वक शतकोटी अभंग करील,' असे प्रत्यक्ष परमेश्वराने माझ्या जिव्हेवर लिहिले आहे, असा या उद्‌गारांचा संदर्भार्थ आहे.

दुसरे स्थळ—

शतकोटी तुझे करीन अभंग
म्हणे पांडुरंग ऐक नाम्या ॥५॥[२] —असे आहे.

चंद्रभागेतीरी नामदेवांनी प्रवचन ऐकले; त्यात, वाल्मीकीने 'शतकोटी ग्रंथ' केल्याचे त्यांनी ऐकले, ते ऐकून, आपले आयुष्य वाया गेले असे वाटून, नामदेवांना फार क्लेश झाले. त्या उपरतीत 'शतकोटी तुझे करीन अभंग' अशी त्यांनी प्रतिज्ञा केली.

नामदेवांवर लिहिणाऱ्या अनेक संपादकलेखकांनी नामदेवांच्या या शतकोटी अभंगांच्या प्रतिज्ञेचा आपल्यापरीने विचार केला आहे.

(१) ज. र. आजगावकरांनी हा प्रतिज्ञाअभंग प्रक्षिप्त मानला आहे. " ...ही शतकोटी अभंगांची कथा मागाहून कोणीतरी रचली असली पाहिजे हे अगदी उघड आहे."[३] असे त्यांचे शब्द आहेत. आजगावकरांची अशी समजूत होण्याचे कारण काय? कुणालाही पटेल अशा व्यावहारिक तर्कशास्त्राच्या आधारे आजगावकरांनी सदर प्रतिज्ञा-प्रकरण निकालात काढले आहे. "नामदेवमहाराज आणि त्यांच्या कुटुंबातली तेरा माणसे मिळून रोज २०० अभंग रचीत असे आपण धरून चालू; या हिशोबाने ६० वर्षांत फार तर ३० लक्ष अभंग रचून होतील... हे शतकोटी अभंग लिहिण्यास कागद किती लागतील, शाई किती लागेल, व त्या अभंगांच्या वह्या ठेवण्यास जागा किती लागेल याचा विचार करावयास नको काय?"[४] हा आपला व्यवहारी तर्क पुढे आजगावकरांनी नेमक्या आकडेवारीतच सादर केला आहे : "क्राऊन सोळा पेजी आकाराच्या एका पृष्ठावर १० याप्रमाणे ९६ कोटी अभंग छापून काढले तर ५०० पृष्ठांचा एक भाग, या हिशोबाने ९६०००००० पृष्ठांचे १९२००० भाग होतील! आणि वर्षातून चार भाग छापण्यास ४८००० वर्षे लागतील!!"[५]

'शतकोटी अभंग करीन' या नामदेवांच्या उद्‌गाराचा वाच्यार्थच घेतला आणि त्याची सांगड लेखन-मुद्रणव्यवहाराशी घालावयाचा प्रयत्न केल्यास असाच अनवस्था प्रसंग यावयाचा! म्हणूनच, प्रस्तुत उद्‌गार प्रक्षिप्त आहेत, असे म्हणून आजगावकर मोकळे होतात. नामदेवांच्या प्रतिज्ञेचा वाच्यार्थही घ्यावयाचा व त्यामागोमाग येणाऱ्या अनवस्था

---

१. **श्री. नामदेवरायांची सार्थ गाथा,** भाग तिसरा, संपा. प्रल्हाद सिताराम सुबंध, पुणे १९५४, पृ. ४१.

२. तत्रैव, पृ. १९३.

३. ज. र. आजगावकर, **संतशिरोमणी श्रीनामदेव आणि त्यांचे समकालीन संत,** आवृत्ती दुसरी, बडोदे, १९४१, पृष्ठ १६.

४. तत्रैव, पृ. १५.

५. तत्रैव, पृ. १९९.

प्रसंगाकडे दुर्लक्षही करावयाचे या वृत्तीपेक्षा आजगावकरांची भूमिका खचित तर्कशुद्ध आहे. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी आजगावकरांच्या या मतास मूक संमती दिली आहे.[६]

(२) नामदेवांच्या प्रतिज्ञेचा वाच्यार्थ घेऊन तो अभंग आजगावकरांनी प्रक्षिप्त ठरविला तर "... 'शतकोटी तुझे करीन अभंग।' या सारखी कविवचने शब्दशः न घेता ती भावार्थानेच घेतली पाहिजेत. नामदेवांनी शतकोटी अभंग रचण्याची प्रतिज्ञा केली नसेल असे नाही. परंतु त्यातील 'शतकोटी' या शब्दाचा अर्थ विपुल इतकाच करणे बरे" असा समजूतदार विचार डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी मांडला आहे.[७] डॉ. शं. दा. पेंडसे यांनीही ओघाओघात 'शतकोटी म्हणजे प्रभूत रचना करणारा' असे आपले मत नोंदले आहे.[८] 'शतकोटी' या शब्दाचा अर्थ विपुल ऊर्फ प्रभूत असा घ्यावयास तशी काहीच हरकत नाही; कवितेत मुख्यार्थापेक्षा लाक्षणिक आणि व्यंग अर्थानाच महत्त्व असते; आणि कवी अनेकदा संख्यावाचक शब्द प्राचुर्यसूचक अर्थाने योजतात, यात शंका नाही: 'डॅफोडिल्स'कडे पाहून वर्ड्स्वर्थ 'टेन थाउजंड सॉ आय ॲट अ ग्लान्स' असे म्हणतो[९] तेव्हा काही त्याला 'टेन थाउजंड' म्हणजे 'दहा सहस्र' हा अर्थ अभिप्रेत नसतो, विपुल-प्रभूत हाच अर्थ तो सुचवीत असतो. इंग्रजीमध्ये 'हंड्रेड', 'थाउजंड' या शब्दांना असा प्राचुर्यदर्शक सामान्य अर्थ आलेला दिसतो; प्राचीन मराठीत 'शतकोटी' या शब्दाचा असा वापर अनेकदा झाला आहे का? प्रस्तुत शब्द नामदेव-तुकाराम यांनी किमान दोन-दोनदा वापरला आहे; परंतु येथे नामदेवांचा सदर शब्दप्रयोग हाच चर्चाविषय असल्यामुळे आणि तुकारामांनी नामदेवांच्या शब्दाच्या अनुषंगानेच 'शतकोटी' हा शब्द वापरला असल्यामुळे उभयतांचे सदर उल्लेख, 'विपुल' हा अर्थ काढण्याच्या संदर्भात, सध्या बाजूला ठेवले पाहिजेत. एक सहज आठवणारा उल्लेख म्हणजे शंकराची रामदासकृत आरती; तीत "शतकोटीचे बीज वाचे उच्चारी।" असा उल्लेख आहे.[१०] आरतीचा साद्यंत संदर्भ लक्षात घेऊनही तेथे 'शतकोटी'चा 'विपुल' असा अर्थ निघत नाही असे वाटते.

(३) विनोबांनी 'शतकोटी'चा अर्थ 'शीघ्रकवित्व' असा दिला आहे;[११] तर प्रा. ह. श्री. शेणोलीकरांनी "संख्या अतिशयोक्त" असा शेरा मारला आहे.[१२] परंतु या उभयतांनी आपापल्या मतांस कारणे दिली नाहीत; कदाचित शतकोटी, त्याचा अर्थ या विद्वानांस विशेष महत्त्वाचा, चर्चा करण्याजोगा वाटला नसेल!

(४) वि. ल. भावे यांनी तुकारामकृत संबंधित अभंग नमूद करून 'शतकोटी'ची आकडेवारी दिली आहे.[१३] तर प्र. सि. सुबंध यांनी 'शतकोटी'चा वाच्यार्थ गृहीत धरूनच 'शतकोटी' या शब्दाचा पुनरुच्चार केला आहे.[१४] या उभयतांनी स्वतःला याबाबत 'कमिट' केलेले नाही, परंतु त्यांची सदर विषय हाताळण्याची एकूण वृत्ती लक्षात घेता नामदेवांच्या शतकोटी-अभंग-प्रतिज्ञेत त्यांना काही अतिशयोक्ती किंवा अनवस्थाप्रसंग किंवा मोलाचे दिसते असे वाटत नाही.

६. अ. ना. देशपांडे, **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास**, खंड पहिला : उत्तरार्ध, पुणे, १९६९, पृ. ९८-९९.

७. वि. ल. भावे - शं. गो. तुळपुळे, **महाराष्ट्र-सारस्वत पुरवणीसह**, आवृत्ती पाचवी, पुणे १९६३, पृ. ७३५.

८. शं. दा. पेंडसे, **महाराष्ट्राचा भागवत धर्म : ज्ञानदेव आणि नामदेव**, पुणे, १९६९, पृ. २५७.

९. "Ten thousand saw I at a glance,
Tossing their heads in
sprightly dance."
—'I Wandered Lonely As A Cloud'
William Wordsworth Selected Poetry, Ed. Mark Van Doren, New York, 1950, P. 495.

१०. गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर, **भक्तिमार्गप्रदीप**, मुंबई, शके १८८९, पृ. ५९.

११. विनोबा, **नामदेवांची भजने**, तिसरी आवृत्ती, वर्धा, १९५४ (प्रस्तावना) पृ. नमूद नाही.

१२. ह. श्री. शेणोलीकर, **नामयाची अमृतवाणी**, पुनर्मुद्रण, पुणे १९६८, पृ. २१४.

१३. उनि, वि. ल. भावे, शं. गो. तुळपुळे, पृ. १३५/३६.

१४. उनि, प्र. सि. सुबंध, पृ. १९३-१९६.

वरील विद्वानांच्या सदर विषयाच्या हाताळणी-कडे साकल्याने पाहिले म्हणजे—

(१) 'शतकोटी'चा वाच्यार्थ घेऊन त्याकडे दुर्लक्ष करणे.

(२) 'शतकोटी'चा वाच्यार्थ घेऊन अनवस्था-प्रसंग टाळण्यासाठी संबंधित अभंग प्रक्षिप्त मानणे.

(३) 'शतकोटी'चा लाक्षणिक अर्थ घेणे.

अशा तीन वेगवेगळ्या प्रवृत्ती दिसतात.

: २ :

नामदेवांच्या शतकोटी—अभंगांच्या प्रतिज्ञेचा विचार करताना (१) नामदेवांनी या विषयावर केवळ एक सुटा अभंग लिहिला नसून एक सलग अभंग—मालाच लिहिली आहे; (२) आणि, त्यांच्या 'शतकोटी' व 'अभंग' या शब्दांचा वाच्यार्थ व लाक्षणिक अर्थ या उभय अर्थांचा एकत्र विचार केला पाहिजे, असे वाटते :

(अ) नामदेवांच्या 'शतकोटी'चा पहिला उल्लेख असा :

प्रसवली माता मज मळमूत्रीं।
तेव्हा जिव्हेवरी लिहीले देवे ।।४।।
शतकोटी अभंग करील प्रतिज्ञा ।
नाम मंत्र खुणा वांचुनी पाहे ।।५।।

या अभंगाचा प्र. सि. सुबंध असा अर्थ देतात : 'अशा शुभदिनी माझी माता प्रसूत झाली व तिच्या उदरातून माझा जन्म झाला तेव्हा देवरायाने माझ्या जिव्हास्थानी पुढीलप्रमाणे लिखीत केले ।।४।। हा नामदेव शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा करून ती यशस्वी करील आणि ते अभंग ईशदुंदुभीचे (प्रेमा-विष्करणाचे) असतील अशी ही माझ्या जिव्हेवरील लिखित चिन्हे वाचून पाहा ।।५।।"[१५]

वास्तविक सदर अभंगाचा, संबंधित शब्दांच्या अनुरोधापुरते बोलायचे तर, अर्थ असा होईल : "मी जन्माला आलो तेव्हाच परमेश्वराने 'हा शतकोटी अभंगांची प्रतिज्ञा करील' असे लिहून ठेवले; (या-बद्दल शंका असल्यास) माझ्या जिभेवरील नाम-मंत्राच्या खुणा पाहा." यातील 'नाममंत्राच्या खुणा' हे शब्द शतकोटी—अभंग—प्रतिज्ञेचा अर्थ लावताना फार महत्त्वाचे ठरतात; पण तिकडे आपले दुर्लक्ष होते. नामदेव हे जन्मजात योगीभक्त होते, असा या अभंगाचा आध्यात्मिक अर्थ आहे.

आज आपण संतांचे साहित्यिक आणि सामाजिक कार्य उत्साहाने पाहात आहोत; पण हे सारे संत मूलतः अध्यात्मवादी होते हे विसरू या नको. तसा विसर पडल्यामुळेच महत्त्वाच्या शब्दांकडे दुर्लक्ष होते किंवा अनेक रचना, पुरावा न पाहाता, प्रक्षिप्त ठर-विण्याची आपणांस घाई होते.

(आ) नामदेवांच्या 'शतकोटी'चा दुसरा उल्लेख त्यांच्या एका चार अभंगांच्या मालेत आला आहे. तो उल्लेख असा :

शतकोटी तुझे करीन अभंग ।
म्हणे पांडुरंग । ऐक नाम्यां ।।५।।

या अभंगाचा वाच्यार्थ देताना प्र. सी. सुबंध यांनी नामदेव—पांडुरंग याच्या तोंडच्या संवादात फार उलटापालट केली आहे.[१७]

वास्तविक सदर अभंगमाला—व पहिला उल्लेख असलेला अभंगही—एक कूटकाव्य आहे; ते एक आध्यात्मिक रूपक आहे. या दृष्टीने प्रस्तुत अभंग-मालेचा वाच्यार्थ आणि रूपकात्मक, लाक्षणिक, अध्यात्मनिष्ठ हे दोन्ही अर्थ नमूद व्हावयास हवेत.

(अ) या मालेतील पहिला अभंग असा :

चंद्रभागे तीरी आयकिल्या गोष्टी ।
वाल्मीके शतकोटी । ग्रंथ केला ।। १ ।।
माझिया चित्तासी फार झाले क्लेश ।
वृथा म्यां आयुष्य । गमाविले ।। २ ।।
जाऊनि राऊळा विठोसी विनविले ।
वाल्मीकीनें केले । रामायण ।। ३ ।।
असेन मी खरा तुझा भक्त देवा ।
सिद्धीस हा न्यावा । पण माझा ।। ४ ।।
शतकोटी तुझे करीन अभंग ।
म्हणे पांडुरंग । ऐक नाम्या ।। ५ ।।
तये वेळी होती आयुष्याची वृद्धी ।
आतांचि अवघी । थोडी असे ।। ६ ।।

---

१५. तत्रैव, पृ. ४२.

१६. तत्रैव, पृ. १९३–१९६.

१७. तत्रैव, पृ. १९४.

नामा म्हणे जरी न होता संपूर्ण ।
जिव्हा उतरीन । तुज पुढे ।। ७ ।।

वाच्यार्थ : वाल्मीकी ऋषीने शतकोटी ग्रंथ केला हे ऐकून त्याने आपल्या आयुष्याचे सार्थक केले, आपले आयुष्य मात्र वाया गेले असे वाटून नामदेवांस दुःख झाले आणि आपल्याही आयुष्याचे सार्थक व्हावे म्हणून नामदेवांनी शतकोटी अभंगाची प्रतिज्ञा केली – हा या अभंगाचा वाच्यार्थ आहे.

–यातील 'म्हणे पांडुरंग ऐक नाम्या' या चरणाचा अन्वय, पांडुरंग म्हणाला, 'नामदेवा ऐक' असा नसून नामदेव म्हणाला, 'पांडुरंगा ऐक' असा आहे. तसेच, "तये वेळी होती आयुष्याची वृद्धी । आतांची अवधी थोडी असे ।।" हे शब्दही नामदेवांच्या तोंडचे आहेत; पांडुरंगाच्या नव्हेत; आणि त्यांचा अर्थ 'वाल्मीकीच्या काळी भरपूर आयुष्य होते, आजच्या काळात नाही' असा नसून 'बालपणी आयुष्य वाढते असते, आता प्रौढपणी त्याची उतरण सुरू झाली आहे, मृत्यू जवळ येत आहे' असा आहे.

रूपकात्मक अर्थ : (१) रामायण हा शतकोटी श्लोकांचा ग्रंथ नाही, तो फक्त २४००० श्लोकांचा ग्रंथ आहे. (२) नामदेवानेही शतकोटी अभंग रचले नाहीत; ती वाच्यार्थाने एक अशक्य गोष्ट.

–या दोन कारणांनी 'शतकोटी ग्रंथ' आणि 'शतकोटी अभंग' या शब्दाच्या वाच्यार्थास बाध येतो व त्यांच्या लाक्षणिक, रूपकात्मक अर्थाकडे वळावे लागते; वाच्यार्थबाध हे लक्षणेचे एक महत्त्वाचे साहित्यशास्त्रीय लक्षण होय, हे लक्षात घेतले म्हणजे हा अभंगच कसा आपसूक आपणास रूपकात्मक अर्थाकडे वळवितो ते लक्षात येईल.

वाल्मीकी हा पूर्ववयात वाल्या कोळी होता, वाटमाऱ्या होता, नारदमुनींच्या उपदेशाने त्याला उपरती झाली व 'रा–म–रा–म' असा जप करून त्याने मुक्ती मिळविली अशी पौराणिक आख्यायिका आहे. 'शतकोटी ग्रंथ' म्हणजे येथे वाल्मीकीने केलेला शतकोटी रामनाम जप.[१८]

—नामदेवासंबंधीही अशीच आख्यायिका आहे : तो पूर्ववयात वाटमारी करीत असे. आपल्यासारखाच एक वाल्या वाल्मीकी होतो आणि आपण मात्र हे असे, या जाणिवेने त्याला यातना होणे स्वाभाविकच होय. नामदेवासंबंधीची ही आख्यायिका असत्य होय असे मानले तरी, एक वाटमाऱ्या ऋषी होतो आणि आपण उत्तम कुळशीलाचे असूनही हे असे, अशी खंतही नामदेवास वाटू शकते. म्हणूनच वाल्मीकीप्रमाणे आपणही शतकोटी नामजप करावा अशी प्रतिज्ञा नामदेवांनी केली. 'अभंग' या शब्दाचा एक अर्थ 'एक छंद : प्रकार–काव्यप्रकार' हा जसा आहे. तद्वतच 'नाममुद्रा' असाही त्याचा दुसरा एक अर्थ आहे; 'या ग्रंथाचा अभंगु मज द्यावा'[१९] हे रामदेवरायाचे उद्गार प्रसिद्ध आहेत. म्हणून 'शतकोटी अभंग' म्हणजे 'शतकोटी नामजप.'

पण 'शतकोटी' या संख्येचाच नामदेवांचा आग्रह का ? त्याला काहीतरी पारिभाषिक कारण असले पाहिजे. माणूस एका मिनिटाला साधारणतः १८ श्वासोच्छ्वास करीत असतो; मनाच्या–शरीराच्या उद्दीपित अवस्थेत हे प्रमाण वाढत असते. या हिशेबाने शंभर वर्षांच्या आयुष्यात एक व्यक्ती सुमारे शतकोटी वेळा श्वासोच्छ्वासाची क्रिया करते. श्वास घेताना 'सा' सदृश ध्वनी होतो. श्वास टाकताना 'हं' सदृश ध्वनी होतो. हाच साऽहं ध्वनी. असा जप प्रत्येकाचाच चालू असतो. परंतु हा 'जप' आहे अशी जाणीव सामान्यास नसते, योग्यास असते कारण या जपाकडे तो साक्षीभूत होऊन पाहत असतो. पारिभाषिक शब्दात या जपाला 'अजपाजप' अशी संज्ञा आहे. 'स' हे शक्तिबीज व 'ह' हे शिवबीज. असा हा शिव-शक्ति योग आहे.[२०] असे हे 'शतकोटीचे बीज' आहे.

या अभंगाचा अध्यात्मनिष्ठ लाक्षणिक अर्थ एवढाच आहे की, नामदेव आपले संपूर्ण आयुष्य ईशचिंतनात व्यतीत करतील.

(आ) अभंगमालेतील **दुसरा अभंग** असा :

निश्चय पाहुनी उपजली दया ।
स्वामी देवराया । पांडुरंगा ।। १ ।।

---

१८. आधुनिक काळात, वाईच्या शांताश्रम स्वामींनी काशीला बारा वर्षात रामनामाचा शतकोटी जप पूर्ण केल्याचे नमूद आहे. पाहा – श्री. म. वैद्य, **साधुसंतांचा देवयानपंथ (साक्षात्कार योग)**, दुसरी आवृत्ती, पुणे, १९५२, पृ. ९६.

१९. **स्मृतिस्थळ**, संपा. वामन नारायण देशपांडे, दुसरी आवृत्ती, पुणे, १९६०, पृ. ३७.

२०. उनि, श्री. म. वैद्य, पृ. १५६–१५७.

सारजेसी सांगे भिमातीरी हरि ।
बैस जिव्हेवरी । नामयाच्या ॥२॥
लाडके लडिवाळ नामा माझे तान्हे ।
तयाला मजविण । कोण आहे ॥३॥
मजवरी त्याचे फार असे ऋण
होईन उत्तीर्ण । एवढचाने ॥४॥
नामा म्हणे हातो बांधोनिया वह्या ।
बसे लिहावया । पांडूरंग ॥५॥

वाच्यार्थ : नामदेवांच्या शतकोटी अभंगाची प्रतिज्ञा परमेश्वराला दुरापास्त वाटली व म्हणून त्याला नामदेवांची दया आली. नामदेव त्याचे लाडके आणि अनाथ बाळ; म्हणून शारदेला नामदेवांच्या मुखी अवतरण्यास सांगितले व स्वतः त्याच्या अभंग-लेखनिकाचे काम पत्करले.

रूपकात्मक अर्थ : अजपाजपासाठी, परमेश्वर-प्राप्तीसाठी परमेश्वराचीच कृपा भक्तावर हवी, नामदेवांना ती लाभली. अजपाजपासाठी वैखरी उपयोगाची नाही, तिथे परावाणीच हवी. म्हणून सारजा<शारदा म्हणजे परावाणी. परमेश्वराचे पर-मेश्वरपण भक्तालाच कळते, इतर जड–जीवसृष्टीला नाही; म्हणून यावावतीत परमेश्वरच भक्ताचा ऋणी असतो. परावाणीने चालणारा हा जप जिथे वैखरीने उच्चारता येत नाही तिथे तो एखाद्या रामा–शिवा–गोविंदाने लेखणीने कागदावर लिहावा कसा ? त्याची नोंद फक्त परमेश्वरापाशीच असावयाची. म्हणूनच, 'पांडुरंग माझा लेखनिक झाला' असे नामदेव म्हणतात.

ज्यांनी नामदेवांच्या शतकोटी अभंगांचा लेखन–मुद्रण–कागद या संदर्भात हिशेब मांडला त्यांनी, नामदेवांनी 'मी अभंग लिहीन' असे कुठेही म्हटले नाही 'मी अभंग करीन, गाईन' असे म्हटले, हे लक्षात घेतले नाही.

(इ) अभंगमालेतील **तिसरा अभंग** असा :

अभंगाची कळा नाही मी नेणत ।
त्वरा केली प्रीत । केशी राजे ॥१॥
अक्षरांची संख्या बोलिले उदंड ।
मेरु सुप्रचंड । षट् आदी ॥२॥
सहा साडेतीन चरण जाणावे ।
अक्षरे मोजावी । चौक चारी ॥३॥
पहिल्यापासोन तिसऱ्यापर्यंत ।
अठरा गणित । मोज आले ॥४॥
चौकचारी आधी बोलली मातृका
बावीसाची संख्या शेवटील ॥५॥
दोड चरणाचे दीर्घ ते अक्षर ।
मुमुक्षू विचार । बोध केला ॥६॥
नामा म्हणे मज स्वप्न दिले हरी । [२१]
प्रीतीने खेचरी । आज्ञा केली ॥७॥

वाच्यार्थ : अभंगरचनेचे तंत्र नामदेवांना अवगत नव्हते ते परमेश्वराने त्यांना शिकविले. परमेश्वराने सांगितले की एका अभंगामध्ये उदंड अक्षरे असू शकतात; हा काव्यप्रकार म्हणजे मेरूपर्वतच होय. परंतु प्रत्येक चरणक (आदी=युनिट) सहा अक्षरांचा हवा. अशा सहा–सहा अक्षरांच्या चरणकांचे साडेतीन चरण मिळून एक चौक होतो. आणि अभंगाची एकूण अक्षर संख्या या चौकाच्या अनुरोधाने मोजावी. पहिल्या तीन चरणांत एकूण अठरा अक्षरे असली पाहिजेत (प्रत्येक चरणकात ६+६+६ अशीच मोडणी पाहिजे असे नाही; उदा० ५+७+६ अशीही चालेल.) आणि एका चौकात एकूण बावीस अक्षरे आली पाहिजेत. म्हणजे शेवटचा चरणक सहा अक्ष-रांचा नको; चार अक्षरांचा, आखूड पाहिजे. या अखेरच्या आखूड चरणकातील अक्षरे दीर्घ असावीत किंवा तसे नसेल तर त्यातील अक्षरांचा उच्चार दीर्घ व्हावा, (म्हणजे आधीच्या तीन चरणकांशी त्याचा ताल जमेल). नामदेवास परमेश्वराने असे अभंगतंत्र सांगितले आणि त्यांचा गुरू खेचर याने अभंग-रचनेची आज्ञा केली.

रूपकात्मक अर्थ : नामदेव म्हणतात, खऱ्या नामस्मरणाचे स्वरूप मला माहीत नव्हते; वाङ्मय नामस्मरणातच मी रमलो होतो. परंतु परमेश्वरी प्रसादाने मला अजपाजपाचा बोध झाला. 'अभंगाची

---

२१. (अ) या अभंगाचा सुबंध यांनी दिलेला वाच्यार्थ फारच असमाधानकारक वाटतो. पाहा उनि; प्र० सि० सुबंध, पृ. १९५.

(आ) प्रस्तुत अभंगाचा छंद : शास्त्रीय अर्थ डॉ. ना. ग. जोशी यांनी दिला आहे. पाहा : ना. ग. जोशी, **मराठी छंदोरचना (लयदृष्ट्या पुनर्विचार)**, वडोदे, १९५५, पृ. १३७.

कळा नाही मी नेणत . . . ' याचा हा आध्यात्मिक अर्थ आहे. वैंखरीच्या दृष्टीने पाहिले तर अक्षरे उदंड– बावन्न–आहेत आणि त्यात क वर्ग, च वर्ग, ट वर्ग, त वर्ग, प वर्ग व य वर्ग असे सहा मुख्य गट आहेत, परंतु या सहाही वर्गांतील बावन्न मातृकांपैकी खरोखर अध्यात्मदृष्टीने महत्त्वाची अशी केवळ साडेतीन अक्षरेच होत; तीच अक्षर–अमर होत. ती म्हणजे अ + ऊ + म यांनी सिद्ध होणारा ॐकार. या ओंकाराचे चिंतन चारही-परा, पश्यन्ती, मध्यमा, वैंखरी-वाणींनी करावे. ओंकारातील पहिल्या तीन मात्रा तन्मात्रा–पंचक + इंद्रियपंचक + महाभूतपंचक + महत् + अहं + प्रकृती अशा अठरा तत्त्वांच्या सूचक आहेत; (वैंखरीच्या दृष्टीने बावन्न मूळाक्षरे असली तरी परावाणीच्या दृष्टीने फक्त बावीसच मूळाक्षरे होत. ती म्हणजे पंचमहाभूते, पंचतन्मात्रा, पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेन्द्रिये, प्रकृती व परब्रह्म). अखेरची अर्धमात्रा ब्रह्मसूचक होय. हा आत्मबोध परमेश्वरामुळेच नामदेवास झाला व आज्ञाचक्र भेदून चिदाकाशापर्यंत त्याचा विकास घडून आला. (' मेरू सुप्रचंड षट् आदी ' याचा ' षट्चक्राचा मेरू ' असाही अर्थ होऊ शकेल.)

यावरून या अभंगातील काही शब्दांचे पारिभाषिक अर्थ असे सिद्ध होतात.

१. अभंग=परावाणीने करावयाचा नामजप.
२. अक्षर=(अ) वैंखरीवाणीतील वर्ण.
(आ) परब्रह्म.
३. षट्, सहा=(अ) वर्णांचे सहा वर्ग.
(आ) कुंडलिनीयोगातील षट्चक्र
४. साडेतीन चरण=ओंकार.
५, चौकचारी=चार वाणी : परा, पश्यन्ती, मध्यमा, वैंखरी.
६. अठरा=प्रकृती व तिच्यापासून निर्माण झालेली सृष्टी.
७. बावीस=परब्रह्म, प्रकृती व प्रकृतीपासून निर्माण झालेली सृष्टी.
८. दीड चरण=ओंकाराची अर्धमात्रा.
९. आज्ञा=आज्ञाचक्र.
१०. खेचरी=चिदाकाशात नेणारी नाथयोगमुद्रा.
११. स्वप्न=दृष्टान्त; साक्षात्कार.

नामदेव हे प्रथम तोंडी नामस्मरण करणारे साधे भक्त होते. पुढे नाथयोगी विसोबा खेचराने त्यांना नाथयोगाची दीक्षा दिली. हे लक्षात घेता सदर कूट अभंग दुसऱ्या कोणा विष्णुदास नाम्याचा नसून प्रस्तुत नामदेवाचाच असला पाहिजे असे वाटते. नामदेवांनी ज्ञानदेवांस आर्त भक्तीचा, नामस्मरणाचा सुलभ मार्ग शिकविला, वगैरे तर्कही प्रस्तुत अभंगाच्या आधारे अप्रस्तुत ठरू शकतात.[२२] कारण या दृष्टीने ज्ञानदेव व नामदेव हे उभय संत एकाच पंथातील साक्षात्कारी पुरुष ठरतात.

(ई) अभंगमालेतील **चौथा अभंग** असा :

खवळलो आतां न भियें रे तुला ।
सांडिली रे लाज । लौकिकाची ।। १ ।।
आम्ही दीन शिंपी इथें यातिहीन ।
दे माझें ठेवणें । केशी राजा ।। २ ।।
साठ लक्ष संख्या चौऱ्यांशी कोटि ।
त्यांत मी कवडी । सोडूं काय ।। ३ ।।
आणिक याहुन असेल वेगळें ।
घेईन ते बळें । जाण आतां ।। ४ ।।
तुझें थोरपण ऐक हे देवा ।
दुर्बळाचा ठेवा । अभिलाषी ।। ५ ।।
म्हणुनि पोरटा नामा खेचराचा ।
काया मनें वाचा । सत्य करी ।। ६ ।।

वाच्यार्थ : शतकोटी अभंगांच्या या प्रतिज्ञेने मी आता पुरा पिसा झालो आहे; परमेश्वरा आता मी तुलाच घाबरत नाही तर या लौकिक जगाची भीड कसली ? – नामदेव म्हणतात, देवा तुझ्याजवळ माझी अगणित संपत्ती पडली आहे; तिच्यातील एक कवडीही मी सोडणार नाही. उलट जास्तीचे, अधिक काही मिळवीन. तू समर्थ असून माझ्यासारख्या कंगालाच्या संपत्तीचा हव्यास तुला कशाला हवा ? म्हणून विसोबा खेचराचा पुत्र असा हा नामदेव शिंपी आपली शतकोटीची प्रतिज्ञा आता खरी करणार.

रूपकात्मक अर्थ : परावाणीच्या अजपाजपाने नामदेव देहभान विसरले आहेत. त्यांच्या दृष्टीने

---

२२. **नामदेवरायाची सार्थ गाथा,** भाग पहिला, संपा. प्र. सि. सुबंध, १९४९, प्रस्तावना (वि. भि. कोलते), पृ. २९–३०.

प्रपंच अस्तित्वातच नाही, तो माया होय. स्वतः नामदेवच परमेश्वररूप झाल्याने (अहं ब्रह्मास्मि ।) परमेश्वरप्राप्तीची वेगळी इच्छाच त्यांना उरली नाही. या सोऽहं अवस्थेमुळे त्यांची 'जीव' ही जात नाहीशी झाली; ते यातिहीन झाले. परमेश्वराने मानवाला जन्म दिला; उरलेल्या आयुष्यात नामदेव सुमारे साठ लक्ष चौऱ्यांशी कोटी वेळा श्वासोच्छ्वास घेतील. त्यातील एकही श्वास जपाविना ते वाया घालविणार नाहीत. भक्ताचा प्रत्येक श्वास स्वतःसाठी मागून घेणे हीच ईश्वराची थोरवी आहे. नामदेव 'शिपी' आहेत म्हणजे या पृथक वाटणाऱ्या सृष्टीत त्यांनी ब्रह्माचे सूत्र ओवले आहे, शिवले आहे, पाहिले आहे. हा नामदेव चिदाकाशात संचार करणारा योगी आहे व म्हणूनच शतकोटी अभंगांची म्हणजे श्वासागणिक परावाचेने नामजप करण्याची त्यांची प्रतिज्ञा सत्य ठरणार आहे.

या सर्व अर्थविवरणावर अशी एक शंका येईल की तुकारामाने नामदेवांच्या शतकोटी अभंगांची लौकिक अर्थाने आकडेवारी सादर केली आहे,[23] तिचे काय ? या शंकेचेही समाधान करता येईल (वास्तविक या विवेचनाच्या आधारे तुकारामाचे अभंगही कसे कूट अभंग आहेत हे आता एखाद्याला कळू शकते !) पण ते सविस्तर काम तुकाराम-जन्मशताब्दीसाठी राखून ठेवणे बरे; नाही ?

[प्रा. नि. ना. रेळेकर आणि त्यांचे सहकारी यांनी संपादित केलेल्या **'श्रीनामदेव-दर्शन'** या आगामी ग्रंथातून.]

---

२३. उनि, वि. ल. भावे – शं. गो. तुळपुळे. पृ. १३६–१३७.

नामदेवांचा निर्गुणभक्ती विचार

—प्रा. मधुकर रामदास जोशी

ज्या काही संतकवींनी हिंदी व मराठी वाङ्मयेतिहासात महत्त्वाची भर टाकली त्यांच्यापैकी संतशिरोमणी नामदेवमहाराज हे एक आहेत. त्यांचे अभंग महाराष्ट्रात प्रसिद्ध असून त्यांची पदरचना शिखांच्या धर्मग्रंथांत व हिंदी साहित्यात उपलब्ध होते. अद्यापि नामदेवांचा अधिकृत अभंग व पदरचनेचा गाथा उपलब्ध नसला तरी हिंदी, मराठी, शिख परंपरेतून त्यांचे साहित्य अभ्यासक प्रकाशात आणीत आहेत ही स्वागतार्ह अशीच गोष्ट आहे. नामदेवांच्या समाधीनंतर राजकीय अस्थिर परिस्थिती निर्माण होऊन सांस्कृतिक जीवन जवळ जवळ उध्वस्त झाले होते. नामदेव यांचा मुक्काम काही दिवस महाराष्ट्र, काही दिवस उत्तर प्रदेश व पंजाबमध्ये होता. त्यांचे अनुयायी मराठी, पंजाबी, राजस्थानी व हिंदी भाषेच्या विविध बोलींपैकी असून या सर्व नामदेवभक्तांनी आपल्या गुरूच्या पदरचनेची जोपासना मोठ्या सश्रद्ध भावनेने केलेली आहे. या भक्तांनी आपल्या सांप्रदायिक परंपरेप्रमाणे नामदेवांच्या अभंग व पदरचनेचे रक्षण केले असले तरी, नामदेवसाहित्यात पाठभेद, प्रक्षिप्त अभंग व पदांचा समावेश, शंकास्पद साहित्याची निर्मिती, अशुद्ध भाषा आजही आढळून येते. यात भरीला भर म्हणजे नामदेवांनी आपले सर्वच कवित्व ग्रथित केले असावे असे समजण्यास पुरावा नाही. यात्रेनिमित्त त्यांचा संचार होत असता, त्यांचे कीर्तन नामघोष प्रसंगी निर्माण झालेल्या उत्स्फूर्त कवित्वाची नोंद करणारा एखादा सच्चिदानंदबावा त्यांना भेटला नाही. परसा भागवतांनी त्यांची मराठी अभंग उतरून घेण्याची शक्यता असली तरी उत्तरभारतात नामदेवांच्या वास्तव्यात परसा भागवत त्यांच्याजवळ नसावेत. वारकरी पंथाने महाराष्ट्रात, शिख पंथाने पंजाबात, व कबीर पंथाने उत्तर भारतात उत्कृष्ट श्रद्धतेने त्यांचे कवित्व सुरक्षित ठेवले. कबीर, रैदास, पिपासा इत्यादी संतमंडळींनी आपल्या कवनांतून केलेला नामदेवांचा गौरव प्रसिद्ध आहे.

कबीर नामदेवांचा भक्त होता व त्यांच्याबद्दलचा आदर कबीराच्या कवित्वांत सुद्धा आढळतो. कबीरांचे उल्लेख, आख्यायिका मराठी संतमंडळात प्रचलित होत्या. संतनामावळीत कबीराचे नाव आढळते. संतमंडळातील ज्या संग्रहाकाने नामदेवविषयक अभंग संग्रहित केले तो वारकरी पंथातील असावा व त्याला नामदेव–कबीर परंपरेचा दुवा माहित असण्याची जास्त शक्यता आहे. मराठी संतमंडळीपैकी नामदेव, त्रिलोचन, रामानंद व सेना ही संतमंडळी उत्तरभारतात प्रसिद्ध आहेत. यात ज्ञानदेवप्रभावळीपैकी विसोबा खेचर, परसा भागवत, जनाबाई, चोखामेळा, बंका, सावता, नरहरी सोनार, सच्चिदानंद बावा, चांगा वटेश्वर यांची नावे येत नाहीत हे विशेष लक्षणीय आहे. ज्ञानदेवांच्या समाधीनंतर शके १२३५ पर्यंत कसावसा वारकऱ्यांचा प्रभाव महाराष्ट्रात होता. शके १२३५–४० दरम्यान जवळ जवळ ज्ञानदेव प्रभावळीतील सर्व संत समाधिस्त झाले. हा कालखंड अतिशय धामधुमीचा असून खुद्द पंढरपूर येथील विठ्ठलमंदिराला धोका निर्माण झाला. ज्ञानदेवकालात विठ्ठलमंदिर चांगले प्रशस्त होते व कन्नड कवी चौंडरस याने केलेल्या वर्णनावरून विठ्ठलमंदिराची भव्यता लक्षात येते. परंतु मुसलमानांच्या स्वाऱ्यांचा रोख पंढरपूरकडे वळला असावा. डॉ. तुळपुळे लिहितात,[१] "शके १२२८ मधील मलिक काफरच्या स्वारीच्या समयी अशीच ही मूर्ति कोठेतरी हलविण्यात आली असावी व नंतर स्थिरस्थावर झाल्यावर

१. प्राचीन मराठी कोरीव लेख, पान २५८.

शके १२३३ मध्ये कोण्या 'उभयमार्गी' केशवदेवाने पुनः तिची स्थापना मंदिरात केली असावी." या समयी ज्ञानदेव परिवारातील नामदेव व त्रिलोचन यांचा संचार महाराष्ट्राबाहेर असतानाच त्यांनी वारकरी पंथाचा विस्तार केला. नामस्मरण, कीर्तन व संतमेळा या त्रयीद्वारा आपला भक्तिविचार पदरचनेतून मांडला. नामदेव–त्रिलोचन आपल्या अभंगांतून कीर्तनभक्ती कथन करीत असतानाच रामानुज–माध्वांचा द्वैतावर आधारलेला भक्तिविचार उत्तर भारतात प्रतिष्ठित झाला होता, व वृंदावन–मथुरा हा भाग भक्तिकेंद्र म्हणून उदयाला येत होता. नामदेव–रामानंद–कबीर परंपरेतून निर्गुणभक्तीही याच वेळी लोकांसमोर आली. रामानुज, मध्व, चैतन्य, निंबार्क, वल्लभादिकांच्या प्रभावातून निर्माण झालेली विचारधारा हिंदी साहित्यात प्रभावशाली आहे, यावद्दल कोणाचेही दुमत होणार नाही. परंतु याच कालखंडात निर्गुणभक्ती विचारसरणी प्रगट झाली व या विचारसरणीची एक थोर परंपरा निर्मित होऊन त्यात रामानंद, कबीर सारखे संतपुरुष सामील झाले, त्या परंपरेचे जनक संत नामदेव् होत.

नामदेव–कबीर यांच्यामधील दुवा रामानंदाचा आहे. डॉ. रामकुमार वर्मा यांचे मते शके १२२८ रामानंदांचा जन्मशक आहे. 'बहुत काल वपु धारी' या त्यांच्या वर्णनावरून रामानंद दिर्घायुषी होते, असे अभ्यासक समजतात. सुप्रसिद्ध वारकरी सोनोपंत दांडेकर यांचे मते रामानंदांनी कबीरांना शके१३२० मध्ये उपदेश दिला. रामानंदांनी आपल्या वेदांत–सूत्र भाष्यांत अमलानंदांच्या "वेदान्त कल्पतरूचा" उल्लेख केला आहे. अमलानंद हे कृष्णदेव यादवाच्या वेळी होते. त्यांचा समय शके ११७०–८० असा आहे. जनाबाई यांच्या अभंगात रामानंदांची परंपरा जी कथन केली आहे ती पुढील प्रमाणे आहे—

पूर्णानंद–परमानंद–रामानंद. एकनाथ सुद्धा आपल्या अभंगांत परमानंदांचा उल्लेख करतात. प्रख्यात वारकरी जोगा परमानंद यांचे अभंग, पदे प्रसिद्ध असून त्यांचे गुरू परमानंद आहेत. महाराष्ट्र सारस्वतकार भावे यांनी[२] त्यांचा अभंग दिला असून आपल्या गुरूची भेट झाली त्यावेळी जोग्याची जी अवस्था झाली, त्याचे वर्णन त्या अभंगात आले आहे. जोगा यांचा समय शके १२५२ आहे व हे जोगा व कबीरांचे गुरू रामानंद गुरुबंधु होते. रामानंदांच्या ग्रंथांत अद्वैताचा विचार असून अमलानंदाचा त्यांनी जो उल्लेख केला त्यावरून पुढील परंपरेचा आलेख आपणाला काढ़ता येतो.

अमलानंद (शके ११७०–८०)
पूर्णानंद
|
परमानंद (ज्ञानदेव समकालीन)
|
जोगा (शके १२५२) — रामानंद (नामदेम समकालीन)
|
कबीर्

जोगा परमानंद शके १२५०–५२ सुमारास कवित्व निर्माण करीत असतानाच अमलानंदाच्या अद्वैती परंपरेतील रामानंद आपले गुरू परमानंदांच्यामुळे वारकरी पंथाकडे आकृष्ट झाले. परमानंदाचा एक शिष्य जोगा विठ्ठलभक्त म्हणून प्रसिद्धच आहे. परमानंदाचा आदरपूर्वक उल्लेख ज्याअर्थी जनाबाई, एकनाथ वारकरी मंडळी करतात त्याअर्थी ज्ञानदेव मंडळाशी व पंढरपूर विठ्ठल केंद्राशी परमानंदांचे जिव्हाळ्याचे संबंध असण्याची संभवनीयता आहे. परमानंदाचे दुसरे शिष्य रामानंद हे शके १२४०–१२५० दरम्यान वारकरी पंथाकडे आकर्षित झाले. त्यावेळी नामदेवाकडे वारकरीपंथाचे नेतृत्व होते. अतएव कबीरगुरू रामानंद, नामदेवांच्या सान्निध्यात शके १२५०–१२७२ पर्यंत होते. नामदेवांच्या सहवासामुळे वारकरी पंथ, त्यामधील नामघोष, किर्तनपद्धती व भक्तीचे यथार्थ स्वरूप या अमलानंद परंपरेतील संन्यासी ज्ञानीला कळून चुकले व तेच रामानंदांनी कबीराला दिले. कबीरांना आपले गुरू रामानंदाकडून नामदेवविषयक सर्व माहिती व विशेषतः नामदेवाची भक्ती ज्ञात झाल्यामुळेच त्यांनी नामदेवांची योग्यता प्रल्हाद, शुकदेव, उद्धवाप्रमाणे मानली.

हिंदी वाङमयेतिहासकारांनी सगुण व निर्गुण भक्तीचे विभाग करून वल्लभ–चैतन्यांच्या वैचारिक

२. महाराष्ट्र सारस्वत पान १४६, पाचवी आवृत्ती.

पार्श्वभूमीवर विवेचन केले आहे. हिंदी वाङ्मयातील सगुण, निर्गुण भक्तीच्या कल्पना गोरक्ष–कबीर पंथाचा विचार करून सादर करण्यात आल्या असल्या तरी मराठी वाङ्मयात–विशेषत: वारकरी पंथामधील भक्तीचा जो सगुण–निर्गुण विचार दिसून येतो त्याला ज्ञानदेवीची पार्श्वभूमी आहे. नामदेवांचे वैचारिक जीवन व आध्यात्मिक भावविश्व, नाथपंथीय ज्ञानदेव व विसोबा खेचरमुळे संपन्न झालेले आहे. नामदेवाच्या साहित्यामधील विचारधन व चोखामेळा–बंकाप्रभृतींच्या अभंगसृष्टीतील संपदा नाथपंथामुळे निर्माण झाली आहे. नामदेवांच्या अभंग व पदरचनेची निर्मिती ज्ञानेश्वरीचे उपबृंहण आहे. ज्ञानदेवीचे त्यांचे अध्ययन सखोल होते. ज्ञानदेवांचे विचार ठायीठायी नामदेवांच्या अभंग–पदरचनेत डोकावताना दिसतात. ज्ञानदेव–नामदेव यांचे जिव्हाळ्याचे संबंध विश्वविख्यात आहेत. योग, भक्ती, ज्ञान, कर्म यांचा नामदेवांनी मांडलेला विचार अभ्यासित असताना ज्ञानेशांच्या शेकडो ओव्या व असंख्य अभंग आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात. पुंडलिक–ज्ञानदेवांचे विचार कीर्तन व साहित्यातून प्रसृत करणे नामदेवांचे जीवित कार्य होते व त्याचाच परिणाम नामदेवांच्या सहवासाने रामानंदावर झाला; म्हणून हिंदी वाङ्मयातील निर्गुणभक्ती म्हणजे वारकरी विचारांचे उपबृंहण आहे.

नामदेवांची गुरुपरंपरा नाथपंथाची आहे. वारकरी पंथात प्रचलित असलेल्या आख्यायिकांनुसार संतमंडळींनी परीक्षा घेतल्यानंतर नाथपंथीय विसोबा खेचरकडून त्यांनी गुरुपदेश घेतला. गोरक्षमताचा प्रसार महाराष्ट्राप्रमाणेच पंजाव, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेशात असून जे अनेक नाथसिद्ध नामदेव कालात होते त्यापैकी हनुमंत एक होत. हे सिंहल देशात राहत होते. हनुमंत यांचे नाव हणवंत असेही आढळते. नाथसिद्धांच्या प्राचीन नामावळीपैकी शिवदीनमठ संग्रह, विवेकामृत, तंजावर व वर्णरत्नाकर सूचीत या सिद्धाचे नाव आहे. कविशेखराचार्यांच्या वर्णरत्नाकराची रचना शके १३०० दरम्यान झाल्यामुळे हनुमंतसिद्ध ज्ञानदेव–नामदेव कालांतील आहे. यांचे मकरध्वज, विधिकीध्वज, रितीध्वज व मंगलध्वज शिष्य होते. डॉ. द्विवेदींनी[३] हनुमंत सिद्धाच्या सबदी व पदे प्रकाशित केली असून कबीरावर हनुमंत सिद्धाचा वैचारिक प्रभाव आहे. विशेष लक्षणीय म्हणजे हनुमंत–रामानंद–कबीर–कमाल–प्रेमदास अशी एक परंपरा आढळते. नामदेव–रामानंद ज्या काळात कीर्तन व भक्तीचा प्रसार उत्तरभारतात करीत होते त्याच कालात हनुमानसिद्धाशी त्यांचे संबंध आले असावेत असे माझे अनुमान आहे. पृथ्वीनाथाने शुकदेव, गोरक्षानंतर एका पदात[४] नामदेव–हनुमंताचा पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे :–

> **प्रिथीनाथ नामदेव कऊ कथ्यां ।**
> **क्या बोल्या हणवंत ।।**
> **जिस करनी तें पद भया ।**
> **षिण में पहुंतां लंक ।।१४।। ४५०।।**

नामदेव, रामानंद व हनुमंत हे तिघेही नाथपंथाचे वारस असून समकालीन आहेत व यांचे ऋण कबीराने मान्य केले आहे. कबीर नामदेवांना शुकदेव व उद्धवांच्या बरोबरीचे समजतात. शुक, उद्धव, प्रल्हाद, ध्रुव, अर्जुन, नारद ही मंडळी महाभागवत आहेत. या भावक्त्यापैकी विशेषत: शुकदेवांनी आपल्या सरस रचनेने कृष्णभक्तीचा रसप्रवाह सर्वत्र खेळवून साहित्याला परतत्वाचा निकष लावला. व कीर्तनसंस्था निर्माण केली. पद्मपुराणकार म्हणतात,

> **" ननर्त मध्ये त्रिकमेव तत्र**
> **भक्त्यादिकानां नटवत्सुतेजसाम् ।**
> **अलौकिकं कीर्तनमेतदीक्ष्य हरि:**
> **प्रसन्नोऽपि वचोऽब्रवीत्तत् ।।**
> **मत्तो वरं भाववृताद् वृणुध्वं प्रीत:**
> **कथाकीर्तन तोऽस्मि साम्प्रतं ।**
> **श्रुत्वेति तद्वाक्यमतिप्रसन्ना:**
> **प्रेमार्द्र चित्ता हरिमूचिरे ते ।।**
> **नगाह गाथाव च सर्वभक्तैरेभिस्त्वया**
> **भात्यमिति प्रयत्नात् ।**
> **मनोरथोऽयं परिपूरणीयस्तथेति**
> **चोक्त्वान्तरधीयताच्युत: ।।**
> **ततोऽनमत्तच्चरणेषु नारदस्तथा**
> **शुकादीनपि तापसांश्च ।**
> **अथ प्रहृष्टा: परिनष्टमोहा:**
> **सर्वे ययु: पीतकथामृतास्ते ।।**

---

३. नाथ सिद्धों की बानियाँ :— हजारीप्रसाद द्विवेदी.

४. नाथसिद्धो कीं बानियाँ :—हजारीप्रसाद द्विवेदी, पान क्र. ७२.

भक्तिः सुताभ्यां सह रक्षिता सा
शास्त्रे स्वकीयेऽपि तदा शुकेन ।
अतो हरिर्भागवतस्य सेकनाश्चितं
समायाति हि वैष्णवानाम् ॥
दारिद्र्यदुःखज्वरदाहितानां
माया पिशाची परिमर्दितानाम् ।
संसारसिन्धौ परिपातितानां
क्षेमाय वै भागवतं प्रगर्जति ॥"

या महाभागवतांच्या परंपरेतील नामदेव आहेत. विठ्ठलभक्तीची गायत्री त्यांनी आपल्या अभंगपदरचनेत मांडली आहे. त्यांनी अद्वैत व निर्गुण अशा ज्ञानप्रधान भक्तीचा पुरस्कार केला आहे. ते म्हणतात,

ज्या कारन त्रिभुवन फिरि आए ।
सो निधान धरि बैठे पाए ॥
नामदेव कहै कहुँ आइ एन जाइए ।
अपने रामधरि बैठे गाइए ॥
हिरदै माला हिरदै गोपाला ।
हिरदै सृष्टिकौ दीनदयाला ॥
हिरदै दीपक घटि उजियाला ।
फूटि विचार टूटि गयोनाला ॥

वरील पदांत देव-भक्ताच्या हृदयात असतो व भक्ती दीपकामुळे शरीर प्रकाशमान झाले आहे असा जो विचार आला आहे तो म्हणजे शिवशक्ती सामरस्यामुळे जी स्थिती होते त्याचाच प्रतिध्वनी आहे. नामदेव हे नाथपंथीय असून गुरुमाहात्म्य या परंपरेत आहे. गुरूमुळे योग, भक्ती, कर्म व ज्ञान प्राप्त होते गुरुप्रसादाचे वर्णन करताना नामदेव म्हणतात,

प्रणवत नामदेव गुरु परसादै
पाया तिनहि लुकाया ॥

५. पद्मपुराणोक्त भागवत माहात्म्य अध्याय ६

६. हिंदी साहित्यातील संतमताचे आद्यप्रवर्तक- संत नामदेव, नवभारत सप्टेंबर, ६३.

गुरूने नामदेवांना सर्वस्व दिले म्हणून त्यांना इतरत्र जाण्याची इच्छा नाही. नामदेव म्हणतात,

तीरथ जाऊं न जल में पैसो,
जीव जंत न सताऊंगा ।
अठ सठि तीरथ गुरु लवाए,
घटि ही भीतर न्हाऊंगा ॥

गरुकृपेने त्यांना योगमार्गात प्रवेश मिळाला व त्या मार्गातील अनेक रहस्यमय अनुभव त्यांना जे आले त्याचे वर्णन करताना नामदेव म्हणतात,

सहस्र दळांमधून अनुहात ध्वनि उठीं
नामाचेनि गजकें पातक रिघालीं कपाटीं ॥
जागा रे गोपाळांनो रामनामी जागा ॥

सरतेशेवटी तुर्या व उन्मनी अवस्थेचा अनुभव घेतल्यानंतर त्यांना स्वरूप साक्षात्कार झाला त्याचे वर्णन नामदेव करतात,[७]

देह मंदिरा भीरती । शेजे सूदला श्रीहरि ॥
निद्रा उन्मनीचे भरीं । तें म्या स्वप्न देखिलें ॥
स्वप्नी भूललें बाई । मागील वाठवेचि काई ॥
हा जीव परवस्तूच्या ठाई । तनुमनें आटला ॥
स्वप्न सांगू कोणासी । विवेक करिती तयासी ॥
हे कोडे अज्ञानासी । संतावांचुनि नुगले ॥
ध्यानी पहुडला सांवळा । जवळी नारी बारा सोळा ॥
खिजणे वारिती सकळां । सोहं शब्द जागरणीं ॥
धिं धिं तुरे वाजती । अनुहात ध्वनि गर्जती ॥
तेथे निद्रा ना सुषुप्ति । चंद्रसूर्य मावळले ॥
मना पवना नाही भेद । तया ठायीं हा गोविंद ॥
तेथे खुंटला अनुवाद । वेदश्रुति आटल्या ॥
म्हणे विष्णुदास नामा । जन्ममरण नाही आम्हां ॥
कृपा केली मेघश्यामा । संतसंगे तारिलो ॥

७ संत वचनामृत:- रा. द. रानडे. पान ११७

मराठी संतांचे सामाजिक कार्य : नामदेव

—डॉ. अ. ना. देशपांडे

'संतांचं सामाजिक कार्य' या शब्दसमूहातून जो विचार व्यक्त होतो त्यात वदतोव्याघात आहे, म्हणजे असं की त्यात दोन परस्परविरोधी विचार एकत्र आलेले आहेत. संत आणि सामाजिक कार्य यांची युती ही स्वभावतःच अशक्य आहे. माझं हे बोलणं प्रथम श्रवणात कदाचित चमत्कारिक वाटेल, पण संतांचं खरं कार्य कोणतं याचा जर आपण नीट विचार केला तर त्यातला चमत्कारिकपणा नाहीसा होईल आणि मी म्हणतो त्यात निखळ वास्तवाचं प्रतिपादन आहे याची खात्री पटेल. समाजजीवन हे रागलोभाचं जीवन आहे, विकारांचं जीवन आहे, मनाच्या पातळीवरचं जीवन आहे. अनेक व्यक्तींच्या संसाराची बेरीज म्हणजे समाजजीवन आहे आणि संतांनी तर माणसानं संसारपाशातून बाहेर पडावं असं निक्षून सांगितलेलं आहे. काम क्रोध जिंका; विकारावर विजय मिळवा, मनावर मात करून उन्मनीत प्रवेश करा आणि अमर आत्मसुखाचा अनुभव घ्या असा त्यांचा संदेश आहे. जगातल्या सर्व संतांचा हाच संदेश आहे. माणसाचं मन संसारातून काढून त्याच्या ठिकाणी ईश्वरी साक्षात्काराबद्दल तळमळ उत्पन्न करणं, यासाठी संत सदैव धडपडत राहिलेले आहेत. सामाजिक प्रश्नांची चर्चा करण्यात, त्यावर काही उपाय शोधून काढण्यात संतांनी कधी रस घेतलेला नाही. असं का व्हावं? याचं उत्तर उघड आहे. समाज सारखा बदलत असतो. त्यात सतत परिवर्तनं होत असतात. राजवटी बदलतात, राज्यपद्धती बदलतात, आचारविचार बदलतात, पण हे सगळे बदल होत असताना संसार हा संसारच राहतो. हा एका राजवटीत बंधनकारक ठरलेला आहे आणि दुसऱ्या राजवटीत तो मोक्षस्वरूप होणार आहे असं थोडंच आहे? राजवट कोणतीही असो, कोणाचीही असो, हिंदूंची असो की मुसलमानांची, लोकशाहीची असो की हुकूमशाहीची असो, त्या राजवटीतील आर्थिक पद्धती, तेथील आचारप्रणाली कोणतीही असो, संसार हा सर्वत्र आणि सर्वदा संसारच राहणार आहे. बंधनकारकता हा त्याचा नित्यधर्म आहे. संसार हा माणसाचं कायमचं दुखणं आहे. या दुखण्यातून माणसाला पूर्णपणे मुक्त करण्याविषयी संत उत्सुक आहेत. मुक्त होऊन माणूस संसारात राहिला तर त्याला संसाराचं विष बाधत नाही अशी हमी संतांनी दिलेली आहे. माणसाला मायेच्या आवरणातून बाहेर काढून त्याला ईश्वराभिमुख बनविणं, ईश्वर भक्तीविषयी त्याच्या मनात गोडी उत्पन्न करणं, ईश्वरचरणी विलीन होण्यातच मानवी जीवनाचं सार्थक आहे हे त्याला पटविणं – हेच सदैव सर्वश्रेष्ठ संतांचं जीवितकार्य राहिलेलं आहे आणि हेच कार्य करण्यासाठी भक्तसम्राट संतमुकुटमणी नामदेव महाराष्ट्रात तेराव्या शतकात अवतरलेले आहेत.

संत नामदेव हे भारतातले अव्यभिचारी निष्ठेचे भागवत धर्माचे महान प्रचारक. भक्तिमार्गाचे ते थोर उपासक. त्यांची ईश्वरभक्ती अनुपम, अनन्य, अपार आणि अजोड. नामदेवाचे जीवन म्हणजे भक्तितत्त्वाचा जिवंत धगधगीत तेजोमय आविष्कार. नामदेव भक्त बनले ते पारमार्थिक ग्रंथाचा अभ्यास करून बनलेले नाहीत. त्यांच्या स्वतःच्या अनुभवाने ते भक्त बनले. त्यांच्या आयुष्यात असे काही प्रसंग आले की त्यामुळे जीवन जगण्याचे इतर सर्व मार्ग हे भ्रामक आहेत, अहितकारक आहेत हे त्यांच्या लक्षात आलं, आणि विठ्ठलाची वाट हीच एकमेव तारक वाट आहे हे त्यांना मनोमन पटलं. विठ्ठलाच्या वाटेनं जाण्यास आपण पात्र आहोत काय? या विचारानं अस्वस्थ होऊन त्यांनी कठोर आत्मशोधन सुरू केलं. त्यांना दिसून आलं, आपण पापी आहोत, अपराधी आहोत, वासनाच्या

आहारी गेलेलो आहोत. हे वासनांचं जाळं आपण तोडू शकत नाही, त्यातून आपण आपल्या बळावर बाहेर पडू शकत नाही अशी आपल्या दुबळेपणाची प्रामाणिक व निःशंक कबुली त्यांनी ईश्वराजवळ दिली. आपलेच पारमार्थिक सामर्थ्य पणास लावून आपण स्वतः तरू शकतो असा अहंकार त्यांनी कधी बाळगला नाही, कारण त्यांनी हे जाणलं, तीव्रतेनं जाणलं की ईश्वरी कृपेशिवाय माणसाचा उद्धार होऊ शकत नाही. त्यामुळेच ते परमेश्वराला पूर्णपणे आपल्या सर्वस्वासह, आपल्या सर्व दोषासह शरण गेले. परमेश्वराजवळ निस्सीम, निरपवाद शरणागती हीच नामदेवाची मुख्य शक्ती. ईश्वरप्रेमसंपादनाशिवाय त्यांच्या जीवनात दुसरं कोणतही उद्दिष्ट नव्हतं. सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा कोणत्याही हितसंबंधात त्यांचे मन गुंतलेले नव्हते. असल्या कोणत्याही हितसंबंधाचं त्यांना रक्षण करावयाचं नव्हतं. मराठी भाषेच्या संकुचित अभिमानाबद्दल स्फुरण त्यांच्या लेखणीला कधी चढलेलं नव्हतं. विश्वात त्यांना सर्वत्र विठ्ठल दिसत होता. त्यामुळे हा बौद्ध, हा जैन, हा मुसलमान, यांना दूर लोटा, असलं तथाकथित अद्वैतवाद्यांचं दुटप्पी वर्तन त्यांच्या हातून कधी घडलं नव्हतं. परमात्म्याच्या प्रतीतीशी यत्किंचितही विसंगत असं त्यांच्या आयुष्यात काहीही नव्हतं. सगळी क्रियाकर्म गुंडाळून, लोकलज्जा सोडून ईश्वराच्या गुणसंकीर्तनात अहोरात्र रंगून जाणं याखेरीज दुसरा व्यवसायच त्यांना माहित नव्हता. ते कुटुंबवत्सल होते पण कुटुंबाच्या पाशातून, त्याच्या आसक्तीतून ते पूर्णपणे मुक्त होते. त्यांना नातीगोती होती पण त्यांच्या लेखी ती असून नसल्यासारखी होती. त्यांची सगळी नाती परमेश्वराच्या ठिकाणी केंद्रित झालेली होती. त्यांचा बाप ईश्वर होता, त्यांची आई ईश्वर होती, त्यांचा भाऊ ईश्वर होता, त्यांचा सोयरा ईश्वर होता, त्यांचे सगळे काही ईश्वरच होते. ते प्रापंचिक होते पण त्यांची प्रपंचबुद्धी शून्य होती. त्यांच्या प्रपंचात अठरा विश्वे दारिद्र्य होते. पण ईश्वरानंदाच्या धुंदीत त्यांना त्याची खंत नव्हती. आपल्या नातेवाईकांना सांसारिक सुख लाभावं याबद्दल त्यांनी कधीही रतिमात्रसुद्धा आस्था बाळगलेली नव्हती. त्यांचा हात लागला की दगडाचा परीस होऊन जाई इतकं अद्भुत आध्यात्मिक सामर्थ्य त्यांच्या अंगी होतं, पण घरातलं दारिद्र्य दूर करण्याकरिता आणि नातेवाईकांना किंवा स्वतःलाही सुखात ठेवण्याकरिता त्यांनी या सामर्थ्याचा कधी उपयोग केला नाही. परमेश्वरानं कृपावंत होऊन त्यांच्या घरी संसारसुखाची साधनं आणून दिली पण त्यांनी त्यांचा स्वीकार केला नाही. त्यामुळं पत्नी नाराज झाली, हिरमुसली झाली तरी त्यांनी त्याची पर्वा केली नाही. नामदेवांच्या या असाधारण अलौकिक भक्तीचं यथातथ्य वर्णन करावयाला उपमानच सापडावयाचं नाही. समग्र मानवांनी, समग्र देवतांनी जिच्यापुढं परम आदरानं नतमस्तक व्हावं अशी ही नामदेवाची भक्ती, अशा या भक्तीच्या बळावर नामदेव हे नामदेव राहिले नाहीत. ते प्रत्यक्ष केशवरूपच झाले, यात नवल ते कसले ?

नामदेवाचं हे भक्तीचं सुख वर्णधर्माला मात्र पाहवलं नाही. त्यानं नामदेवाला डंख मारलाच. ब्राह्मणाकडून त्यांची शूद्र शूद्र म्हणून अवहेलना झाली. देवळात कीर्तन करताना त्यांना तेथून हाकून देण्यात आलं. ही ब्राह्मणांची वनियांची बसण्याची जागा, तू येथे कसा आलास आलास ? आणि ब्राह्मण नसल्यामुळे तुला ब्रम्हज्ञान तरी कुठल येतं ? देवानं त्यांची बाजू घेतली पण ब्राह्मणधर्मी मानवानं त्यांचा अपमान केला. अनेकदा केला. नामदेवांनी हा अपमान गिळला. त्याला त्यांनी विरोध केला नाही. त्यासाठी त्यांनी सामाजिक क्रांतीचा पुरस्कार केला नाही, कारण त्यांना हे पक्कं कळून चुकलं होत की समाजरचनेला कोणताही आकार दिला आणि तिचा कोणताही प्रकार प्रचारात आणला तरी संसाराचं मोहमयी अविद्याग्रस्त दुःखपूर्ण स्वरूप काही बदलणार नाही. म्हणून ते समाजाच्या चौकटीत कधीच अडकून पडले नाहीत. या चौकटीच्या पलीकडच्या अद्वैतप्रतीतीच्या ईश्वरी साक्षात्काराच्या प्रदेशात त्यांनी आपले निवासस्थान कायमचे मांडले. तुमच्या लौकिक जगात काहीही होवो त्याविषयी ते उदासीन राहिले.

नीतिबोध करून समाजाशी संबंध ठेवता येतो पण नामदेवांनी लोकांना नैतिक शिक्षण देण्याचाही उद्योग केला नाही. त्यांना फक्त एकच मूल्य मान्य होते. ते म्हणजे प्रापंचिकतेशी, लौकिकाशी कोणत्याही प्रकारची तडजोड न करणारी ईश्वरभक्ती. त्यांच्या मनाची अशी पक्की धारणा होती की जो खरा ईश्वरभक्त असतो तो आपोआपच निस्वार्थ होतो. त्याच्या

संत नामदेवांची हिंदी कविता

—डॉ. रामचंद्र मिश्र

संत नामदेव हे महाराष्ट्राचे होते, परंतु आपल्या निष्ठावंत व्यक्तिमत्त्वामुळे आणि व्यापक भाव–भूमीवरून रचलेल्या काव्य–कृतींमुळे ते संपूर्ण भारताचे लोकप्रिय संत ठरले. त्यामुळे त्यांची गणना राष्ट्रीय संतांच्या मालिकेत करावयास प्रत्यवाय नाही. मुंबई प्रांतातील सातारा जिल्ह्यातल्या नरसी बामनी ह्या गावात इ. स. १२७० मध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव दामा शेट आणि मातेचे नाव गवनाबाई असे होते. "शीपेचे घरी जन्मु दैला, गुरु उपदेश मैला" ह्या त्यांच्या उक्तीवरून ते जातीने शीपी (शिंपी) होते हे सिद्ध होते.

संत नामदेव वारकरी संप्रदायाचे, पंढरपुरच्या विठोबाचे भक्त होते. या संप्रदायात त्यांनी आपल्या भक्ति–तत्त्वाचे लोकविलक्षण संमिश्रण केले, त्यामुळे हा वारकरी संप्रदाय एका नवीन मार्गानेच अग्रेसर होऊ लागला. जातीने शिंपी असल्याकारणाने पंडे–पुजाऱ्यांच्या लेखी ते हीन जातीचे, अस्पृश्य गणले जात होते. त्यामुळे त्यांना विठोबाचे दर्शन घडू शकेना, आणि मंदिराच्या मागच्या भागाचा त्यांना आश्रय घेणे भाग पडले. मंदिराच्या मागच्या भागाकडे वळताच मंदिराचे मुख्य प्रवेशद्वारही त्यांच्या बरोबर मागे फिरले असे म्हणतात. अशा प्रकारे त्यांच्या भक्तीची आणि तन्मयतेची पावतीच जणू काय विठ्ठलाने त्यांना दिली, आणि 'विठोबाचा अनन्य भक्त' म्हणून त्यांची ख्याती चोहीकडे पसरली. ह्यातील तथ्य एवढेच की, पुढच्या काळात महाराष्ट्रात जे धर्मसंबंधी प्रचार–कार्य वाढीला लागले त्यात नामदाम हे "संत शिरोमणि" म्हणून गणले गेले. फार काय पण ज्ञानेश्वरांसारखे ज्ञानी पुरुष देखील नामदेवांकडून प्रेरणा घेते झाले. नामदेवाचे भक्ति–तत्त्व हे मराठी धार्मिक भावनेचे एक अभिन्न अंगच बनून गेले, ही वस्तुस्थिती आहे.

काही विद्वानांच्या मते वारकरी संप्रदायाच्या प्रवर्तनाचे श्रेय नामदेवाकडे जाते; पण हे म्हणणे विवादास्पद आहे. ह्याचे कारण असे की, नामदेव

(मागील पानावरून)

समग्र वागणुकीतून नीतिमत्ता सहजच प्रकट होऊ लागते. नीती हे लौकिक पातळीवरचं मूल्य आहे आणि भक्ती हे अ–लौकिक पातळीवरचं मूल्य आहे. जो भक्त आहे त्याच्या ठिकाणी नीतिमयतेचं सौन्दर्य स्वाभाविकपणे सिद्ध आहे. भक्त लोभी नसतो, स्वार्थी नसतो, मत्सरी नसतो. तो सहजपणे दयाळू असतो, परहितदक्ष असता. दुसऱ्याच्या सुखानं सुखी होणारा आणि दुसऱ्याच्या दुःखानं दुःखी होणारा असतो. जगातली सगळी माणसं खऱ्या अर्थानं ईश्वरभक्त बनली तर ?

मानवसमाजापुढं अनेक प्रश्न आहेत, अनेक दुःखं आहेत. पुन्हा नित्य नवी दुःखं, नवे प्रश्न उत्पन्न होत आहेत. या दुःखातून कायमची सुटका करून घेण्याचा, या प्रश्नावर कायमचा तोडगा शोधून काढण्याचा मार्ग कोणता ? उपाय कोणता ? असा जर नामदेवांना प्रश्न विचारला तर ते निस्संकोचपणे निर्विवाद भूमिकेवरून एकदम असे उत्तर देतील–माणसानं ईश्वराला शरण जावं, ईश्वरभक्त बनणं हाच सर्व प्रश्नांवर सर्व दुःखांवर एकच उपाय आहे. आजच्या मानवाला या उपायाचा खरोखरच अवलंब करावयाचा असेल, या उपायावर जर त्याची श्रद्धा असेल तर त्याने आपल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, शास्त्रसंशोधनविषयक अशा सर्व उद्योगांना ईश्वरभक्तीचे अधिष्ठान प्राप्त करून देणे आवश्यक आहे.

(नभोवाणीच्या सौजन्याने)

जन्माला येण्याच्या किती तरी अगोदर पुंडलीक जन्माला आला होता, आणि त्या भक्त-शिरोमणीच्या भाव-धारा ह्या संप्रदायाचा मूळ आधार अगोदरच बनून गेलेल्या होत्या. पुंडलिकाच्या हृदयात आपल्या माता-पित्याबद्दल अत्यंत गाढ निष्ठा वसत होती, त्यामुळे प्रत्यक्ष परब्रह्म समोर येऊन ठाकले तरी त्याला त्याची ओळख पटली नाही. जवळपासच्या लोकांनी पुंडलिकाला त्या गोष्टीची जाणीव करून देताच त्याने त्या परब्रह्माचे स्वागत करण्यासाठी त्याच्याकडे एक वीट सरसावली, आणि त्या विटेवर भगवंत स्थिरावला, विटेवर उभा असलेल्या भगवंताचे हे रूप पंढरपुरात आजही विद्यमान आहे. पुंडलिकाचा हा भाव त्याच्या अनन्यतेचा आणि अद्वैत-तत्त्वाचा निर्देशक आहे, आणि हाच भाव पुढे नामदेवाच्या ठायी स्थिर झालेला आपल्याला आढळतो. ह्याशिवाय दुसरीही एक गोष्ट आहे. ज्ञानेश्वरांनी पंढरपुरात सपरिवार नामदेवाची भेट घेतली त्या प्रसंगी दोघां-वरही एकामेकांचा प्रभाव पडल्यावाचून राहिला नाही. ज्ञानेश्वराने नामदेवाकडून त्याच्या भक्ति-तत्त्वाचे आणि नामदेवाने ज्ञानेश्वराकडून त्याच्या ज्ञान-तत्त्वाचे ग्रहण केले, आणि अशा रीतीने त्या उभयतांनी आपापल्या साधनेला पूर्णत्व प्रदान केले.

ज्ञानेश्वर आणि नामदेव ह्यांच्या सम्मीलनाने वारकरी संप्रदायाला व्यापक आणि सार्वभौम बनविले. ह्यानंतर ह्या दोन्ही संतांनी उत्तर भारतात भ्रमण केले. तेथील जनतेच्या अंत:करणावर त्यांच्या उपदेशाचा चांगलाच प्रभाव पडला. ज्ञानेश्वरांनी अल्पायुष्यातच समाधी घेतली, ह्या कारणामुळेच कदाचित् त्यांच्या साहित्यात आणि कृतीत उत्तर-भारताच्या त्यांच्या यात्रेचा प्रभाव पडलेला प्रतीतीस येत नाही; पण ज्ञानेश्वरांनंतरही नामदेव जवळ जवळ अर्ध शतक जिवंत होते, आणि त्यांनी उत्तर भारताची पुन्हां यात्रा केली. पंजाबातील घुमान ह्या गावी त्यांनी आपला देह ठेवला. नामदेवांच्या काव्य-रचनेवर त्यांच्या ह्या उत्तर-भारतातील भ्रमणाचा पुष्कळच प्रभाव पडलेला दिसतो.

मुसल[illegible]नांची आक्रमणे आणि त्यांचे शासन या गोष्टीचा प[illegible]णाम म्हणून उत्तर भारताची परिस्थिती दक्षिण भारत[illegible]च्या परिस्थितीपेक्षा पुष्कळच वेगळ्या स्वरूपाची [illegible]ती. दक्षिण भारतावरही अलाउद्दीन खिलजी आणि त्याचा सेनापती काफूर यांनी आक्रमण केले होते हे खरे, पण हिंदू समाजात प्रचलित असलेल्या प्रमुख मत-विचारांच्या प्रभावामुळे तेथे इस्लाम मताचा स्थायी स्वरूपाचा असा कोणताही प्रभाव रुजू शकला नाही. दक्षिण भारतात,—विशेषेकरून महाराष्ट्रात मुकुंदराज, चक्रधर, निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई, चांगदेव इत्यादी सर्वच संतपुरुषांच्या साहित्यात परंपरागत भारतीय साधनेचे आणि तत्त्वज्ञानाचे मूळ तथ्य जे विद्यमान आहे, ते याच कारणामुळे. याच्या उलट, उत्तर भारतात मात्र हिंदू आणि मुसलमान या उभयतांच्या मिश्रणाचे स्वरूप म्हणून एक समन्वयात्मक विशिष्ट भूमिका तयार होत होती. या भूमिकेला प्रेरणा देण्याचे श्रेय रामानंदांकडे जाते. या वातावरणाचा प्रभाव नामदेवांवरही पडल्यावाचून राहिला नाही, असे त्यांच्या हिंदी काव्यरचनेवरून स्पष्टपणे दिसून येते.

नामदेवांनी मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषांत रचना केली आहे. परमात्म्याची लीला, त्याचे माहात्म्य, नाम-महिमा, संत-महिमा, भक्ति-तत्त्व, उपदेश, पौराणिक चरित्र, संत-चरित्र, ज्ञानेश्वर-चरित्र, आपले कौटुंबिक वृत्त, भक्ति-गर्व-परिहार, गुरू, खेचर, बोध, इत्यादी रचना मराठी भाषेत आणि पदे हिंदी किंवा हिंदुस्थानी भाषेत रचलेली आहेत. आपल्याला "शतकोटी अभंग" रचायचे आहेत अशी नामदेवांची मनीषा असल्याचा उल्लेख त्यांच्या साहित्यातच आढळतो. पण त्यांची ही मनीषा पूर्ण होऊ शकली नाही. केवळ "चौऱ्यांशी कोटी साठ लक्ष" अभंगच ते पूर्ण करू शकले. पण त्यांचे हे उल्लिखित संपूर्ण साहित्यही आज मराठीत उपलब्ध नाही. केवळ २५०० अभंगच काय ते उपलब्ध आहेत. त्यांची संपूर्ण अभंग-रचना जर हाती येऊ शकली तर त्यांचे कृतित्व दुसऱ्या कोणत्याही महाराष्ट्रीय संता-पेक्षा उणे नाही, किंबहुना ते अधिक मोठे असल्याचेच सिद्ध होऊ शकेल हे स्पष्ट आहे. या गोष्टीचा प्रभाव नामदेवांच्या हिंदी अथवा हिंदुस्थानी पदांवरही स्वाभाविकपणेच पडला आहे.

नामदेवांच्या हिंदी पदावलीत महाराष्ट्रीय आणि पंजाबी अशा दोन परंपरांचा उल्लेख म. म. दत्तो वामन पोतदारांनी केला आहे. पैकी, महाराष्ट्रीय परं-

परेतील श्री. तुकाराम तात्यांच्या 'नामदेव आणि त्याचे कुटुंबाची व समकालीन साधूंचे अभंगांची गाथा' नामक ग्रंथात १०६ पदे, श्री. जोगांच्या 'नामदेवाची गाथा' या ग्रंथात १०२ पदे आणि श्री. आवटे यांच्या 'सकल संत गाथा' या ग्रंथात १०२ पदे आढळतात. सुबंधूच्या 'नामदेवरायांची सार्थ गाथा' आणि श्री. जोशींच्या 'पंजाबातील नामदेव' या दोन संग्रहांत 'श्रीगुरू ग्रंथसाहेबा'तील ६१ पदे आढळतात. पंजाबी परंपरेतील ही गुरू ग्रंथसाहेबात असलेली ६१ पदे उल्लेखनीय आहेत. शीख संप्रदायाच्या परंपरागत सीमा-मर्यादांमुळे ही पदे मुळाबरहुकूम अपरिवर्तित स्वरूपात आजही आढळतात. मी माझ्या 'संत नामदेव और हिंदी पद-साहित्य' या प्रबंधात म. म. पोतदारांच्या मताला अनुसरून गुरू ग्रंथसाहेबातील ६१ आणि 'सकल-संत-गाथे'तील १०२ हिंदुस्थानी पदांचे संकलन केले आहे. ह्याच संदर्भात डॉ. भगीरथ मिश्र आणि डॉ. राजनारायण मौर्य ह्या उभयता विद्वानांनी प्रस्तुत केलेल्या 'संत नामदेव की हिंदी पदावली' या ग्रंथाचाही उल्लेख करणे योग्य ठरेल. ह्या संग्रहात १६५ संशोधित पदांचा आणि ६५ इतर स्रोतांपासून उपलब्ध झालेल्या पदांचा संग्रह करण्यात आला आहे. संपादक-द्वयाने आपला संग्रह परिपूर्ण व्हावा असा प्रयत्न केला आहे हे खरे, पण तरीही हा संग्रह अद्यापि अपूर्णच आहे असे म्हणावे लागेल. कारण, पंजाब विश्वविद्यालयाच्या हस्त-लिखितांच्या विभागात नामदेवांची जी पदे जतन करून ठेवण्यात आलेली आहेत त्यांचा समावेश या संग्रहात झालेला नाही. ह्याशिवाय, 'नामा' अशी उपाधी आपल्या नावाशी चिकटविणाऱ्या संत नामदेवांच्या अनेक अनुयायांजवळ नामदेव-साहित्याचा काही भाग असल्याबद्दलही बोलले जाते. ही सामुग्री जर हाती लागली तर तिचे विश्लेषण आणि विवेचन केल्यानंतर त्यातूनही काही उपयुक्त पदे निवडता येतील असा संभव आहे. ही सामुग्री अमुद्रित आणि अभ्यासकांच्या दृष्टीला अद्यापी न पडलेली अशीच असणार ह्याबद्दल मला शंका नाही.

संत नामदेवांचे संपूर्ण साहित्य उपलब्ध नाही ही गोष्ट जरी सत्य असली तरी आहे त्या सामुग्रीतील त्यांच्या हिंदी पदसाहित्याचा विचार करता त्याचे ईश्वरोन्मुख आणि व्यवहारोन्मुख असे दोन भाग अगदी सहज पाडता येण्यासारखे आहेत.

ईश्वरोन्मुख पद्य :—

त्या काळांत जी परिस्थिती होती ती लक्षात घेता, भारतीय आध्यात्मिक क्षेत्रातील वेदान्ताची एकेश्वरवादी भावनाच कोणत्याही धर्माला आणि समाजाला स्वीकारता येण्याजोगी होती हे ध्यानात घेतले पाहिजे. ह्या परिस्थितीचा परिणाम असा झाला की, केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर उत्तर भारतातही कबीर, नानक, दादू इत्यादी संतांच्या उपदेशांतही हीच भावना प्रस्फुरित झालेली आढळते. ही विचारधारा इस्लाम धर्माच्या सिद्धान्ताला अनुकूल अशीच होती हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाही. मध्ययुगीन काळात दोन्ही संप्रदायांच्या संत-वाणीत मानवाधिष्ठित भावना प्रामुख्याने प्रस्फुटित झालेली आढळते ह्याचेही कारण ही परिस्थितीच आहे.

वेदान्ताची ही भावना वारकरी संप्रदायाला मान्य होतीच. संत नामदेवांनी उत्तर भारतात जे भ्रमण केले, त्यामुळे त्यांची ही भावना अधिक परिपुष्ट झाली, आणि तीच त्यांच्या पदांमधून व्यक्त झाली. ब्रह्म हाच सर्वाधार, सर्वोपरि, पृथ्वीपति आणि सर्व-व्यापक आहे असे त्यांनी म्हटले आहे. जे काही आहे ते सर्व त्यानेच निर्माण केले आहे; तो स्वतः गोपालमय आहे आणि त्याने उत्पन्न केलेले सर्व जीव गोपाल आहेत; जड, जीव, जगत् इत्यादी गोष्टी माया-प्राबल्यामुळे वेगवेगळ्या भासत असल्या तरी त्या सर्व ब्रह्मस्वरूपच आहेत, असे त्यांचे मत होते. म्हणूनच "सर्वं खल्विदं ब्रह्म", "एकोऽहं बहुःस्याम्" अशासारख्या आप्त-वचनांची पुष्टी त्यांच्या पदावलीत आढळते.

एक अनेक बिआपक पूरक जत देखत तत सोई ।
माइआ चित्र बिचित्र बिमोहित बिरला बूझै कोई ।।
सभु गोबिंद है, सभु गोबिंद है, गोबिंद बिनु नहिं कोई ।
सूतु एकु मणि सत सैहस जैसे ओति पोति प्रभु सोई ।।
जल तरंग अरु फेन बुदबुदा जलतें भिन्न न होई ।
इहु परपंच पारब्रह्म की लीला बिचरत आन न कोई ।।
कहे नामदेउ हरि की रचना देखहु रिदै बिचारी ।
घट घट अंतरि सरब निरंतर केवल एक मुरारी ।।

नामदेवांचा ब्रह्मविषयक हा विचार गुरुग्रंथ-साहेबाच्या आणि सकलसंतगाथेच्या कितीतरी पदांत आलेला आहे. 'बीठुलु' परमानंदात लीन

होऊन सर्व प्रकारच्या लीला करतो, चर आणि अचर अशा रूपात तोच दिसतो, तो चिरंतन आहे, त्याचे चेतन स्वरूप सूर्याप्रमाणे प्रकाशमान आहे आणि तरीही त्याचे रहस्य अनवगतच आहे, हे सारे आहे त्याला कारण मायेचा विक्षेप, त्यामुळेच जीव ब्रह्मापासून झालेला असून त्याच्या ठायी पारमार्थिक तत्त्वे शिल्लक उरलेली नाहीत, तेव्हा आपल्या निष्कृतीसाठी जीवाने, आपल्या आराध्याची कृपा व्हावी म्हणून त्याला विनवावे असा नामदेवांचा जीवनमात्राला उपदेश आहे. ह्या संदर्भात त्यांनी राम–नाम–महात्म्य–गानावर आपली अपार श्रद्धा असल्याचे सांगून "राम–नामाने सर्वांचे कलंक धुतले गेले आणि त्यानेच सर्वांना निर्वाणपदाची प्राप्ती करवून दिली" असे म्हटले आहे.

कउन को कलंक रहिओ रामनामु लेत ही ।
पतित पवितु भए रामु कहत ही ।

अथवा,

गुरू मति राम कही को कोनही बैकुंठ गए ॥

पारमार्थिक जीवनात सफलता मिळावी एतदर्थ त्यांनी गुरूपदेशाला आणि सत्संगतीलाही आवश्यक मानले आहे. त्याशिवाय भगवत्पथावरून चालत जाण्याची प्रेरणा जीवाला मिळू शकत नाही, असे ते म्हणतात.

मनुष्याने ईश्वरोन्मुख व्हावे आणि त्याला परमार्थाची प्राप्ती व्हावी ह्यासाठी नामदेवांनी जो संदेश दिला आहे तो कोणत्याही देशात आणि कोणत्याही व्यक्तीला उपयुक्त ठरेल असाच आहे. त्यांनी म्हटले आहे की भक्ताने विरक्त आणि साधना–संपन्न असलेच पाहिजे असे काही नाही. तो कसाही मध्यम असे ना का! त्याच्या हृदयात जर आस्था असेल, निष्ठा असेल तर तो आपले पारमार्थिक ध्येय गाठू शकतो, हे सत्य आहे, असे नामदेवांचे सांगणे आहे.

व्यवहारोन्मुख पद्य—

ईश्वरोन्मुखतेप्रमाणेच नामदेवांचे व्यवहारोन्मुख उपदेशही बहुमोल स्वरूपाचे आहेत. नामदेव स्वत: भक्त संत होते. त्यामुळे, आध्यात्मिक मार्गात जेथे जेथे आडंबर आणि ढोंगी व्यवहार आढळला तेथे तेथे त्यांनी त्याची कडाडून निंदा केली. त्यांची ही निंदा अगदी मार्मिक असली तरी तीत कडवटपणाचा अंश त्यांनी येऊ दिला नाही, उलट आपले म्हणणे त्यांनी अत्यंत संयत शब्दात व्यक्त केले, हे विशेष आहे. पारमार्थिक साफल्यासाठी पूजा–पाठ, तीर्थयात्रा, पिंडदान, काशीवास, षट्कर्मे आदी साऱ्या गोष्टी निरर्थक आहेत असे त्यांनी म्हटले आहे. हरि–स्मरणापुढे या सर्व गोष्टी तुच्छ आहेत असे त्यांचे म्हणणे, या संदर्भात त्यांनी म्हटले आहे—

छोडि छोडि रे पाखंडी मनु कपटु न कीजै ।
हरि का नाम नितहू लीजै ॥

सच्चिदानंद ब्रह्माला सर्वांच्याच अंतर्यामात काय आहे ते ठाऊक आहे. त्यामुळे जीवाचे आडंबरपूर्ण चरित्र त्याच्या जीवनाच्या सद्गतीसाठी आणि त्याच्या निष्कृतीसाठी कोणत्याही प्रकारे उपयुक्त होऊ शकत नाही असे त्यांनी म्हटले आहे. ते म्हणतात,—

साँई मेरो रीझई साची ॥

आणि

पाखंडी भकती राम नहि रीझै ।
बाहरी अंधा लोक पतीजै ॥

पाखंड आणि भोंदूपणा याला नामदेवांचा विरोध होता हे तर झालेच, पण जाति–विद्वेषालाही त्यांचा विरोध होता. विपरीत अथवा विरोधी आचार–विचार अथवा मते असणाऱ्या जातींनी एक–दुसऱ्याचा तिरस्कार करावा, हे मानवोचित नाही, ते अमानवीय आचरण आहे असे त्यांना वाटे. म्हणूनच त्यांनी हिंदू आणि मुसलमान या दोन्ही जातींना जागृत करून सात्विक परमार्थाच्या मार्गाने जाण्याची प्रेरणा त्यांनी दिली. ते म्हणतात,—

हिंदू अन्हा तुरकु काणा ।
दुहांते गिआनी सिआणा ॥
हिंदू पूजै देहुरा मुसलमाणु मसीत ।
नामै सोई सेविआ जहं देउरा ना मसीत ॥

समदृष्टीची ही भावना संत नामदेवांच्या व्यक्तित्वातील उदात्ततत्वाची निदर्शक आहे. मानवाबद्दलचे पारस्परिक प्रेम आणि विश्वासाच्या बंधनात सर्वांना एकत्रित आणण्यासाठी ते ह्याच उदात्त भावनेचा उपयोग करू इच्छित होते. एकाच ब्रह्मापासून

(पुढील मजकूर पान ४०६ वर)

भक्ताचिये काजासाठी—

(वि. सा. संघ सांस्कृतिक समितीतर्फे आयोजित केलेल्या संत सामदेव–जन्मसप्तशताब्दी उत्सवात झालेल्या कीर्तनालंकार **श्री. दादाबुवा देवरस** यांच्या कीर्तनाच्या कथाभागाचा सारांश)

——आमंत्रक, सांस्कृतिक समिती

संतश्रेष्ठ नामदेवासमवेत दक्षिणेतील संतमंडळी यात्रेला निघाली. उत्तर भारतात यात्रा करीत असताना ही सारी संतमंडळी वाराणसीजवळ एका खेडेगावात मुक्कामाला थांबली. गावाबाहेर नदीकिनाऱ्यावर असलेल्या एका मंदिरात संतमंडळींचा मुक्काम होता. दिवसभर तिथे थांबून यात्रेकरू पुढील प्रवासाला प्रारंभ करणार होते.

त्या गावात एक सद्वर्तनी ब्राम्हण कुटुंब होतं. त्या सुखवस्तू ब्राम्हणाला प्रपंचात परमार्थ साधनेसाठी सातत्याने सहकार्य देणारी सहधर्मचारिणी लाभली होती. त्यांचा एकुलता एक आठ दहा वर्षाचा मुलगा होता. त्याचं नाव गोपाळ. नित्याप्रमाणे ती ब्राम्हण–पत्नी सकाळचे वेळी धुणी धुवायला नदी–तीरावर आली. संतमंडळींचा तो जमाव तिच्या दृष्टीला पडला. श्रीनामदेवांचं रसाळ कीर्तन चालू होतं. सारी मंडळी परमेश्वराच्या नामरसाची गोडी चाखत होती. जणू साक्षात् पांडुरंगच ह्या मंदिरात मुक्कामाला आले होते. भगवद्प्रीतीनं ओथंबलेला एक एक शब्द श्री. नामदेवांच्या मुखातून बाहेर पडत होता. सारा आसमंत उदात्ततेनं भारला होता. ब्राह्मणस्त्रियेचा तिथून पाय हलेना. तब्बल चार तास तिथं ती कीर्तनात रंगून गेली होती. ती घरी परतली तेव्हा माध्याह्नाची वेळ झाली होती.

त्या दिवशी तो ब्राह्मणही आपल्या पूजेत इतका मग्न झाला होता की पत्नीला परत यायला उशीर झाला आहे याचं भानही त्याला नव्हतं. गोपाळ मात्र भुकेला झाला होता.

आई परत आल्यावर तो म्हणाला,

"आई खूप भूक लागली आहे. मला चटकन् वाढ." उशीर झालेलाच होता. मुलाच्या हातावर तिनं खाऊ ठेवला आणि स्वयंपाकाच्या तयारीला लागली.

तिला वाटलं, 'ही सारी संत मंडळी आता कुठे जेवतील. त्यांना स्वयंपाक करून कोण खाऊ घालील. सुदैवानं आपल्याला सारं काही अनुकूल आहे. आपल्याकडे जेवायला आली तर संतांची पावलं या घराला लागतील. आपण पावन होऊ. आपल्या गृहस्थाश्रमी जीवनाचं सार्थक होईल.' तिनं पतीला आपला विचार बोलून दाखविला.

जवळ जवळ दोनशे यात्रेकरू नदी–किनाऱ्यावरील मंदिरात उतरले आहेत. आताच कीर्तन आटोपलं. आपण त्यांना भोजनाचं निमंत्रण द्यावं. ते येणार असतील तर शेजारच्या चार बायकांना मदतीला बोलावून आणते आणि स्वयंपाकाची सिद्धता करते.

तो ब्राह्मण निमंत्रण द्यायला गेला. त्यांनी नामदेवाला कधी पाहिलं नव्हतं. एकतारी गळ्यात असलेले एक गृहस्थ समोर भेटले. त्यांनाच नामदेव समजून त्यांनी निमंत्रण दिले. एका गरीब ब्राह्मणाला दोनशे मंडळींच्या भोजनाची व्यवस्था करायला लावणं योग्य होणार नाही म्हणून त्या गृहस्थांनी निमंत्रणाचा स्वीकार केला नाही. तो ब्राह्मण निराश झाला. घरी परतला. पत्नीनं मोठ्या आतुरतेनं विचारले.

"येणार संतमंडळी ?"

"नाही." असं उत्तर मिळालं.

आपल्या भाग्यात थोरांची पावलं ह्या घरात पडावी असं नसेल असं समजून ती दोघे स्वस्थ राहिली.

छोटा गोपाळ मात्र हे सारं न्याहाळत होता. वडिलांच्या आमंत्रणाचा स्वीकार संतमंडळींनी केला नाही म्हणून ती कष्टी झाली आहेत हे त्याच्या लक्षात आले.

'आई, मी त्यांना बोलावून आणतो, माझ्या निमंत्रणाचा ते निश्चित स्वीकार करतील. गोपाळ म्हणाला.

आईला आश्चर्य वाटलं. तो भुकेला होता. आईनं म्हटलं, 'गोपाळ, तुझ्या वडिलांना त्यांनी नाही म्हटलं, ते तुझ्या म्हणण्यावर येणार नाहीत.'

गोपाळ हे ऐकायला थांबलाच नाही. तो तडक निघाला आणि त्या मंदिरात येऊन पोचला.

श्रीनामदेव महाराज पांडुरंगाच्या मूर्तीसमोर बसले होते. ध्यानमग्न. समोर पांडुरंगाची लहानशी मूर्ती होती. गोपाळ नेमका मूर्तीसमोर उभा राहिला. अगदी मूर्तीसारखाच कंबरेवर हात ठेवून; त्यांनी नामदेवाला हाक मारली.

"अहो"

नामदेवांनी डोळे उघडून पाहिले. त्यांना वाटलं साक्षात पांडुरंगच बाळरूप घेऊन आले आहेत.

नामदेव म्हणाले, "देवा बोला"

'मी देव नाही. गोपाळ आहे'

नामदेवाला वाटलं आज देवाचा नूर काही वेगळाच आहे.

नामदेव म्हणाले, "गोपाळ म्हणजेच पांडुरंग!"

"असेल! तुम्ही आमच्याकडे जेवायला का नाही येत!"

"जेवायला" नामदेवाला काहीच समजेना.

तो पुढे म्हणाला "माझ्या वडिलांनी तुम्हाला निमंत्रण दिलं पण आपण ते नाकारलं—त्याचं आईला आणि वडिलांना वाईट वाटलं. ते कष्टी झाले आहेत. आपण सर्वांनी जेवायला आलेच पाहिजे."

नामदेवांनी निमंत्रणाचा स्वीकार केला. गोपाळ तसाच पळत घरी गेला. आईला सांगितलं—

"जेवणाची तयारी करा, सारी मंडळी दोन तासात येत आहेत."

सिद्धता सुरू झाली. स्वयंपाक झाला. पानं मांडली गेली. गोपाळला भूक आवरेना. तो आईला म्हणाला,

"मला खूप भूक लागली आहे."

आई म्हणाली, "गोपाळा, तुझ्या बोलावण्यावर तर नामदेव महाराज येत आहेत.... आणि तूच जर जेवून घेतलं तर त्यांना काय वाटेल. थोडा धीर धर! तोपर्यंत हा खाऊ घे. मला मात्र माळ्यावरची दोन लाकडं काढून दे."

मुलगा लाकडं आणायला माळ्यावर गेला. त्याने लाकडं ओढली. त्या लाकडाच्या ढिगाऱ्यातून महाविषारी नागराज बाहेर आला आणि गोपाळच्या चिमुकल्या हाताला त्यानं दंश केला. एका क्षणात गोपाळ काळा–निळा होऊन माळ्यावर पडला.—

इकडे जेवणाची सिद्धता झालेली. आता बोलावणं पाठवावं म्हणून गोपाळची शोधाशोध सुरू झाली—थोड्यावेळापूर्वी तो माळ्यावर गेल्याचं आठवलं. माळ्यावर जाऊन पाहतात तो काळा–निळा होऊन पडलेला गोपाळ दृष्टीस पडला.

आई वडिलांना शोक आवरेना. संत येणार म्हणून किती आनंदात होती विचारी! आज आपलं आयुष्य धन्य झालं, या आनंदात असलेल्या त्या उभयतांवर दुर्दैवाची कुऱ्हाड कोसळली.–अत्यंत कष्टानं त्यांनी दु:ख आवरलं. साऱ्या संत मंडळींबरोबर नामदेव महाराज यायला आता काही क्षणच राहिले होते.—

संतमंडळींना बोलावणं पाठवलं. विठ्ठल–नामाचा जयघोष करीत भक्तमंडळी ह्या ब्राह्मणाच्या घरी आली—नामदेवानं विचारलं.

"आमचा पांडुरंग कुठे आहे?"

अत्यंत कष्टानं आवरलेल्या दु:खाचे बांध फुटले. झालेली गोष्ट नामदेवाला कळली. सारी मंडळी पाटावरून उठली. नामदेवांनी साऱ्यांना सांगितलं.

"आपण जाऊ नका."

श्री नामदेवानं गोपाळचं प्रेत आपल्या मांडीवर घेतलं. त्यांच्या डोळ्यातून अश्रूंचा पूर ओसंडत होता.

नामदेवांनी, 'पांडुरंगा' अशी मोठ्याने हाक मारली आणि विचारलं, "देवा, सहस्रशीर्षा नागाची

शय्या म्हणून शेषशायी असणाऱ्या तुला विषाची बाधा का व्हावी ? तू शेषशायी आहेस हे खोटं नसेल तर गोपाळ गेला हे खरं का ! कृष्णावतारी गोकुळाला विषबाधा राहू नये म्हणून कालीयाचं कंदन करणाऱ्या 'पांडुरंगा' तुला विषबाधा कशी होईल ? काळ व्यालाच्या आभूषणांनी नटणाऱ्या शिवा ! परमेश्वर स्वरूपी गोपाळाला विषबाधा का व्हावी !! ऐक ! भक्तीला अर्थ असेल तर पांडुरंग या मझ्या हाकेला गोपाळाच्या मुखातून आपण उत्तर द्यावं." असं म्हणून नामदेवांनी पांडुरंगाचा धावा सुरू केला. सारी संत-मंडळी परमेश्वराची करुणा भाकित होती.

नामदेवानं पांडुरंगाला आर्ततेनं हाक मारली— आणि त्यांच्या मांडीवर असलेलं ते पोर 'नामदेवा' म्हणून खडबडून जागं झालं—साऱ्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. तो बिचारा ब्राह्मण आणि त्याची पत्नी हा सगळा प्रकार पाहून स्तंभितच झाली.

नामदेवानं गोपाळला विचारलं,

"गोपाळ तू कुठं गेला होतास."

"पंढरीला" गोपाळ उद्गारला !

"काय म्हणाले पांडुरंग"

"ते म्हणाले, नामदेव एकटाच भोजनाची आमंत्रणं घेतो. आम्हाला बोलवलं सुद्धा नाही."

श्री नामदेवांच्या डोळ्यातून अश्रू–सिंचन चालू होतं. ते उद्गारले, "आज पांडुरंगही आपल्याबरोबर येणार ना !"

देव–भक्तांची उच्छिष्टे काढण्याचं भाग्य लाभलेलं धन्य ते कुटुंब !

(पान ४०३ वरून)

सर्वांची उत्पत्ती आहे, सर्वच त्याचे अंश आहेत, तेव्हा आपापसात भेदभाव असणे किंवा मानणे म्हणजे अ-मानवीय गोष्ट आहे असे ते म्हणत. अशा प्रकारे नामदेवांनी भावनात्मक एकतेचा आणि विश्व–बंधुत्वाचा अमर उपदेश लोकांना दिला. अपभ्रंश साहित्यात सिद्धांच्या पदांत हा विचार आढळतो, तोच नामदेवांच्या पदांत अधिक स्पष्ट रूप धारण करून व्यक्त झालेला आढळतो. हाच विचार पुढे कबीर, नानक, दादू आदींच्या उपदेशातही प्रगट झाला.

नामदेवांच्या पद–साहित्यात आढळणाऱ्या काही विचारांना आणि मतांना स्पष्ट स्वरूपात मांडण्याचा येथे मी प्रयत्न केला आहे. हे विचार शुष्क, परुष अथवा केवळ बुद्धिगम्य स्वरूपाचे नाहीत. सर्व प्रकारे ते सरस आणि सुग्राह्य असेच आहेत. साध्या सरळ भाषेत आपले विचार आणि उपदेश लोकांपुढे मांडण्याचा नामदेवांनी प्रयत्न केला. नामदेवांची पदावली हिंदीच्या संत–साहित्याच्या पार्श्वभूमीत अंतर्भूत झालेली आहे. आणि ह्या कारणामुळेच ह्या मराठी संताचा उपदेश आणि त्याच्या भावना विशेष महत्वाच्या आहेत.

संत नामदेव : एक प्रश्नांकित व्यक्तिमत्व

—म. ना. लोही

संत नामदेवांचे जीवन, व्यक्तित्व आणि कार्य या सर्वच गोष्टी प्रश्नचिन्हांकित आहेत. माझे हे विधान ऐकून आपणास आश्चर्य वाटेल. पण ती वस्तुस्थिती आहे. नामदेवांच्या जन्मापासून समाधीपर्यंत ही प्रश्नमालिका अखंड असून तिच्यात किती प्रश्न आहेत हे मोजणे कठीणच आहे. नामदेवांचा जन्म नरसी–ब्राह्मणीचा की पंढरपूरचा ? ते 'अयोनिसंभव' होते का ? नामदेवांच्या वाटीतले दूध विठ्ठल प्याला का ? नामदेवांची आई बालपणी वारली का ? नामदेव दरवडेखोर होते का ? ज्ञानदेव–नामदेवाची पहिली भेट केव्हा व कुठे झाली ? नामदेव 'कच्चे मडके' होते का ? तीर्थावळीचे अभंग नामदेवांनीच लिहिले का ? नामदेव पंजाबात का गेले ? त्यांनी तेथेच समाधी घेतली का ? वारकरी पंथाचे ते प्रवर्तक मानता येतील का ? त्यांनी सामाजिक क्रांती घडवून आणली का ? वारकरी पंथ वैदिक की अवैदिक ? असे कितीतरी प्रश्न त्यांच्या संदर्भात उपस्थित करण्यात आले आहेत. त्यांवर विद्वानांत मतभेद झाले आहेत. त्यातील काही प्रश्नांचा जरी मी विचार करणार असलो तरी मी एकाच प्रश्नाची भर घालू इच्छितो. नामदेवांना सातशे वर्षे झाल्यावरही आपण त्यांचे स्मरण करतो आहोत हे नामदेवांच्या महाराष्ट्रीय मनावरील प्रभावाचे द्योतक नाही का ?

कोणत्या गोष्टीमुळे नामदेवांचा जनसाधारणावर प्रभाव पडला ? हा एक प्रश्न आणि उच्चवर्णियांवर म्हणजेच ब्राह्मण समाजावर नामदेवांच्या भक्तिमार्गाचा कितपत प्रभाव पडला हा दुसरा प्रश्न आधी विचारात घेऊ. नामदेव जातीने शिंपी. (शिंपी या शब्दामुळेच तर त्यांचा जन्म शिंपेतून झाल्याची कथा प्रसृत झाली असेल का ?) शिंप्याचा व्यवसाय तत्काली हीन लेखला जात असला पाहिजे. कारण नामदेव स्वतः म्हणतात, 'नामा म्हणे तैसा जातीचा मी शिंपी । उपमा जातीची देऊ नये ।।' किंवा 'यातिहीन शिंपी अधिकार कैचा ।' किंवा 'हीन दीन जाती मोरी पंढरिके राया । ऐसा तुमने नामा दरजी काहेकू बनाया ।।' यावरून त्यांची झालेली अवहेलना (अर्थात् उच्चवर्णियांकडून) स्पष्ट होते. ही मनची व्यथा ते बोलून दाखवतात. प्रत्यक्ष ज्ञानदेवांनी त्यांना वंदन करावे एवढा आध्यात्मिक अधिकार प्राप्त करून घेतल्यावरही ब्राह्मण काय बोलले ? 'हम तो पढिया वेदपुराणा । तू कहां पायो ब्रह्मगियाना ?' यावर बिचाऱ्या नामदेवांनी काय उत्तर द्यावे ? हे दुःख काही एकट्या नामदेवांचे होते का ? गोरा कुंभार, सावता माळी, सेना न्हावी, चोखामेळा या सर्वांनी आपले हे दुःख प्रगट केले आहे.* किंबहुना, हे हीन यातीचे दुःख दूर व्हावे म्हणूनच तर हे संत भक्तिमार्गाकडे वळले नसतील ना ? ही सामाजिक विषमता नामदेवांच्या काळी जशी पोखरून काढीत होती तशीच आजही पोखरीत नाही का ? एकीकडे तत्त्वज्ञानात 'सर्वं खल्विदं ब्रह्म' असे प्रतिपादन करीत असताना मानवा–मानवात भेद करण्याचे आम्ही सोडले का ? हे जर आम्ही केले नाही तर वेदोपनिषदांचा आमच्यावर काहीच परिणाम झाला नाही ! नामदेव सांगतात, 'तत्त्व पुसावया गेलो वेदशास्त्री । तव भरले त्यापासी विधिनिषेध ।।' यात त्यांनी काय खोटे सांगितले आहे ? वास्तविक भूतदयेचा दृष्टिकोण घेतला तरी सामाजिक समतेचे तत्त्व हे एक शाश्वत मूल्य आहे. त्याला पायदळी तुडवून समाजाची प्रगती कशी होईल ? या संबंधात डॉ. शं. दा. पेंडसे म्हणतात, 'मानवी

सावता म्हणे हीन याती । कृपा करावी श्रीपती ।।
—सावता माळी

मी तो आहे यातिहीन । माझा राखा अभिमान ।।
—सेना न्हावी

अवघ्या वर्णामाजी हीन केली याती ।
विटाळ विटाळ म्हणती क्षणोक्षणी ।। —चोखामेळा

मूल्य स्वार्थाकरिता पायदळी तुडवणारे लोक स्वकीय असोत की परकीय असोत, त्यांचा प्रतिकारच केला पाहिजे.' दुर्दैवाने त्या काळात हे घडले नाही. आजही त्या मूल्यांना पायदळी तुडविले जात आहे.

नामदेवांचा बहुजनसमाजावर प्रभाव पडण्याचे कारण त्यांनी सांगितलेला भक्तिमार्ग सुलभ होता. भक्तीचा हा मार्ग सामान्य लोकांना संसारभय नाहीसे करून संसारसागर तरून जाण्यास मदत करणारा होता. ज्ञानदेवांनीही कर्मकांडाच्या, व्रतवैकल्याच्या, तीर्थादिकांच्या चौकटीतून सुटका करणाऱ्या भक्तिमार्गाचा पुरस्कार केला. सहाजिकच, संसार करून नामसंकीर्तनाने मनःशांती देणारा हा भक्तिमार्ग सर्वसामान्यांना आचरणसुलभ आणि आकर्षक वाटला. आर्तभक्त नामदेवांना देव सहज पावला, पुंडलिकासाठी अठ्ठावीस युगे विटेवर उभा राहिला, ह्या गोष्टी सर्वसामान्य लोकांना दिलासा देणाऱ्या होत्या. त्यामुळे नामदेव जनमानसात कायम स्थान करून राहिले. तरीही उच्चवर्णियांनी त्यांना कितपत आपले मानले हे सांगणे कठीण आहे.

आणखी एकच मुद्दा मी सांगणार आहे. तो असा की, वारकरी पंथाचे संस्थापक अगर प्रवर्तक कोण ? ज्ञानेश्वर की नामदेव ? भक्त पुंडलिकांना हे श्रेय देण्याकडेही काही पंडितांचा कल आहे. तसा भक्तिमार्ग आणखी आधीपासून अस्तित्वात असल्याचे आढळून येते. तरीही नामदेवांच्या आधीच्या संतांची माहिती मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. जे काही संत आढळतात ते सर्व नामदेवांचे समकालीन आहेत. नामदेव हे विठ्ठलाचे अनन्य भक्त. 'तूचि माझे व्रत तूचि माझे तीर्थ । तूचि धर्म अर्थ काम देवा ।।' या शब्दांत त्यांनी आपली भक्तिभावना व्यक्त केली आहे. तरीही भक्तिसंप्रदायात म्हणजेच वारकरी पंथात ज्ञानदेवांना अग्रपूजेचा मान आहे. वहिणाबाईने 'ज्ञानदेवे रचिला पाया' असे सांगून 'नामा तयाचा किंकर । तेणे केलाऽहा विस्तार' अशी पुस्ती जोडली आहे. नामदेवांनी वारकरी संप्रदायाची पताका साऱ्या उत्तर भारतात आणि विशेषकरून पंजाबात फडकवली यात शंकाच नाही. मात्र त्या आधी ज्ञानदेवांनी नामदेवांकडून भक्तीचे रहस्य समजावून घेतले (तीर्थावळीचे अभंग पहा). ज्ञानदेव योगी होते. ते ज्ञानी होते. तरीही त्यांना भगवंताचे सान्निध्य लाभले नाही. उलट नामदेवांना ते लाभले हे कसे शक्य झाले ? नामदेवांचा त्याबाबत अनुभव काय ? हे जाणून घेण्याच्या जिज्ञासेनेच ज्ञानदेवांनी नामदेवांना तीर्थाटनास चलण्याचा आग्रह केला. ते दोघे तीर्थयात्रेला गेले हे खरे मानले तर त्यांचा संवादही खरा मानला पाहिजे. शिवाय त्यात काही अशक्य नाही. ज्ञानदेवांच्या सान्निध्यात नामदेवांची आध्यात्मिक प्रगती झाली असावी आणि नामदेवांपासून त्यांनी भक्तीचे स्वरूप समजून घेतले असावे. दोघेही आपापल्यापरीने श्रेष्ठच. त्यांच्या या हृदयसंवादातून परस्परांचा काहीच लाभ झाला नसेल का ? डॉ. वि. भि. कोलते म्हणतात, "अंतःकरणातील उत्कट भावाने जर ईश्वर मिळू शकतो तर त्यासाठी, मनुष्याच्या ठिकाणी आपल्या अस्तित्वानेही अहंकार निर्माण करणाऱ्या ज्ञानाची आवश्यकता काय आहे . . ? त्यासाठी अंतःकरणपूर्वक भक्तीची, आर्त भक्तीचीच आवश्यकता आहे. हे रहस्य ज्ञानदेवांना तीर्थाटनात नामदेवाच्या संगतीने कळले आणि ते त्यांनी मान्य केले." त्याचबरोबर ज्ञानदेवांच्या संगतीत नामदेवांच्याही विचारांचा विकास झाला. ते आर्तभक्ताचे ज्ञानी भक्त बनले. सगुणाकडून निर्गुणाकडे वळले. 'सर्वाभूती समदृष्टी । हेचि भक्ती गोड मोठी' हे त्यांना जाणवले. ते भूतदयावादी नव्हते असा याचा अर्थ नव्हे. तरीही त्यांच्या ठिकाणी असणारी द्वैतभावना आणि अहंभावना लोप पावली ही मानसिक प्रगती त्यांनी केली. उलटपक्षी ज्ञानदेव निर्गुणाकडून सगुणाकडे वळले. ही परस्पर देवाण–घेवाण लक्षात घेता एकाला मोठेपण आणि दुसऱ्याला कनिष्टपण देणे योग्य ठरणार नाही. म्हणून डॉ. कोलते यांचे म्हणणे (वारकरी पंथाचे नेतृत्व ज्ञानदेवांपेक्षाही नामदेवांकडे अधिक होते) मान्य करणे जड जाते. परंतु वारकरी संप्रदायाच्या कार्यात नामदेवांचा वाटा मोठा होता असे जेव्हा दुसरेही संशोधक (डॉ. इनामदार) सांगतात तेव्हा पुन्हा मनुष्य घोटाळतो. मग वहिणाबाईने नामदेवांवर अन्याय केला असे म्हणावे का ? असाही एक प्रश्न मनाला चाटून जातो. तेव्हा या वादात अधिक न शिरता दोघांचेही कर्तृत्व (वारकरी संप्रदायापुरते) समसमान आहे, असा निष्कर्ष काढणेच श्रेयस्कर नव्हे काय ?

[दि. २७ ऑक्टोबर रोजी झालेल्या परिसंवादातील भाषणाचे टाचण]

नामदेवांच्या कवितेच्या निमित्ताने

—प्रा. यशवंत मनोहर

संतांच्या तत्त्वज्ञानाच्या संदर्भात थोडे

१९७०. दोन महायुद्धांची क्रूर वादळे जगाचे लचके निर्दयपणे तोडून गेल्यानंतरचा हा काळ ! रक्ताचे डाग अजूनही ओले आहेत. मृण्मय होता होता हिरोशिमा आकांतून गेले, 'हे जगा, कुठल्याही क्षणी तू मरणाचा घास होऊ शकतोस.' तेराव्या शतकातील माणूस ज्या पार्श्वभूमीवर उभा होता ती आज बदललेली आहे. आजच्या जगापुढे एक वेगळेच भयावह क्षितिज आ वासून उभे आहे. कधी नव्हे इतकी आजची पिढी एका अनिश्चिततेच्या टप्प्यावर उभी आहे. काळ वेगाने धावतो आहे आणि क्षणाक्षणाला बदलणारे रंग पाहून जीव भांवावून जातो आहे. या जगाचे भविष्य नोंदविणे सर्वथा कठिण झाले आहे. आणि म्हणून बिनचेहऱ्याचे जगणे सुरू आहे. आज आमची इच्छा देव आणून घेणे ही नाही. मोक्ष मिळविणे ही नाही. आपले सामान्यत्व टिकवीत जगावे कसे ही आमची धडपड आहे. आम्हाला पारलौकिकाची हमी नको आहे तर मूलभूत गरजांच्या पूर्ततेची, साधे माणूस म्हणून जगण्याची हमी आम्हाला हवी आहे. कामसमस्या व्यक्तीमध्ये विकृती निर्माण करते तर क्षुधासमस्या सामाजिक विकृतीला साकार करते. माणसाचे हे मूलभूत पशुत्व मान्य करून संस्कृतीची दिशा जाणीवपूर्वक ठरवावी. ही आमच्या काळाची गरज आहे. कारण काळाबरोबर बदलणे नाकारले तर मरण अटळ आहे हे आम्हाला जाणवलेले आहे. शिवाय 'पंगू लंघे हिमगिरी । न[illegible] चाले जलोदरी; जीव पैशाला पासरी । अणु–युगी ।। ही कटू जाणीव आम्हाला आलेली आहे. म्हणून जगावे कसे हाच प्रश्न आज आमच्यापुढे आहे. तेव्हा [illegible]शास्त्राचे नियम कवटाळून मरणाच्या शक्यता उ[illegible]णे शहाणपणाचे की काळाची पावले ओळखून आ[illegible]चा क्षणांचे स्वागत करणे शहाणपणाचे ?

हा प्रश्न आहे. म्हणजेही वस्तुस्थितीकडे पाठ फिरवून "मार्गाधारे वर्तावे, विश्व हे मोहरे लावावे । अलौकिका नोहावे, लोकांप्रति ।।" असे म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांकडे पर्यायाने संतांकडे आम्ही गेलो तर आजच्या आमच्या जीवनाच्या संदर्भात आम्हाला कुठलेही आश्वासन मिळणे अशक्य आहे. उक्त संतमार्ग हा आमच्या आजच्या प्रश्नांवरती उपाय ठरू शकत नाही हे सत्य आहे. निर्गुणनिराकाराची रोमँटिक थाप आम्हाला आज बनवू शकत नाही. माणसांना सामाजिक समता नाकारणारे वर्णाश्रमधर्माचे गणित आज आम्ही का मानावे ? संतांनी माणसांमधली न्याय्य अशी मूलभूत स्वतंत्रता नाकारली. आणि अध्यात्मक्षेत्रात भक्तिजन्य विनंतीवाद किंवा भूतदयावाद सांगितला. पण ह्यामुळेच ज्यांच्या श्रद्धा दुखविल्या गेल्या नाहीत त्यांचे समाधानच झाले. आणि संतांचेही एका सुरक्षित स्थळी भले झाले. पण यातून ज्यांना सामाजिक पातळीवर न्याय्य माणूसपणच नाकारले गेले त्यांचे काय ? शिवाय वरील तत्त्वज्ञानाच्या जिव्वट प्रभावामुळे ज्ञानेश्वरादी संतांच्या गौरवधुंदीत पुढे न्याय्य अशा मूलभूत माणुसकीचे रणशिंग फुंकणारा गोपाळ गणेश आगरकर 'मारला गेला' आणि कित्येक समाजसुधारकांना पराभूत व्हावे लागले. हे विसरता येत नाही. निष्काम कर्मयोग ही सुद्धा धूर्त डोक्यातून जन्मलेली थाप आहे. निष्काम कर्मयोग आम्हाला विसंगत वाटतो. ती आम्हा जीवनेच्छु माणसांना फसवेगिरी वाटते. सकाम कर्म करूनही सुखाने जगता येते असा दिलासा आम्हाला हवा आहे. संतांचे तत्त्वज्ञान हा दिलासा आम्हाला देऊ शकत नाही. म्हणजेही आज आमच्या जीवनाच्या संदर्भात संतांचा भूतदयावाद पराभूत झालेला आहे. म्हणून आज आम्ही उक्त भूतदयावाद आम्हाला निरुपयोगी म्हणून नाकारीत आहोत.

काही प्राचीन अंध अवशेष अजूनही दैवत्व आणि संबंधित इतरही बाबी उराशी कवटाळून मनोरंजनाचा उच्चांक गाठीत असतील. पण डार्विन नावाच्या गृहस्थाने देवत्वाचे लाडके खेळणे हिसकावून घेतले आणि आम्ही जमिनीवरून चालू लागलो. आणि अशी खूप निरर्थक खेळणी आम्ही नाकारली आणि बऱ्याच दिवसांनंतर एका अपरिहार्य अशा कठिण प्रस्तुताशी गाठ पडलेली आहे. म्हणून आजची जिवंत पिढी अप्रस्तुत बाबी प्रतिज्ञापूर्वक नाकारीत आहे. संतांचा भूतदयावादही त्यात आलाच.

संतकाव्य

संताचे तत्त्वज्ञान माझ्या बुद्धीला पटत नसले तरी संताची काही कविता मला विलक्षण आवडते. तिची थोरवी मी एकदम मान्य करतो. कारण पटणे न पटणे ही घटना विचाराच्या बाबतीत घडते. कवितेच्या, तिच्यातील भावसत्याचा संबंध भोगण्याशी, आस्वादाशी असतो. अंतःकरणाशी असतो. शिवाय ना. ग. जोशी म्हणतात त्याप्रमाणे भावनात्म प्रतिक्रियांची तात्कालिक निमित्ते बदलतात. भावना शाश्वत असतात. प्राचीन मराठी कवितेतही हे मूलात्म अमूर्त (abstract) 'जाणिवेचे नृत्य' आहेच. म्हणूनच ज्ञानोबा-तुकोबांची कविता मला मर्ढेकर सोडले तर समग्र मराठीत अजोड उंचीची वाटते.

कवी नामदेव

नामदेवांची गीते आणि कविता मला आवडतात. इतर सर्व सोडून नामदेवांचं लेखनच आज माझ्यापुढे आहे. नामदेव हेही ज्ञानोबा-तुकोबांप्रमाणे साक्षात्कारी संतच होते. पण नामदेवांच्या कविमनाचे धर्म ज्ञानोबा-तुकोबापेक्षा निश्चितच भिन्न होते. सौंदर्यविचाराचे अथवा औचित्यविचाराचे बाळकडू ज्ञानोबांना जन्मतःच जणू मिळालेले आहे. ज्ञानदेवांची अलौकिक कल्पनाशक्ती नामदेवांजवळ नाही. समग्र ज्ञानेश्वरांचे वाङ्मय हे एका सौंदर्यासक्त मनाचे चिंतन. प्रखर वैचारिकता म्हणूनच इथे भावरूप होते, अनुभवरूप होते. लक्षणीय असे विचारमूल्य श्रेष्ठ अनुभवबोलातून ज्ञानेश्वर साकार करतात. तसेच बेदरकार तुकोबांचेही आहे. म्हणजे ज्ञानोबा–तुकोबांच्या कवितेत उत्तुंग विचारानुभवांची सृष्टी उमलते. त्यामुळे एक अनन्य घनता व व्यामिश्र वजनदारपणा त्यांच्या कवितेला येतो. नामदेवांची कविता ही भावकविता आहे. श्रेष्ठ विचारमूल्य हा या कवितेचा धर्म नव्हे. म्हणजेही ईश्वरसंलग्न विविध भावांची उत्कट चित्रे ही कविता रेखाटते. हे भाव कधी एकपदरी, स्थूल, सरळ तर कधी व्यामिश्र अनेकपिंडी असतात. ह्यावरून नामदेवांच्या लेखनातील गीते आणि विशुद्ध भावकविताही लक्षात घेता यावीत. भावकवितेच्या सर्व शक्यता समृद्धपणे पुरवून शिवाय विचारमूल्यांची उत्तुंग संपन्नता पुरविणारी ज्ञानोबा-तुकोबांची कविता वेगळी. नामदेवांची नितळ भावांची चित्रे काढणारी विशुद्ध भावकविता वेगळी. म्हणजेही भावकवितेच्या प्रांतात ज्ञानोबांच्या-तुकोबांच्या कवितेची थोरवी नामदेवांच्या कवितेला लाभत नसली तरी तिला निश्चित मानाचे व मोलाचे स्थान आहे हे मी स्पष्टपणे मान्य करतो.

नामदेवांच्या कविमनाचे धर्म

हे मन एका साधकाचे विलक्षण भावव्याकुल मन आहे, एका आर्त भक्ताचे मन आहे. भक्तीच्या अनावर भरात न राहवून चिदाकाशाशी नाते जोडणारे हे मन शब्दरूपांनी फुटून निघते. प्रेमात उभे राहूनच रागावणारेही एक अत्यंत सौम्य, कोमल व नितळ निरागस असे हे मन आहे. दुर्जनांचा निषेध करतानाही जशी आर्तताच म्हणूनच निथळते तसे विठोबाशी भांडतानाही या मनाचे आर्तच ओथंबत असते. स्वतःचे भक्तिभावविश्व ही या मनाची केवळ दौलत आहे. स्वतःच्या अंतःकरणाची भावजन्य उंची व खोली नामदेव सतत एका कल्पनेच्या पातळीवरून न्याहाळण्याचा प्रयत्न करीत आहेत. नामदेवांच्या कल्पनेतील सर्व अमूर्त श्रद्धारूपे म्हणूनच त्यांच्या कवितेन सास्तित्व वावरत आहेत. खेळ मांडून गात आहेत. देहभान विसरून नामदेव श्रद्धेच्या बळावर कल्पसृष्टीत जिवंत झालेल्या सोयरियांशी बोलत आहेत. नाचत आहेत. हे नामदेवांचे स्वप्नविश्व आहे. पण आपल्यासाठी हे विश्व स्वप्नविश्व असले तरी नामदेवांसाठी ते प्रत्यक्षाचे निःशंक विश्व आहे. नामदेवांच्या भावासक्त मनाने शोधून घेतलेले विसाव्याचे एकमेव गंधर्वनगर आहे. म्हणूनच तुकोबांचे क्रूर आत्मपर्यालोचन किंवा अनेक परिमाणांना जन्म देणारी संसृतिटीका किंवा ज्ञानदेवांची विचारानुभवांचे चिंतन करताकरताच मूर्त जीवन-

व्यवहाराचे गूढ अर्थ प्रकाशात मांडणारी विश्वकवळती कल्पनाशक्ती यांचा प्रत्यय नामदेवांच्या कवितेत येत नाही. नामदेवांची समग्र कविता म्हणजे नामदेवांच्या भावजीवी कल्पनेने निर्माण केलेला भक्तीचा वासंतिक मळा आहे. उत्कटतेचा सदावहार, सप्रेम गाव आहे. एका अथांग श्रद्धेने भक्तीच्या डोळ्यांनी पाहिलेले, जोपासलेले विलोभनीय स्वप्नाकाश आहे. नामदेव स्वतःच प्रेम-भक्तिरूप आहेत. आणि 'मीच माझा देव मीच माझा भक्त' या एका 'एकान्त' पातळीवरून ते स्वतःच स्वताशी बोलत आहेत. नामदेवांच्या मनाच्या ह्या धर्मांनी त्यांच्या कवितेचे रूप निश्चित केले आहे.

नामदेवांची कविता

नामदेवांच्या या अशा विशिष्टधर्मी मनाने काढलेला आध्यात्म जीवनाचा आलेख त्यांच्या कवितेत दिसतो. पौराणिक कथानके, विठ्ठलमाहात्म्य, पंढरीमाहात्म्य, संतमहिमा, नाममाहात्म्य, श्रीकृष्णलीला, बालक्रीडा, उपदेश, चरित्रपर वगैरे अभंग उत्कट आहेत. त्यात नामदेवाच्या मनाचा जिव्हाळा आहेच. ही सर्वच निर्मिती एका प्रेमळ मनाची असल्याने त्यात एक भावमयता दिसून येतेच. पण कीर्तन हाही नामदेवांचा धर्मच आहे. त्यामुळे उक्त अभंगांत कमी अधिक कथात्मकता, विस्तार, वर्णन–निवेदनात्मकता दिसते. शिवाय उपदेशपर अभंगांमध्ये एक प्रकारची सांकेतिकता येते. तो उपदेश बाळबोध ठरतो. तुकोबांच्या उपदेशालाही अनुभवता येते ती किमया नामदेवांच्या बाबतीत घडत नाही. 'वाकडे तिकडे जैसे आले तैसे' गायचे–आत्मभान विसरून गायचे. त्यामुळे व्यक्तिकरणात पुनरुक्ती, एकसुरीपणा येतो आहे याचा विचार करायला नामदेवांना फुरसत नाही, याचा प्रयत्य जागोजागी येतो. पण कुठे कुठे मात्र त्यामुळेच सहजसौंदर्याचा प्रत्यय येतो. या अशा काही अभंगांमधून काही निर्लेप विचार येतात. हे विचारही स्वतः नामदेवांचे नव्हेत. नामदेवांनी त्या विचारांना जिवेभावे आत्मसात केले आहे. नामदेव हे ज्ञानदेवांचे सरळ, एकमार्गी, एकनिष्ठ पाइक आहेत. हा त्याच मार्गाने सुगंध उधळीत जाणारा एक अत्यंत डोळस व निष्ठावान भक्त आहे. त्यामुळे उपरोक्त विषयावरील अभंगांत मोठी मौलिकता शोधता येणे फायद्याचे ठरणार नाही. वरील अभंगप्रकारांमधून नामदेव सतत एक समंजस भूमिका जोपासत आहेत. त्यांच्या दिवास्वप्नातही वर्णधर्माची चौकट आहेच. ज्ञानदेवांनी आखून दिलेल्या चौकटीबाहेर जणू ते जातच नाहीत. म्हणून समान मन आणि स्वतःचा आविष्कार यात सतत एक विवेकपूर्ण समतोल नामदेव निर्माण करीत असतात. तो नामदेवांचा आत्मस्वभावच आहे. याच्या खुणा जागोजागी दिसतात.

नामदेवांची मौलिक कविता मात्र वेगळीच आहे. ईश्वरासंबंधीचा प्रेमभाव, शरणागती–प्रेमकलह–करुणापरता, नामदेवांचे आत्मनिवेदन आणि साक्षात्कारस्थिती या स्वरूपाच्या अभंगांमध्ये नामदेवांची पृथगात्म व श्रेष्ठ भावकविता वाचायला मिळते. 'डोळे शिणले पाहता वाटुली', 'तू माझी माउली मी वो तुझा तान्हा', 'तू आवकाश मी भूमिका', 'मोतियाचा चुरा फेकिला अंबरी', 'नलगे तुझी मुक्ती नलगे तुझी भक्ती', 'देव दगडाचा भक्त हा मायेचा', 'सोळा त्या समाधि औट पीठामाझारी', असे काही अभंग आणि ज्ञानदेवसमाधी ह्या प्रकरणातील 'निवृत्तिदेव म्हणे करिता समाधान' यासारखे अनेक अभंग कारुण्याने ओतप्रोत फुटू पाहाताहेत असे वाटते. अशा काही अभंगांमधून ज्ञानोबा, तुकोबाची वऱ्याचदा आठवण होते. जेव्हा नामदेवांच्या उराला कारुण्याच्या धारा लागतात तेव्हा नामदेवाची कविता आपणालाही आसवात न्हाऊ घालते. तिथे खरे नामदेव पिळवटून, उरी फुटून गायलेले असतात.—

'निवृत्तिदेव म्हणे करिता समाधान
काही केल्या मन राहात नाही ॥१॥
बांधल्या तळ्याचा फुटलासे बांध
ओघ बारा वाट मुरडताती ॥२॥
बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा
तृण रानोमाळा पांगलेसे ॥३॥
हरिणीविण खोपी पडियेली ओस
दशदिशा पाडस भ्रमताती ॥४॥
मायबापे आम्हा त्यागियले जेव्हा
ऐसे संकट तेव्हा आले नाही ॥५॥

ही खरी नामदेवाची वृत्ती. अशा कारुण्याने ओथंबणारे अभंग ही नामदेवांची कवी म्हणून कमाई आहे. नामदेवांच्या वरील वृत्तीने संतवाङ्मयात जशी नामदेवाची कविता वेगळी उठून दिसते तशा ह्याच वृत्ति-

(पुढील मजकूर पान ४१७)

केशीराजाचा नामदेव

—डॉ. सरोजिनी बाबर

आजपर्यंत माझ्या आवाक्याप्रमाणे मी अनेक कादंबऱ्या वाचल्या, कितीतरी प्रेमकाव्यं वाचली, शेकडो प्रीतिकथा ऐकल्या आणि इतिहासात चिंब भिजून गेलेले कित्येक प्रेमभाव अनुभवलेही. परंतु केशीराजाच्या नामदेवाची प्रीतिकथा याहून कितीतरी सरस ठरली. माणसानं आपल्या आवडत्या माणसावर आपली काया ओवाळून टाकीत अपार प्रेम करावयाचं असतं, हे ठाऊक असलेल्या मला एखाद्या माणसानं पाषाणमूर्तीवर नितांत प्रेम करून वेडं व्हावं हा प्रकार मोठा विलक्षण रोमांचकारी वाटला. गगनमंडळात आपली शेज घालणाऱ्या मीराबाईनं श्रीकृष्णावर आपल्या प्रेमाचा वर्षाव केला हेही माहीत असलेल्या मला नामदेवानं केशीराजा एकी व्यक्त केलेली आपली प्रीतगाथा अलौकिक वाटली. "जेथे जातो तेथे तू माझा सांगाती" या शब्दांनी विठ्ठलासंबंधीचा आपला मनोभाव प्रकट करणाऱ्या तुकोबारायांपेक्षा किंवा "देव खातें देव पितें। देवावरी झोपतें" असं सांगणाऱ्या जनाबाईपेक्षाही "नामा तो केशव केशव तो नामा" असं अभिमानानं सांगणाऱ्या नामदेवांचा भावनाविष्कार मला अधिक विलोभनीय वाटला. या माणसानं आपलं प्रेमकाव्य लिहिलं ते प्रीतरसात चिंब भिजवीत आणि दरघडीला औत्सुक्य वाढवीत असं लिहिलं. त्यामुळं—

कोटीसूर्य भादीप्ती। गगनी झळकली अवचिती ।।
संत नामया सांगती। पैल आला कमलापती ।।
वत्सालागी जैसा धेनु। तैसा धावे जगज्जीवन
गरुडाचे घुंदवाती। दाही दिशा आक्रंदती ।।
हरिकंठी सुमनमाळा। सुटुनी आली भूमंडळा
सवे चाले सुदर्शन। भक्ता करावया रक्षण।
उचलोनि दोही बाहीं। नामा धरिला हृदयी ।।

या विश्वव्यापी तेजाचा नामदेवांना घडलेला साक्षात्कार एकवेळ आपणही अनुभवावा असा मोह मनाला होतो! पंढरीनगरीचं निधान असणाऱ्या सावळ्या सगुण परब्रह्ममूर्तीचं नामदेवांना झालेलं—

कस्तुरी कुंकुम रेखे लाल टिळा।
केशराची उटी सर्वांगासी ।।
पाहिला पाहिला माझा पांडुरंग।
जीवीं जिवलग डोळेभरी ।।
हार शोभे गळा मंजुरीचा तुरा।
कर्ण रत्नकळा झळाळित ।।
विटेवरी नीट गोमटी पाउलें।
त्यावरी ठेविलें मस्तक म्यां ।।
नामयाची धमी भुकेली ती धाली।
आनंद दिवाळी आजी झाली ।।

हे सुंदर दर्शन आपल्यालाही घडावं असा विचार मनात डोकावतो. मन पंढरीनगरीकडं धाव घेऊ पाहातं. जिथं शांती, भक्ती आणि प्रेम यांची त्रिमूर्ती एकत्वानं नांदते आहे तिथं आपलंही राहाणं व्हावं असा ध्यास मनाला लागतो. योगी आणि भक्त यांना नामरूपातीत असणाऱ्या परब्रह्माची प्रतीती काळच्या वर्णामध्ये कसकशी येत गेली तेही कळावं म्हणून उत्सुकता शिगेला पोचते. आणि मग—

पंढरीचें प्रम आहे ज्याचें जीवीं।
त्यां नित्य नवी करिन आसा ।।
ते माझे साईरे सुखाचे सद्गरु।
भर्वासिधुचा पारू उतरिती ।।
माझ्या विठोबाचेया नामीं ज्यां विश्वास।
होईन त्यांचा दास आवडीचा ।।
माझ्या विठोबाच्या चरणीं ज्यांचा वाम।
बारवंटा पाय धरीन त्यांचे ।।

माझ्या विठोबाचें ध्यान ज्यांचे मनीं ।
सांडोवा अंगणी होइन त्यांचे ॥
ऐसें सर्वभावें माझ्या विठोबा शरण ।
त्यांचे वंदिन चरण नामा म्हणे ॥

असा मनोभाव पदरी बाळगून केशीराजासी जवळीक साधणाऱ्या नामदेवालाही भेटण्यासाठी मन कावरंबावरं होऊन जातं.

काळाची पावलं न ओळखणाऱ्या सनातनी शास्त्रीपंडितांच्या बंदिस्तपणात धर्मनिष्ठेपेक्षा औदासिन्याचाच अधिक असलेला भाग काढून टाकण्यासाठी अविश्रांत मेहनत घेतलेल्या साधुसंताचे चरणरज भाळी लावायला जीव उतावीळ होतो. समाजातील निर्घृण रूढीचं उच्चाटन करीत असताना सातत्य भंगू न देणाऱ्या व परंपरेतील सत्त्वांश नष्ट होऊ नये म्हणून सदैव जागरूक रहाणाऱ्या ज्ञानदेव नामदेवादि संतांचा सहवास व्हावा या मोहानं त्यांच्या ग्रंथांची पारायणं करायला मन धजावतं. ऋषिप्रणीत शास्त्रांना सार्थता आणण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करणाऱ्या आणि—

आम्ही वैकुंठवासी । आलों त्याचि कारणासी ।
बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया ॥

या अभिमानानं आपलं कर्तव्यकर्म बोलून दाखविणाऱ्या तुकोबारायांच्या पायाशी बसून माणुसकीचे धडे गिरवावेसे वाटतात.

समाजाच्या वेगवेगळ्या थरांतील लक्षावधी लोकांना एकत्र आणण्याची अपूर्व महत्त्वाकांक्षा बाळगून आमजनतेच्या अंतस्थ भावनेला मान देत समाजामधे नवचैतन्य निर्माण करण्यासाठी व उत्साह उभा करण्यासाठी स्वतःच्या हाडांची काडं करीत देहभांडं झिजविणाऱ्या त्या महाभागांपुढं नतमस्तक व्हावंसं वाटतं. भक्तीचा जिव्हाळा, चित्ताची शुद्धता, मनाची एकाग्रता आणि सदाचार व भूतदया पदरी बाळगून परमेश्वराची कृपा संपादन करणाऱ्या संतमंडळींच्या थव्यात जाऊन त्यांच्या सद्विचारांचं अमृत प्राशन करावं असं एकसारखं मनात येतं. अनेकत्व राखूनही ऐक्यभाव साधणारी त्यांच्या कार्याची हातोटी आपणही संपादावी या कल्पनेत मन गढून जातं. उदात्त विचारांनी भारलेल्या भक्तिकल्पनेच्या सूत्रात त्यांनी स्वतःला गुंफून घेत लोकहित साधण्याची केलेली शिकस्त आपल्याही अंगी उतरावी म्हणून त्या केशीराजाला मनोभावे आळविण्यासाठी आपोआप आमचेही ओठ हलू लागतात. अशा वेळी—

" दाऊ वेल्हाळ देशी नवी । जे साहित्यातें वोजावी ।
अमृताही चुकी ठेवी । गोडिसेपणें ॥ "

हा ज्ञानियांच्या राजाचा मनोभाव आमच्या हाडीमासी खिळावा म्हणतो. साहित्याला लावण्याची नव्हाळी प्राप्त व्हावी एवढेच नव्हे तर मराठी शब्दांच्या नादमाधुर्यानिळे अमृतालाही उणेपणा प्राप्त व्हावा अशी भाषा आम्ही आमच्या निरूपणासाठी वापरावी या कर्तव्याची ओघानेच जाणीव होते. त्याचबरोबर केवळ शब्दांच्या चतुराईवर, चमत्कृतीच्या दर्शनावर, कल्पनेच्या कसरतीवर आणि रचनेच्या चतुराईवर काव्य अवलंबून नसतं तर ते अंतःकरणाचा ठाव घेणाऱ्या भावनाविष्कारात सामावलेलं असतं, या नामदेव तुकारामांच्या कल्पनेतून उतरलेल्या त्यांच्या भावकाव्याचा परिचय करून घेण्याची महत्त्वाकांक्षा बाळगावी याही विचारानं मन पिंगा घालू लागतं. आणि मग—

धन्य तोचि जगीं जाणा राजयोगी ।
जेणें पांडुरंगीं ठेविला भाव ॥
संकल्पविकल्प शून्य करोनि मन ।
हृदयी धरिलें चरण विठोबाचे ॥
कोटि कुळें एका क्षणेंचि पावन ।
जेणें केलें स्नान चंद्रभागे ॥
महा पापराशी त्याच्या झाल्या होळी ।
वाजविली टाळी विठ्ठल नामें ।
नामा म्हणे धन्य धन्य ते संसारी ।
चालविती वारी पंढरीची ॥

नामदेवांच्या या राजयोग कल्पनेचं विश्लेषण करायचा मोह मनाला विलक्षण होतो. भक्तिप्रेमाच्या रसाची सर्वत्र मनोहारी शिंपण करून पाषाणालाही पाझर फोडण्याची अद्भुत शक्ती संपादन केलेल्या नामदेवांच्या कवित्वाशी जवळीक व्हावी असं मनापासून वाटतं. काव्यशास्त्राचं कसलंही दडपण पदरी न बाळगलेल्या नामदेव-तुकारामांनी काव्याच्या अंतरंगाला प्राधान्य देणारी व कवीच्या व्यक्तित्वाची कदर करणारी बहु-

जनांसाठी केलेली अभंगरचना मराठी साहित्यात आपलं स्वतंत्र स्थान कशी संपादन करू शकली ?याचाही पडताळा यावा या उत्सुकतेनं काया मोहरून उठते. अंतरीचा उमाळा बोलून दाखविणाऱ्या या महाकवीनं, संतशिरोमणीनं —

नाचूं कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।

या भूमिकेतून भागवतधर्माचा केलेला प्रसार लक्षात घ्यावासा वाटतो. "अमृताहुनी गोड नाम तुझे देवा" या कल्पनेनं विठ्ठलाचा धावा करणाऱ्या या भोळ्या भक्ताला —

हृदयीं चिंतूनि विठ्ठलमूर्ति । दोन्ही लाविले नेत्रपातीं ।
नाठवेचि देहस्फुर्ति । विदेह स्थिति झालीसे ।।
सांडोनिया मानापमान । सोडोनि दांभिक लोकाचरण ।
सांडोनि वासनेचें लक्षण । करी कीर्तन निजप्रीती ।।
सांडोनियां भेदाभेद । द्वैत कल्पनेचा करूनि छेद ।
सांडोनिया असा प्रबंध । नाचे स्वानंद प्रीतीने ।।

महिपतींनी वर्णन केलेल्या या ब्रह्मानंदी टाळी लागलेल्या स्थितीत डोळे भरून आपणही पाहावं हा छंद मनाला जडतो. ईश्वरप्रेमाच्या भरात तल्लीन होऊन नाचत असताना अगदी सहजगत्या अभंग बोलणाऱ्या नामदेवांच्या—

प्रेमपिसें भरलें अंगी । गीत सगे नाचू रंगी ।।
कोणे वेळ काय गाणें । हे तो भगवंता मी नेणें ।।
टाळमृदंग दक्षिणेकडे । आम्ही गातो पश्चिमेकडे ।।
बोले बाळक बोबडे । तरी ते जननीये आवडे ।।
नामा म्हणे गा केशवा । जन्मोजन्मी देई सेवा ।।

या कल्पनेचा पडताळा घ्यावा हाही विचार मनात डोकावतो आणि वाल्मीकीने जसा शतकोटी ग्रंथ केला तसे मी तुझे शतकोटी अभंग करीन. ते पुरे झाले नाहीत तर 'जिव्हा उतरीन तुझ्यापुढे' अशी विठ्ठलाच्या चरणी प्रतिज्ञा करणाऱ्या महापुरुषापुढं आपोआप साष्टांग दंडवत घालावा म्हणून अवचितच मान नम्रता धारण करते.

निवृत्तिनाथांच्याप्रमाणंच नामरूपगुणातीत, चिन्मय, चिद्रूप असं असणारं परमात्मतत्त्वच कृष्णरूपानं गोकुळात अवतरलं आहे असं सांगणाऱ्या नामदेवांनी कृष्णमूर्तीचं ध्यान करता करताच रात्रंदिवस अंतर्बाह्य तोच कसा दिसू लागला व विदेहस्थिती प्राप्त होऊन नामदेव जीवन्मुक्त कसे झाले याचे—

ध्यानी ध्याता मनी हाचि येऊनि बैसे ।
गीतीं गातां वसे हृदयकमळीं ।।
बाहेरी भीतरी वोधिले वो येणें ।
रुक्मिणीरमणें पांडुरंगे ।।
याविण दुसरें मज कांहींच नाठवे ।
लागलीसे सवे गोपाळाची ।।
भाग्ये जात जीवा कांहींच नावडे ।
वांचोनि पवाडे गोपाळीचे ।।
निद्रा आणि जागृति स्वप्नीं आणि सुषुप्तीं ।
देखे कृष्णमूर्ति सर्वगत ।।
ऐसा अखंड विदेही लौकिकाविरहित ।
नामा जीवन्मुक्त होऊनी ठेला ।।

हे त्यांनीच केलेले वर्णन त्यांच्या विचारांची धाटणी लक्षात यावी म्हणून वारंवार वाचावंसं वाटतं. विठ्ठलनामावर संपूर्ण विश्वास ठेवून वागणाऱ्या व वैष्णवांचा कुळधर्म म्हणून "गाऊ नाचूं आम्ही आनंदे कीर्तनी । भक्तिमुक्ति दोन्ही मागूं देवा ।।" ही कल्पना जनलोकांच्यापुढं ठेवणाऱ्या नामदेवांनी आपलं कवित्व एवढं चित्ताकर्षक कसकसं केलं असेल याबद्दल अचंबा वाटतो. आणि—

वैष्णवा घरीं सर्वकाळ । सदा झिणझिणती टाळ ।।
कण्या भाकरीचें खाणें । गांठी रामनाम नाणें ।।

आपल्या कुळाचाराची अशी कल्पना देणाऱ्या या भक्ताची वाहवा मनात येते.

लहानपणी देवाला दूध प्यायला लावण्याचा चमत्कार करणाऱ्या आणि बालक्रीडेचे अभंग लिहिताना वत्सलरस कौशल्यानं हाताळणाऱ्या नामदेवांनी स्वत:बद्दल देवाला काय सांगितलं असेल असा विचार या संदर्भात माझ्या मनात अनेकदा डोकावतो, केशीराजा म्हणजे नामदेवांचं कुलदैवत आणि सर्वस्वही. विठूदेवाचा संपूर्ण आशीर्वाद आपल्या पाठीशी आहे ही नामदेवांची नितांत श्रद्धा अठ्ठावीस युगे विटेवरी उभ्या असलेल्या परब्रह्माचा हा निष्ठावान सेवक. जन्मोजन्मी फक्त पंढरीचा वास घडावा आणि विठोबाचं दर्शन घडावं एवढीच या महाभागाची अपेक्षा आणि—

अनुक्रमणिका

पुलक धर्म रोमांच नाहीं जंव उठले ।
सजळ नाहीं झाले नयन जंव ।।
हरिभक्तीचें सुख कळलें जे म्हणती ।
लटिकें बोलिजेतो उभय लोकीं ।।

अशी ज्यांची भक्ताबद्दलची कल्पना त्या नामदेवानं देवाशी काय हितगुज केलं असेल ?......आपलं मन विठूदेवाजवळ मोकळं करताना हे संतशिरोमणी म्हणाले कसे--

मायबापांपरीस लोभ तुझा हरी ।
आहे मजवरी केशीराजा ।।
आतां जाणसीं तें कृपाळुवा करीं ।
लाज सर्व हरी आहे तुज ।।
माझें जातिकुळ नाहीं त्वां पुसिलें ।
अन्याय साहिले कोटयानकोटी ।।
जन्मोजन्मी मज घातलें पाठीसी ।
संकटीं रक्षिसी नारायणा ।।
देऊनि प्रेमभावें पाळिलें पैं माते ।
साउली तेव्हां ते केली देवा ।।
जे खुण जाणतो तेचि माझे सखे ।
मी तुझें लाडकें म्हणवी देवा ।।
नामा म्हणे काई होऊं उतराई ।
पुढें जन्म नाहीं ऐसें केले ।।

केशीराजाच्या प्रेमळ वागणुकीनं नामदेवराय कृतकृत्य झाले. तृप्त झाले. आयुष्यात मिळवायचंते सारं प्राप्त झाल्याचा ब्रह्मानंद त्यांनी भोगला.

त्यावेळी पंढरी नगरीनं माणुसकीचा गहिवर घातला. केशीराजाच्या भक्तांनी मानवता धर्म फुलवला. नामदेवराय या नगरीच्या विद्यापीठाचे पायरी झाले. केशीराजाच्या राउळाचं संरक्षण जणु त्यांनी स्वीकारलं. येणाजाणारांचा भार प्रथम आपल्या शिरावर घेतला. देवाची सर्वार्थानं राखण केली. त्यांची काया कारुण्यानं दाटली होती. विठाई माऊलीचं लाडकं बाळराज होऊन त्यांनी भक्तिरसानं ओथंबून गेलेली गीता लिहिली. भावकाव्याचं सुंदर लेखन केलं. स्वतःच्या प्रेमानं केशीराजाला न्हाऊ घालीत साजिवंत केला.

नामदेवांच्या कवित्वानं पंढरीच्या राऊळात वर्गसुख उभं केलं. प्रेमभावनेच्या पताका सर्वत्र फडकविल्या. स्वतःला विसरून ते देवाशी एकरूप झाले. त्यांची वाणी उदे बोलली. भक्तानं आणि देवानं एकमेकांना हंकारहुंकार घातले. त्यातूनच एका श्रेष्ठ स्भावकाव्यानं जन्म घेतला आणि हरिनामाचा सुकाळ करण्याचं भाग्य या महान् भक्ताला लाभलं. धन्य ते नामदेव आणि धन्य तो त्यांचा केशीराजाही !

सभासदांस सूचना

गेले कित्येक दिवस बऱ्याच सभासदांकडून 'युगवाणी'चा अंक न मिळाल्याबद्दल तक्रारी येत असतात. अंक येथून बरोबर सर्वांना पाठविले जातात. तरी ज्यांना अंक मिळाले नसतील त्यांनी आपल्या पोस्ट ऑफिसात अगोदर चौकशी करावी. याउपरही कोणास अंक मिळाला नाही आणि त्यांना अंक पाहिजे असेल तर त्यांनी कार्यालयामधून अंक घेऊन जावा. अंक शिल्लक असल्यास अवश्य दिला जाईल.

सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

नाचू कीर्तनाचे रंगी (पान ३६६ वरून)

नामदेव कीर्तन करी, पुढे नाचे पांडुरंग ।
जनी म्हणे बोला ज्ञानदेवा अभंग ।।
अभंग बोलतां रंग कीर्तनी भरला ।
प्रेमाचेनि छंदे विठ्ठल नाचू लागला ।।
ऐसा कीर्तन महिमा सर्वांमाजी वरीष्ठ ।
जडमूढ भाविका सोपी केली पायवाट ।।
नामयाची जनी लोळे संतांच्या पायी ।
कीर्तन प्रेमरस अखंड देइ गं विठाबाई ।।

समतेच्या तत्त्वाचा उद्‌घोष तर सर्व जण करतात. पण व्यवहारात सर्व प्रकारच्या विषमतेचे साम्राज्य आढळते. नामदेवांच्या काळात वर्णविषमतेने सर्व समाजाला ग्रासले होते. स्वतः नामदेव बालभक्त होते, त्यांनी दगडाच्या देवाला नैवेद्य खायला लावला, बालपणीच विठ्ठलाला त्यांनी अंकित केले होते इत्यादि गोष्टी खऱ्या असतील. भक्तीच्या एवढ्या लीला-वैभवाची प्रभावळ असलेल्या नामदेवांना तथाकथित श्रेष्ठींचा अनुभव काय आला ? ते स्वतःच सांगतात. 'तत्त्व पुसावया गेलो वेदज्ञासी । तवं भरले त्यापाशी विधिनिषेध ।। तया समाधान नुपजे कोणे काळी । अहंकार बळी झाला तेथे ।। स्वरूप पुसावया गेलो शास्त्रज्ञासी । तव भरले तयापाशी भेदाभेद ।। ऐसे विचारिता बहुत भागलो । म्हणोनि शरण आलो पांडुरंगा ।।' वरे स्वतःच स्वतःचे मार्गदर्शन करीत समाजात वावरावे तर हीन जातीचा म्हणून वरिष्ठ वर्णियांनी अवहेलना करावी. आपल्या यातिहीनतेमुळे भोगाव्या लागणाऱ्या अपमानांचा आणि दुःखांचा नामदेवांनी वारंवार उल्लेख केला आहे. त्यांच्या या मानसिक यातनांतूनच त्यांच्या अंतःकरणातील भक्ति-प्रेमाचा वृक्ष अंकुरला आणि बहरला. त्यांच्या सावली-खाली असे वर्णविषमतेचे बळी असलेले अनेक भाविक गोळा झाले. सोनार आले, न्हावी आले, कुंभार आले, माळी आले, महार आले–सर्व आले. या सर्वांच्या अंतःकरणाला दिलासा दिला नामदेवांनी. या सर्व जातींत समतेचा दीप खऱ्या अर्थाने प्रज्वलित केला नामदेवांनी. त्यांच्या जीवनातून निर्माण झालेल्या या कार्यामुळे ते बहुजनसमाजाचे वाचस्पती झाले, हृदय-सम्राट बनले.

हे कार्य त्यांनी केवळ महाराष्ट्रात केले असे नाही. तर महाराष्ट्राबाहेर पंजाबपर्यंत जाऊन, तेथे राहून त्यांनी हेच कार्य केले. स्वान्तःसुखाय भक्ती करणारे मुमुक्षु आपल्याच ठिकाणी मग्न असतात. त्यांना जगाशी कर्तव्य नसते. इतरांची ते मुळीच पर्वाही करीत नाहीत. संत मुमुक्षु तर असतातच, पण समजाशी त्यांचे नाते अखंड जोडलेले असते. जगाच्या उद्धारा-साठी ते अवतरलेले असतात. 'दीन जनाच्या उद्धारा-साठी त्यांचा अवतार असतो असे नामदेव सांगतात. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' असा तुका-रामांचाही विश्वास आहे. म्हणून संत समाजात सतत वावरत असतात. भजनकीर्तनांच्या द्वारा त्यांच्याशी हृदयसंवाद करतात. स्थलकालमर्यादेच्या बंधनातून बाहेर पडून लोकहितासाठी सर्वत्र त्यांचा संचार असतो. विठ्ठलनामाच्या भक्तीची पताका खांद्यावर घेऊन संत नामदेव बाहेर पडले. वाटेतील खेड्यापाड्यांतून भ्रमण करीत करीत ते पंजाबात गेले. आणि तेथे त्यांनी अनेक वर्षे वसती केली. महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीचा अनुभव त्यांना तेथेही आला. म्हणूनच बहुधा तेथील हीनदीनांना, रंजल्यागांजल्यांना भक्ति-प्रेमाचा हात देऊन सुखी करण्याची आवश्यकता त्यांना वाटली. विठ्ठलभक्तीचा, नामस्मरणाचा मंत्र त्यांनी तेथील जनतेला दिला. अनेक भोळेभावडे भाविक त्यांच्या भोवती गोळा झाले. पंजाबातील घुमान या गावी असलेले नामदेवांचे गुरुद्वार याची साक्ष देईल. घुमानखेरीज पंजाबात इतर अनेक ठिकाणी नाम-देवांच्या शिष्यांची स्मारके आहेत. त्यांनी लिहिलेली अनेक पदे आज तेथील नामदेवभक्तांच्या जिव्हेवर खेळत आहेत. या पदांतील आध्यात्मिक आणि सामा-जिक आशयाने गुरू नानकांचेही अंतःकरण आकृष्ट करून घेतले. आपल्या कार्यात त्यांना तो आशय मार्ग-दर्शक ठरला. त्यापासून त्यांना प्रेरणा मिळाली. आपल्या प्रचारकार्यात ते त्या पदांचा उपयोग करीत. त्याचमुळे नामदेवांच्या रचनेतील काही पदांना शिखांच्या धर्मग्रंथात स्थान मिळाले. नामदेवांच्या ह्या कार्यातही त्यांचे आगळेपण दिसून येते. महाराष्ट्रा-बाहेर जाऊन कार्य करण्याचे, तेथील जनतेला जागृत करण्याचे कार्य मराठी संतमंडळातून एकट्या नामदेवां-नीच केलेले आढळते. त्यामुळे खऱ्या अर्थाने नामदेव हे अखिल भारतीय ठरतात.

संत नामदेवांची पद्यरचना हे हिंदी प्राचीन साहित्याचे बहुमोल लेणे ठरलेले आहे. उत्तर हिंदुस्थानातील निर्गुण काव्याचे ते प्रवर्तक मानले जातात ते याचमुळे. त्यांच्या हिंदी रचनेत अनेक मराठी शब्द, वाक्प्रचार आणि धातुरूपे आली आहेत. आणि तसे होणे स्वाभाविक होते. कारण त्यांची मातृभाषा मराठी होती. या मराठी शब्दांची आणि रूपांची देणगी हिंदी भाषेला आपोआपच मिळाली. आंतरभारतीचे हे कार्य नामदेवांच्याकडून सुरू झाले असे म्हणायला हरकत नाही. संत नामदेवांनी उत्तर भारताशी जोडलेला हा दुवा अतूट होय. महाराष्ट्र आणि पंजाब व उत्तर प्रदेश यांमधे निर्माण झालेल्या सांस्कृतिक ऐक्याचा पाया नामदेव महाराजांनी घातला. त्यात त्यांची विश्वात्मक दृष्टी दिसून येते. पंजाबात राघोबादादांनी मराठ्यांचे झेंडे रोवले याचा आपण अनेकदा अभिमान बाळगतो. पण त्यामागे आक्रमणशील नेतृत्वाची पार्श्वभूमी असल्यामुळे त्या अभिमानाला भावनात्मक ऐक्याच्या दृष्टीने आपण तिलांजली दिली पाहिजे. शिवाय हे झेंडे जसे रोवले गेले तसे ते उखडून खालीही पडले. पण मराठ्यांच्या झेंड्यापूर्वी महानुभाव पंथियांनी तेथे श्रीचक्रधरस्वरूप श्रीकृष्णभक्तीची पताका तिकडे नेली आणि ती अजूनही तेथे जयकृष्णी पंथाच्या रूपाने फडकत आहे. महाराष्ट्र आणि पंजाब या दोन्ही प्रदेशांचा हा सांस्कृतिक दुवा अधिक महत्त्वाचा आणि चिरस्थायी म्हणून सन्मानाचा विषय झाला आहे. पण महानुभाव पंथापूर्वीही संत नामदेवांनी वारकरी पंथाची पताका तिकडे नेली हे लक्षात घेतले पाहिजे. या पताकेने पूर्वी अनेकांना मार्गदर्शन केले व स्फूर्ती दिली. या सांस्कृतिक ऐक्याचा पाया घालणारे संत नामदेव महाराज धन्य होत. या कार्याबद्दल भारत आणि विशेषतः महाराष्ट्र त्यांचा अखंड ऋणी राहील.

(पान ४११ वरून)

मुळे तिला मर्यादाही पडल्या आहेत. पण ह्या मर्यादांमध्येच नामदेवांचे भावकवी म्हणून सामर्थ्यही दडलेले आहे.

शब्दांसाठी नामदेव कधीच लिहीत नाहीत. ते गातात. आत्मभान विसरून जसे येईल तसे. पण ह्या सहज समरसतेतून काही लक्षणीय विलोभनीयता, भावमधुर कविता जन्म घेते. लेकराचा लडिवाळपणा, आकांत, ऊर वितळवणारी आर्तता आणि ह्या सर्व संदर्भात उत्कटतेचे शेवटचे टोक नामदेवांच्या कवितेत दिसते.

आपल्या अंगभूत काव्यात्म सामर्थ्याने अनंत काळ तळपत राहतील अशी अनंत कल्पनाचित्रे, प्रतिमा नामदेवांच्या कवितेत आहेत. ह्या आरशासारख्या उजळ प्रतिमांनी नामदेवांच्या मनातील करुण निरिंद्रिय सरूप, सगुण साकार केलेले आहे. अमूर्त इथे कलात्मक रूपात मूर्तिमान आणि आर्त देखणे झाले आहे. चंद्रबिंबाची कुरवंडी, संशयाचे कोंभ, रोडले नेत्र, पैल दक्षिणेचा वारा, ब्रह्मणीही कळा मुक्ताबाई, सोनियाची झाडे, गगनी भारी अंकुरलेले तरुवर, हालते गगन किंवा 'नामा म्हणे आम्हा तेजाच्या उजेडा, देव केला घोडा बैसावया' यातील झेपदार प्रतिमा ह्या आणि अशाच कितीतरी अर्थसघन प्रतिमा नामदेवांच्या कवितेत उसळलेल्या आहेत. गहीवर आणि आर्त व्यक्त करण्याची शब्दांची ताकद नामदेवांनी नकळतच पण निश्चित वाटविलेली आहे.

नामदेवांच्या करुणार्त, भावश्रीमंत व्यक्तित्वाचे हे प्रामाणिक व भावव्याकुल बोल आहेत. निखळ भावबळावरही ही कविता काळाला आव्हान करणार आहे. करीत आहे. ज्ञानोबा–तुकोबांच्या अपेक्षेने हेच नामदेवांचे सामर्थ्य व हेच त्यांच्या कवितेचे मर्यादशीलत्वही.

कोल्हटकर जन्मशताब्दी : शिक्षणमंत्र्यांचे निवेदन

महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी यांनी कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या जन्मशताब्दी समारंभासंबंधी दि. २९ सप्टेंबर १९७० रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत केलेले निवेदन पुढे दिले आहे,—

ललित कला, साहित्य व सांस्कृतिक चळवळी याविषयी महाराष्ट्राची थोर परंपरा आहे. महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास विविधतेने नटलेला आणि स्फूर्तिदायी घटनांनी आणि पुरुषार्थी व्यक्तिमत्वानी भरलेला आहे. साहित्याच्या विविध अंगांच्या विकासातूनच समाजाच्या आत्म्याचे संरक्षण होत असते. या भावनेतूनच महाराष्ट्र शासनाने नव्या दृष्टीचा अवलंब करून कलावंतांच्या व साहित्यिकांचे कौशल्य व वाङमय निरनिराळ्या प्रयत्नांतून जनमानसावर परिणामकारक ठरेल अशा दृष्टीने जनतेच्या पुढे आणण्याचे प्रयत्न केले. नव्या परंपरा किंवा संप्रदाय निर्माण करणाऱ्या कवी साहित्यिकांना औचित्यपूर्ण आदरांजली अर्पण करण्याचे कार्य शेकडो लोक एकत्र बसून ललित कलांचा आस्वाद घेऊ शकतील अशी नाट्यगृहे बांधली. नाटक, संगीत, तमाशा चित्रपट याबावत वार्षिक महोत्सव साजरे करून कलाकारांना प्रोत्साहन देऊन महाराष्ट्र साहित्य औद्योगिक मंडळ स्थापन केले.

या थोर परंपरेला धरूनच महाराष्ट्र शासनाने मराठी नाट्यवाङमयातील अग्रगण्य लेखक कै. श्रीपदा कृष्ण कोल्हटकर यांची जन्मशताब्दी पुढील वर्षी साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांची जन्मशताब्दी २९ जून १९७१ ला येत आहे.

मराठी जनतेला कै. कोल्हटकरांचा परिचय करून देण्याची आवश्यकता नाही. सर्वांनाच महित आहे की' लहानपणापासूनच त्यांना नाटकांचे व संगीताचे अतिशय वेड होते. कोल्हटकरांनी नाटक, विनोद, कादंबरी, लघुकथा, आत्मचरित्र आणि कविता अशा अनेकविध वाङमयप्रकारांत लेखन केले आहे. कोल्हटकरांच्या नाटकात नानाविध स्वरूपाची विविधता प्रकट झाल्यामुळे नाट्यरसिकांची मने त्यांनी आकर्षून घेतली ते स्वाभाविकच आहे. त्यावेळच्या नाट्यरसिकांना प्रामुख्याने पौराणिक विषयांवरची रूपांतरित स्वरूपाची नाटके परिचित होती. कोल्हटकरांनी याबाबतीत क्रांती घडवून आणली व सर्व नाटके सर्वस्वी स्वतंत्र आणि कल्पनारम्य कथानकावर आधारून लिहिली. त्यांची विविधता वाढविण्यासाठी ती त्यांनी रहस्यमय आणि चमत्कृतिपूर्ण बनविली, त्यात काव्यकात्मता आणून कोटीबाज, ठसकेवाज, चटकदार आणि मार्मिक संवादाने त्यांची शोभा वाढविली. कलेकरिता कला या तत्त्वाचा कोल्हटकरांनी महाराष्ट्रात प्रथम अधिकारवाणीने पुरस्कार केला असे तज्ञांचे मत आहे. महाराष्ट्राचे भवभूती म्हणून त्यांचे वर्णन काकासाहेव खाडिलकरांनी केले.

"श्रीपादाची कलावती वाणी" अशा मार्मिक शब्दांत गडकऱ्यांनी ज्यांच्या साहित्याचे वर्णन केले आहे, अशा साहित्यिकाची महाराष्ट्रात निरनिराळ्या साहित्यसंस्थांतर्फे जन्मशताब्दी साजरी व्हावी हे स्वाभाविकच आहे. परंतु शासनाने महाराष्ट्र राज्यात हा सोहळा साजरा करावा हे औचित्यपूर्ण व आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासनाने ही जन्मशताब्दी साजरी करण्याचा निर्णय घेतला असून त्या कामी शासनाला सल्ला देण्यासाठी शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक सल्लागार समिती नेमण्याचे ठरविले आहे. ही समिती लवकरच जाहीर करण्यात येईल.

ह्या जन्मशताब्दीच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनातर्फे साहित्य अॅकडमीला कै. कोल्हटकर यांच्या निवडक लेखांचा संग्रह पुस्तक रूपाने प्रकाशित करण्याची तसेच केन्द्रीय दळणवळण मंत्र्यांना जन्मशताब्दी स्टँप्स काढण्याची विनंती करण्यात येणार आहे. याखेरीज लोकराज्याचा विशेषांक इत्यादीं द्वारा प्रसिद्धीचा कार्यक्रम राहीलच.

विदर्भ साहित्य संघ, शाखा वणी (यवतमाळ)

दोन उत्कृष्ट प्रकाशने

अक्षर–माधव

कै. लोकनायक बापूजी अणे यांच्या मौलिक व वेचक वाङ्मयीन लेखांचा हा संग्रह. राजकारण-धुरंधर बापूजींच्या एका वेगळ्या पैलूंचे मनोरम दर्शन घडविणारा हा संग्राह्य ग्रंथराज. या ग्रंथाचे साक्षेपी संपादन महाराष्ट्रातील नामवंत कवी व साहित्यिक प्राचार्य राम शेवाळकर यांनी केले असून, मराठीतील सव्यसाची पत्रपंडित आणि ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी संपादित लेखांचा परामर्श घेणारी मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे.

डेमी आकार : पृष्ठसंख्या ३५० किंमत १० रुपये

पदाती

विदर्भातील जुन्या पिढीतील एक नामवंत कवी श्री. ना. मा. सरपटवार यांच्या नियत-कालिकांतून वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या निवडक कवितांचा हा काव्यसंग्रह. या संग्रहाला मराठीतील मान्यवर कवी व रसिक काव्यसमीक्षक प्रा. भ. श्री. पंडित यांची रसोद्ग्राही प्रस्तावना लाभली आहे. तसेच आदरणीय अप्रबुद्ध, श्री. य. गो. जोशी, कविवर्य वा. ना. देशपांडे, पद्मभूषण लोकनायक अणे, पद्मभूषण य. दि. पेंढरकर, पद्मश्री ग. दि. माडगूळकर प्रभृतींनी कवितेबद्दल गौरवपर उद्गार काढले आहेत.

पृष्ठसंख्या ... किंमत : तीन रुपये

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर–१
मुद्रणस्थळ : नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर–१

अनुक्रमणिका